Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

## Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला—– सोमवार तारीख ३ माहे आगष्ट सन १९१४ इ० [ अंक ३०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुदें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खाली दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा ज्यास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ J. G. Ridleand. एजंट

नो. नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें ज्यास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६½ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० J. G. Ridland. एजंट.

न० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ३

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १०८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ४

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. (Natl) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S. I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 5

## 'विकावयाचा आहे.'

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टीनजिक असलेला कै॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायण भट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते इंगोली व्हाया वाशीम लोकल रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ६ वऱ्हाड

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




**सर्वत्र एजन्टस् पाहिजेत**

**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**

नो. नं. ७

### "खरें पौष्टिक औषध"

पाहिजे असल्यास, आमचे हात भट्टीचे, शास्त्रोक्त यथासांग पद्धतीनें, निर्विकारी, व ज्यांत [ कारखान्याचे औ० प्रमाणें ] उष्ण गुणधर्म नाहीं, व प्रतिज्ञेनें १४ दिवसांत हटकुन गुण देते, असे वंगभस्म वापरा. किं. तो. ३ रु. अनुपान खरडा सोबत असतो ४० विकार, यानें दुरुस्त होतात. तसेंच वरील पद्धतीनें, प्रवाल भस्म तयार असून ११ विकार घालविते. खरडा सोबत असतो. ज्यांना, परमा, उपदंश, व इतर कांहीं कारणामुळें, उन्हाळ्यांत, उन्हाळी लघवींत आग, धातुस्थानाची कडकी, असे विकार होतात, यांना याचा फार उपयोग होतो. किं. तो. २ रु शिवाय पौष्टीकही आहे. त्वचारोगांतक— १ मलम, खरुज, गजकर्ण, खवडा, आगपैण वगैरे कोणत्याही त्वचा रोगावर चालतो. अनेक मलमाची जरुरी नाहीं. किं. ८ आणे बि. सु. क्याटलाग मागवा. फुकट—व्ही. आर. मुळे, नांदुरा, जी. आय. पी.

नो. नं. ८

बंगाली कथानकाचे आधारें लिहिलेली

## मधुर-मीलन.

लेखक—श्रीयुत, कृष्णानुज—कालेकर.

**वाचकांचें मन आनंदानें प्रफुल्लित करणारी अत्यंत चित्तवेधक नवी कादंबरी.** कथानक रम्य व उदात्त, भाषा सोपी पण चटकदार. प्रकरणे २४. किं. व्ही. पी. सह आठ आणे. प्रो० हरिहर प्रेस, पुना-सिटी

नो. नं. ९

गवत ! गवत !! गवत !!!

### जाहिरात.

जी. आय. पी. रेल्वे लाईन वारोळ वरोरा ष्टेशन येथें वक्त मोहसमी कटाई केलेल्या चांगल्या प्रकारच्या चराई गवताचे गठ्ठे बांधण्याचें काम पावसाळा संपतांच शुरु केलें जाईल. ज्या लोकांना गवत खरिदी करावयाचे असेल त्यांना विनंती करण्यांत येतेकीं त्यांनीं खाली सही करणाराकडे **३१ आगष्ट १९१४ चे अगोदर आपले मागणी अर्ज पाठवावे.**

दस्तखत
सही. सी. एफ. बेल.
डिव्हीजनल फारेस्ट आफिसर
नार्थ चांदा डि. चांदा.

नो० नं०१०

### मुद्दाम अगोदर हें वाचावें.

शेंकडों लोकास गुण आला आहे. काळजीसारखा दुसरा रोगच नाहीं. कांहो, इतकी काळजी कां करतां. तुमची इच्छा हीच आहेना? व्यापारांत फायदा व्हावा, नोकरींत बढती मिळावी, परीक्षा पास व्हावी, संतती व्हावी, कर्जमुक्त व्हावें, घरांत कलह, होऊं नये, शरीरांत सौख्य व्हावें, कोणतीही बाधा होऊं नये, इतक्या गोष्टी बद्दल काळजी करण्यास नको असेल तर प्रसिद्ध मांत्रिक माणिकप्रभु येथील रामचंद्र तात्या ह्यांचा **जगप्रसिद्ध अद्भुत ताईत** जवळ ठेवा. म्हणजे सर्व गोष्टी मनाप्रमाणें होतील ताईताच गुणाची ह्या देशांत व परदेशांत ख्याति आहे. अनुभव घेऊन पहावा. गुण न आल्यास पैसे परत मिळतील. कोणतीही शंका घेऊं नका. कोणते वर्तमान पत्रावरून मागणी केली हें कळवावें. नंबर १ चा ताईत ह्याची किंमत रुपये ८ - नंबर २ चा ताईत किंमत रुपये ४ नं. ३ चा ताईत किंमत रु. १। ट. व्ही. पी. खर्च ०६ आणे. नंबर १ च्या ताईता पासून १६ दिवसांत गुण येईल. नंबर २ च्या ताईतापासून एक महिन्यांत गुण येईल. नं. ३ च्या ताईताचा गुण २ महिन्यांनीं येईल. जशी जरूर असेल त्याप्रमाणें मागणी करावी.

पत्ताः—वासुदेव रावजी लेले मिरज

नो. नं. ११

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध १२ शके १८३६

## सध्याचा समाजनीतीचा मूलमंत्र

एका संस्कृत कवीनें राजनीतीला वेश्येप्रमाणें चंचल स्वरूपाची ह्मटलें आहे; आणि खरोखर केवळ राजनीतिच नव्हे तर तिच्यासंबंधाच्या अवांतर गोष्टीसुद्धां अशाच चंचल स्वरूपाच्या आहेत. उदाहरणार्थ राजनीतीसंबंधाचें मनुष्याच्या वर्तनाचें ध्येय घ्या, आणि निरनिराळ्या काळांत त्याचीं कशीं स्थित्यंतरें झालीं आहेत तें पहा. पूर्वीचे या बाबतींत आमचेच नाहीं तर, पृथ्वीवरील सगळ्या राष्ट्रांचे इतिहास चाळून पाहिले तर एकच तत्त्व आढळेल. तें हें कीं प्रत्येकानें स्वामिनिष्ठ असावें; आणि स्वामिनिष्ठ ह्मणजे जो राज्यकर्ता पुरुष असेल त्याच्या वर्तनाकडे न पाहतां तो विष्णुस्वरूप मानून त्याच्या भक्तींत स्वतःला हरवावें. व्यक्ति, कुटुंब, समाज, देश सर्वांचें हित त्या एका राजपुरुषाच्या हितापेक्षां गौण समजणें, फार काय पण स्वाभिमानासारखे उच्च प्रतीचे गुणसुद्धां त्यापायीं मातींत कालवावे ही स्वामिनिष्ठा! बरोबर आहे. त्याकाळीं लोकांची समाजविषयींची कल्पनाच निराळी होती, त्यावेळीं अशा अत्यंतिक स्वामिनिष्ठेच्या ध्येया वांचून दुसरें ध्येय लोकांच्या समोर असणें शक्यच नव्हतें. व या ध्येयांत कितीही वैगुण्य असलें तरी या ध्येयानेंच आज हजारों वर्षें समाज चालत आले. पण ही स्थिति किती दिवस चालणार? हळूंहळूं लोकांच्या विचाराची प्रगति झाली तशी एका व्यक्तीची पूजा जाऊन तिच्या जागीं अनेक देवांच्या पंचायतनाची पूजा येऊन बसली; आणि अशा रीतीनें हळूंहळूं प्रगति होतहोत आतां आह्मां सर्व व्यक्तींचें पूजास्थान समाजहित हें होऊन बसलें आहे. सध्यांचें ध्येय ह्मणजे समाजहित साधन हें आहे. कोणताही कायदा घ्या. त्याचें उत्तम मध्यमत्व या कसोटीला लावल्यावर हल्लीं ठरविण्यांत येतें. त्या कायद्यापासून समाजाचें हित कितीसें साधेल त्या मानानें त्याची उपयुक्तता व बऱ्यावाईटपणाचें प्रमाण ठरवयाचें. सार्वजनिक पैशाचा किंवा सरकारी खजिन्याचा होणारा खर्च न्याय्य आहे कीं अन्याय्य आहे याची चिकित्सा तो समाजाच्या हिताला लागला आहे कीं नाहीं या एका गोष्टीवरून हल्लीं होते. जर तो बराचसा सार्वजनिक हितासाठीं झाला असेल तर तो न्याय्य, नाहीं तर अन्यायाचा असें हल्लीं समजण्यांत येतें. एखाद्या व्यक्तीचा थोरपणा मोजण्याचें मोजमाप सुद्धां सध्या त्याची समाजसेवा हेंच आहे. एखादा मनुष्य पुष्कळ विद्वान् असेल, पण त्यानें आपली विद्वत्ता समाजाच्या उपयोगाला लागूं दिली नाहीं, तर तो अधमाहून ही अधम ठरतो. ज्या मानानें जो आपलें तन मन धन समाजाच्या हितासाठीं अर्पण करील, त्या मानानें तो थोर, मध्यम, किंवा अधम मानला जाईल. समाजाच्या हितासाठीं त्यानें व्यक्तिविषयक व कुटुंबाविषयक अशा दोन्ही हिताचा बळी दिला असल्यास तो उत्तम पुरुष गणिला जातो. एका व्यक्तिविषयक किंवा कुटुंबाविषयक हिताचा यज्ञ त्यानें केला असल्यास तो मध्यम गणिला जातो; आणि दोन्ही दिले नसल्यास त्याची गणना अधम कोटींत होते. याच्यापलीकडे जाणारा—ह्मणजे व्यक्तिविषयक किंवा कौटुंबिक हितार्थ जो समाजहितावर आघात करील तो अधमाच्याही पलीकडच्या ह्मणजे राक्षस कोटींत गणिला जातो. तो समाजाचा शत्रु समजतात; आणि व्यवहारांत बाह्यतः जरी यांची मान्यता राहिल्यासारखी दिसली, तरी खरोखर अंतर्यामीं प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत अशा माणसाविषयीं तिरस्कार वाटत असतो. सारांश, सध्याच्या समाजाच्या वर्तनाचा मूलमंत्र समाजहित साधन हा आहे, आणि याच मंत्राच्या धोरणानें हल्लींचे पुरुष, संस्था, व त्यांचीं कार्यें यांची चिकित्सा करणें अवश्य आहे.

---

## हिंदु युनिव्हर्सिटी.

खरोखर सध्या कोणी तरी एखादा अदृश्य, अमंगल, आणि अज्ञात अशा भयंकर पापग्रहाच्या पीडेंत आमचा हा देश सापडला आहे असें अनेकवार एकंदर स्थिति पाहिल्यावर मनांत आल्यावांचून राहत नाहीं. महत्प्रयासानें एखादी देशहिताची गोष्ट ह्मणून करावयाला जावें, तर अगदीं अनपेक्षित अशा दिशेनें देशहिताच्या कार्यावर विघ्नांचे पर्वत येऊन कोसळतात! आमच्या देशांत सध्या मोठी ओरड ह्मणजे औद्योगिक शास्त्रीय शिक्षणाबद्दलची आहे. ती लोकांची उणीव पुरी करण्यासाठीं मुंबईच्या दानशूर टाटा शेटांनीं आपली ३० लक्षांची इस्टेट देशाला अर्पण करून बंगलोर येथें शास्त्रीय संस्था काढिली, पण ती काढण्याचे मार्गांत किती तरी विघ्नें आलीं, आणि त्यातून ती संस्था कशी बशी पार पडली तरी तिची ग्रहदशा कोठें संपते आहे! संस्था सुरू झाली तर तिला मिळालेले मुख्य अधिष्ठाते असे अरेरावी कीं ती संस्था तिच्या स्थापकाच्या मूळ उद्देशाप्रमाणें चालणेंच अशक्य होऊन बसलें! सध्याच्या सरकाराधिष्ठित युनिव्हर्सिट्यांतलें शिक्षण एकांगी ह्मणून आपणास पाहिजे तसें योग्य शिक्षण देणाऱ्या स्वतंत्र युनिव्हर्सिट्या स्वतःच्या खर्चानें काढण्याचें हिंदु व मुसलमान समाजांनीं ठरवून मोठाले दोन फंड गोळा करून सगळी तयारी केली, तों हिंदुस्थान सरकारच्या शिक्षणखात्याचे अधिकारी सर हारकोर्ट बटलर यांचें पत्र येऊन थडकलें कीं तुमच्या युनिव्हर्सिटीला सरकारची मंजुरी मिळावयाची झाली तर ती अमुकच अटींवर मिळेल; आणि या अटी तर अशा आहेत कीं त्या मान्य केल्या असतां स्वतंत्र हिंदु युनिव्हर्सिटी स्थापन करण्याचा मूळ उद्देशच नाहींसा करून टाकल्यासारखें होईल. मुसलमान पुढाऱ्यांना त्या अटी मान्य झाल्या नाहींत आणि त्यांनीं आपला युनिव्हर्सिटी काढण्याचा बेतच परत घेतला. या धर्मविषयक युनिव्हर्सिट्या लोकांच्या वर्गणीनें स्थापन होत आहेत, तर त्यांचें नियंतृत्व सरकारी अधिकाऱ्यांच्या हातांत असण्याचें अगोदर प्रयोजनच नाहीं. त्यांना सनदीव एकसूत्रतेच्या कारणासाठीं प्रत्येक सार्वजनिक संस्थेवर दृष्टि ठेवावयाचीच असली तर निदान अत्यंत मर्यादित अशा स्वरूपाचा तो नियंत्रणाधिकार असावा हें उघड आहे. पण येथें पाहावें तों युनिव्हर्सिटीची इमारत बांधण्यासाठीं जागेची निवडणूक, परीक्षकांच्या नेमणुका अभ्यासक्रम निश्चित करणें, परीक्षांचें व शिक्षणाचें धोरण, जमाखर्च वगैरे सर्वच बाबतींत सरकार आपले हातीं मंजुरी ठेवणार, फार काय पण युनिव्हर्सिटीनें अमकेंच नांव घ्यावें, व अमुकच एक कॉलेज युनिव्हर्सिटीनें चालवावें, इतर कॉलेजें आपल्या संस्थेला जोडूं नयेत, हें सुद्धां सरकार सांगणार! असल्या सर्व बाबतींत सरकारची गुलामगिरी पतकरणारी युनिव्हर्सिटी लोकांच्या खरोखर हिताची कितपत होणार आहे तें दिसतेंच आहे, आणि त्याप्रीत्यर्थ लोकांनीं पोटाला चिमटा देऊन पंनास लाख रुपये देण्यांत तरी काय अर्थ आहे तें आह्मांस कळत नाहीं. यापेक्षां आमच्या मुसलमान बंधूंनीं पतकरलेला मार्ग खरोखर शहाणपणाचा आहे असें आह्मी समजतों. देशांतील एकून एक पत्राचें मत आमच्या सारखेंच आहे हें पाहून ही आह्मांस संतोष वाटतो.

---

## तुर्क लोक

विलायतच्या एका पत्राचा कांस्टांटिनोपल येथील बातमीदार लिहितो कीं तुर्कस्थानचे युद्धखात्याचे मंत्री हत्यारें, दारू गोळा वगैरे लढाऊ सामान नवीन तऱ्हेचें आणवून सैन्याला पुरविण्यासाठीं तुर्क पार्लमेंटाजवळ पांच लक्ष पौंडाची रकम मागत आहेत, व तें त्यांना मिळतील ही. कारण तुर्को--बाल्कन युद्धापासून तुर्क लोकाचे डोळे उघडूं लागले आहेत. तुर्क लोकांच्या डोळ्यांत इतके दिवस वडस वाढला होता तो बाल्कन युद्धाचे शस्त्र प्रयोगानें निघाला आहे. व या प्रयोगाचे वेळीं झालेला रक्तपात अनाठायीं झाला नाहीं. खजिन्यात इतका पैसा नाहीं ह्मणून युरोपियन राष्ट्राकडून कर्ज काढावें कीं काय असाही विचार चालला असल्याचें समजतें. कारण पैशाशिवाय नुसती तलवार परजण्यात कांहीं अर्थ नाहीं. तथापि युरोपियन राष्ट्रांपासून कर्ज काढण्याचे पूर्वी तुर्क लोकांनीं इजिप्तचा इतिहास नीट वाचावा अशी आमची शिफारस आहे.

---

## आधुनिक गुरु.

### अवस्था तिसरी

अंक २९ वरून पुढें चालू

### सिंहावलोकन

### थोडक्यांत शेवट

**उपसंहार**—एकंदर गुरुशिष्यसंबंधाचा काल तीन वर्षांचा. व तो संबंध पक्का नष्ट होण्यास क्षीणक्षीणतेचा काळ पुढें दोन वर्षें. पहिल्या दोन वर्षांत ही आनंद ग्रंथी वाढत असते. शेवटल्या वर्षी तिचा स्फोट होत असतो. स्फोट झाल्यावर तिला बरी करण्यांत व औषधोपचार करण्यांत आणखी एक दोन वर्षें जातात मिळून हा पंच वर्षें संबंध आहे. यांत प्रायः आह्मी सांगितलेलेच विकास दृष्टोत्पत्तीस येतात. रुग्णावस्थेंत स्फोटा पूर्वींच्या तीन वर्षांत शिष्यास कांहीं सुखें व कांहीं दुःखें, कांहीं व्यवहारिक लाभ व कांहीं व्यवहारिक हानि, कांहीं अध्यात्मिक प्रगति व कांहीं अध्यात्मिक अवनति प्राप्त झालेल्याच असतात. साधारण मनुष्यकर्तबगारीची मुदत स्थूल मानानें २८ वर्षांची असते. पहिलीं २१ वर्षें विद्यार्जन व धंद्याची निवड आणि नोकरी किंवा इतर व्यवसाय सुरु करण्यांत जातात. पुढील पंचवीस वर्षांनंतर मनुष्य टिकलाच तर तो मोठ्या कष्टानें आपली जीवदशा कंठीत असतो. तेव्हां हल्लींच्या परिस्थितींत मनुष्याच्या उत्साहाचें, मर्दुमकीचें व सुखशांतीचें आयुष्य ह्मणजे काय तें २९ वर्षांचें. त्यांतील ९ वर्षें तो दुर्दैवानें अशा सत्पुरुषांच्या तावडींत सांपडला असला तर व्यर्थ जाणें आणि इतकें करूनही त्यानें गृह सौख्यास आंचवणें व आपण सत्कृत्य करूं लागलों असतां त्या सत्कृत्याचें जागीं आपणास हें अनुपम सुख मिळालें हें त्यास वाटूं लागलें ह्मणजे त्याची जी कष्टमय स्थिती होत असेल तिची कल्पना आमच्यानें करवत नाहीं. ही झाली शिष्याची बाजू. आतां घेऊं गुरूची. याच पांच वर्षांच्या अवधींतील पहिल्या तीन वर्षांत जे ऐहिक लाभ शिष्यास प्राप्त असतील ते सर्व मीच घडवून आणले अशी प्रौढी मारण्यांत गर्क असतात. जो गुरु लाभ घडवून देतो तोच गुरु याच काळांतील हानिबद्दलही जबाबदार आहे हें उघड आहे, ज्याच्यांत अस्तिभाव आहे त्याच्यांत त्याचवेळीं नास्तिभाव अगर अभाव असणें शक्य नाहीं. गुरूनें न मागतां लाभ करून दिले तर गुरूनें निर्दयपणानें नुकसान कां होऊं दिलें! भवसागरांत गटांगळ्या कां दिल्या? अशी शिष्यास शंका येते ह्मणून पहिल्या गोळीनें गुण येत नाहीं. गुरु लाभाचा दाता असें शिष्यास पटत नाहीं. दुसरी गोळीः— पहिल्या गोळीनें गुण येत नाहीं असें पाहून गुरु अनुपान बदलतात. प्रत्येक मनुष्य थोडा फार भोळसर असतोच. इतर माणसाशीं तुलना करितां जो फरक दिसेल तो न्यूनाधिक्याचा. बरेच वेळां दुसऱ्यां करितां आह्मी वेडगळ आचार पाळतों असें तो तोंडानें ह्मणत असतो मात्र. परंतु तो स्वतः त्याच भाराखालीं दबलेला असतो. ही वृत्ति तीव्र करितां येते किंवा विचार कर करून, कार्य कारणभाव, निसर्ग देवतेचे नियम, प्रमाण, अनुमान, वगैरेंच्या सहाय्यानें मंद करितां येते. पण प्राचीन काला पासून चालत आलेल्या असंबद्ध भोळसरपणाचें वजन प्रत्येक माणसावर थोडेंना थोडें असतेंच. गुरु लोक वियुक्त शिष्याच्या धर्म भोळेपणास जागृत करण्यासाठीं त्याच्या कानावर येईल अशा रीतीनें त्यास भय वाटेल असे प्रयोग सुरु करितात. हे प्रयोग पुष्कळ आहेत. सर्वांचें वर्णन करणें कठीण आहे. तरी मासल्यासाठीं ह्मणून कांहीं सांगतों. आपल्या लोकांत दृढ

समजूत आहे कीं एकदां गुरु केला कीं त्यास सोडतां येत नाहीं. सोडल्यास देवतेचा कोप होतो. लोक मंत्रोपदेश घेतनाहींत तो तरी याच भीती तत्वामुळें. लोकांस वाटत असतें लाभ न झाला तरी पुरवलें. मोक्ष न मिळाला तरी पुरवलें. देवता प्राप्ति झाली नाही तरी हरकत नाहीं. परंतु देवतेचा कोप मात्र न होवो. पूर्वपार अनुभव आहेच कीं शिष्याची तो भोळसर असेल तरच मंत्र घेण्यापर्यंत मजल येते. भोळसरपणा, भावना, कल्पना आणि निश्चय यांतील भेद फार थोड्यांस कळतो. हा भेद आम्ही पुढें एकादे वेळीं आमचे पत्रांत देऊं. गुरुनाच जर देवतेचें यथार्थ स्वरूप कळलें नाहीं तर ते शिष्यांस भिवडवतील ह्यात आश्चर्य तें कोणतें. देवाबद्दल आपल्या समाजात आणि विशेषत ब्राह्मणात अशा कल्पना असाव्या ह्याची कोणाही देवभक्तास लाज वाटावी. देव कोपून कोणाचा नाश करितील, कोणाचा क्षय करितील, तर ते देवच नाहींत, त्यांची करुणाकर, शरणागत रक्षक, दुर्बल प्रतिपालक, इत्यादि विशेषणें काढून घेतलीं पाहिजेत व त्याऐवजीं त्यांस कठोर, दुर्बलघ्न, भक्तहिंसक इत्यादि विशेषणें दिलीं पाहिजेत. ज्या देवाची उपासना केली असतां ते प्रसन्न होण्याची मारामार ते देव इतके क्षुद्र कीं त्यांच्या मंत्र फुंकणाऱ्यांचा अपमान केला कीं ते रागावले व लागले शिष्यांच्यामागें. आमची देवाची कल्पना यापेक्षां भिन्न आहे. आमचे देव शाकिनी, डाकिनी, राक्षस, वृक, व्याघ्रादिकांप्रमाणें क्रूर नसून मंगलदायक करुणामय आणी शुभप्रद आहेत. बरें शिष्यांनीं असा अक्षम्य अपराध तरी केला कोणता? तर ज्या देवतेचा मंत्र द्या ह्मणून एकाद्यास ह्मटलें ज्या देवतेचा मंत्र ज्यानें दिला त्याच्या मानसिक दास्यत्वांत रहाण्यास शिष्य तयार नाहीं हाचना? श्रेष्ठ गुण मंत्र देण्यांत नसतात. ते शिलांत, वर्तनांत आणि ज्ञानात असतात. अवगुणांना किंबहुना दुर्गुणांना शिष्य सद्गुण ह्मणत नाहीं हाच त्याचा अपराधना? या अपराधाबद्दल देवतेचा कोप व्हावा अशाच देवतांची उपासना ज्या गुरुनें दिली असेल त्यानें उपासनाच दिली नाहीं. त्यानें देवता उपासना न देतां तामसी राक्षसोपासना दिली असेंच ह्मणावें लागेल. बरें गुरु सोडलाच तर देवतेचा अपमान तो कोणता? फार झालें! देवतेची जावें करावयाची आराधना आणि तिच्यापासून प्राप्त करून घ्यावी तिचा कोप बरें. गुरु तरी कोणाला समजतो? ज्या गुरूंस शिष्यावर छाप ठेवण्याशिवाय दुसरी योग्यताच नाहीं, जे कान फुंकले ह्मणून गुरु होतात काय? जे आपणास देवतेपेक्षां श्रेष्ठ समजतात ते अमानुष लोक गुरु होऊं शकतात काय? सर्वच खुळ हें खूळ समाजांतून वेळींच घालविणें फार हितकर आहे.

---

## मध्य प्रांतांतील फळफळावळ

(सोमवार ता० १५ माहे जून १९१४ चे अंकावरून समाप्त.]

हा धंदा चांगल्या पद्धतशीर रीतीनें हातीं घेतल्यास त्यांत व्यापारीदृष्ट्या चांगलें यश येण्याचा संभव आहे. नागपूर, छिंदवाडा, जबलपूर, दमोह आणि उमरावती ह्या जिल्ह्यात संत्रें, नारिंग आणि अशींच दुसरीं फळें होऊं शकतील. छिंदवाड्याच्या जमीनीचा मासला दक्षिण कॅलिफोर्निया संत्र्याच्या पद्धतशीर लागवडीचें माहेरघर येथें पाठवून शास्त्रीय रीत्या पृथक्करण करून तपासविली होती. परीक्षेअंतीं असें आढळून आलें कीं ही जमीन तिकडील उत्तम जमिनीच्या बरोबर आहे. मात्र या जमिनींत फॉस्फेट आणि मॅग्नेशियम थोडे कमी आहेत चांगल्या पद्धतशीर व्यवस्थेनें संत्र्याचे बगीचे लावण्याची सुरवात करण्यास नागपूर छिंदवाडा व जबलपूर हे तीन जिल्हे योग्य आहेत. लूज जॅकेट टॅनेरिन फार लांब पर्यंत प्रवास करूं शकत नाहीं आणि त्याची फार खराबी होण्याचा संभव असतो अशी त्याचे बद्दल तक्रार करण्यांत येते. वॉशिंगटन नाव्हेल, जाफा, माल्टा आणि इतर बीज रहित फळांच्या कलमा आणवून त्या इकडे कलमा बांधून उपाय कां करून पाहूं नये तें समजत नाहीं. पुनः हिंदुस्थानांत हंगामाशिवाय एप्रिल, मे व जून या महिन्यांत चांगलें संत्रें करण्याचा कटाक्ष असतो आणि या वेळीं या फळाची चहाही फार होते. याचे सिध्यर्थ व्हॅलेशिया आणि लेट व्हॅलेशियाचीं कलमें आणून तीं काळजीपूर्वक बांधावीं लागतील. कॅलिफोर्नियामध्यें हीं व्हॅलेंशिया संत्रीं मे, जून व जुलै या महिन्यांत विकतात. संत्र्यांच्या सुधारणेशिवाय लिंबाचीं लागवड व्यापारी तत्त्वावर हातीं घ्यावी, ही लागवड फार थोड्या काळात चांगली किफायत देईल यांत शंका नाहीं. लिंबाच्या सत्वाकडे आणि सायट्रीक ॲसिड करण्याकडे उपयोगी पडणाऱ्या "कागदी" लिंबाकडे देखील चांगलें लक्ष पुरविलें पाहिजे. सध्यां हिंदुस्थानांत होणाऱ्या पॉमेलोच्या सुधारणेकडे ही लक्ष देणें अवश्य आहे. **आंबा:–** मध्य प्रांतांत या फळाकडे कांहींसें लक्ष पोंहचलें आहे. परंतु तें व्यापारी तत्वावर मात्र नाहीं, बहुतेक बागवानांच्या बागेंत काहीं आंब्याचीं झाडें असतात. ते त्यांची विशेष काळजीही घेत नाहींत. हंगामांत स्थानिक मक्तेदारांना झाडें लिलाव करून विकून टकतात. आणि हे मक्तेदार दारोदार नेऊन हीं फळें विकतात. एकदां झाडांना चार पांच वर्षांनीं फळें येऊं लागलीं ह्मणजे त्यांची मुळींच काळजी घेत नाहींत. या नामांकित फळाची जितकी काळजी घेतली तितकी थोडीच. विवक्षित ठिकाणीं होणाऱ्या जातींचा अभ्यास करून व्यापारी धोरणावर छिंदवाडा, नागपूर व जबलपूर ह्या जिल्ह्यांत लागवड करणें सुरु करावयास पाहिजे. कलमें बांधण्याचें कामही कांहींच होत नाहीं. तेंही हातीं घ्यावयास पाहिजे.

**पेरू;–** हें फळ सर्व प्रांतभर होतें. याचें झाड कणखर असल्यामुळें फळाच्या बहाराचे वेळीं काय पाणी देण्यांत येतें त्या शिवाय त्याची फारच थोडी काळजी घेण्यात येते. व्यापारी धोरणावर या फळाची लागवड होते असें क्वचितच ह्मणतां येईल. हें फळ हिवाळ्यांत पिकतें. कधीं कधीं उन्हाळ्यात पाणी देऊन दुसरा बहार पावसाळ्यांत आणितात, हा बहार पहिल्यानंतर लागलीच पण थोड्या प्रमाणांत येतो. या फळाची सुधारणा करण्याचे आणि त्याची व्यापारी धोरणावर लागवड करण्याच बाबतींत पुष्कळच व्हावयास पाहिजे. छिंदवाडा, नागपूर व जबलपूर जिल्ह्यात लागवड करावी आणि सुधारलेले प्रकार प्रांताचे बाहेरून आणावे. एकदां सुधारलेले उपाय आमलात आले ह्मणजे हें अगदीं सुलभ रितीनें होणारें फळ असल्यामुळें त्यांचा प्रसार सर्व इतर जिल्ह्यांत होईल यांत संशय नाहीं.

**अननस:–** मध्य प्रांतांत फार थोड्या ठिकाणीं होण्यासारखें असें हें फळ आहे रायपूर येथील सरकारी बगीचांत सालोसाल या फळाचें थोडें पीक काढितात. आणि हिंदुस्थानांत होणाऱ्या उत्तम अननसाची बरोबरी हें फळ करितें.

तरी पण रायपूर कडील या फळाच्या लागवडीकडे जसें लक्ष पोंचावयास पाहिजे तसें पोंचलें नाहीं. रायपूरकडे खताचा तोटा नसल्यामुळें आणि पाण्याचा चांगला पुरवठा लवकरच होण्यासारखा असल्यामुळें आणि फळही सुलभ असल्यामुळें या जिल्ह्यांत या फळाची लागवड व्यापारी धोरणावर हातीं घेण्यास हरकत नाहीं. या फळाला उत्तम जमीन ह्मटली ह्मणजे थोडीकाळी, थोडी पांढरी (Laterite) अशी असून पाण्याचा निकाल चांगला असावा आणि मुबलक खत व वरचेवर पाणी देत जावें. रायपूरमध्यें होणाऱ्या जाती शिवाय इतर जाती कांहीं निवडक ठिकाणीं लाऊन पहाव्या.

**सप्तालू व प्लम:–** पचमारी येथील अगदी थोड्याशा क्षेत्राखेरीज या फळांच्या लागवडीची हेळसांड झालेली आहे. ही फळें फार चांगल्या प्रकारचीं अशीं पचमारी येथें पिकतात. पण या खेरीज व्यापारी धोरणावर फळें उत्पन्न होतील अशा लागवडी करण्यासारखें विशेष नाहीं. छिंदवाड्याची जमीन दक्षिण कॅलिफोर्नियाच्या जमिनीशी ताडून पाहिलेली आहे तेव्हा छिंदवाड्याच्या जमिनीवरून व हवामानावरून पहातां योग्य व पद्धतशीर जोपासना केल्यास हीं फळें येथें चांगलीं होतील यात काडी इतकीही शंका नाहीं. हल्लींच छिंदवाडा येथें थोडीं आणि आवाळलेलीं पण उत्तम फळें देणारीं अशी झाडें आहेत. तर मग काळजी पूर्वक लागवड केल्यास चांगलें व किफायतीचें उत्पन्न काढतां येईल या गोष्टीस वरील उत्तेजक प्रयंतरच आहे.

**द्राक्ष:–**हें फळ पावसाळा उघडल्यावर पिकेंत अशी याच्या लागवडी विरुद्ध या प्रांतात ओरड करण्यांत येते. हें फळ होण्यास आशाजनक स्थान असेल तर तें डोंगर सपाटीवर असलेलें छिंदवाडा हेंच होय. हवामान चांगलें असून पर्जन्यवृष्टी ही साधारणपणें मध्य प्रांतांतील इतर जिल्ह्यापेक्षा कमी असते. वऱ्हाड व खांडवा यांचें हवामान हें फळ होण्यास फारसें अनुकूल नाहीं. तरी पण खांडवा जिल्ह्यांतील असिरगड किल्याचे खालीं या फळाचें उत्पन्न अलीकडे होऊं लागलें आहे आणि तें थेट मुंबईचा बाजार गाठूं लागलें आहे. फळ आंबट असून खाण्यालायक नसतें हें खरें परंतु हा दोष त्याच्या वाईट जाती आणि पद्धतवार लागवडीच्या आभावा आहे. छिंदवाडा आणि खांडवा या जिल्ह्य या फळाची लागवड पद्धतशीर व व्यवस्थेश रीतीनें करावयास पाहिजे.

**अंजीर** हें फळ डोंगर सपाटीवर अ केल्या छिंदवाडा, बैतूल आणि सिवनी जिल्ह्यांत चांगलें होईल. खाजगी बगीच्य तून दृष्टीस पडणाऱ्या झाडांवरून पहातां फळाकडे लक्ष पोंचाविण्यालायक आहे. नि डक जाती आणवून त्याची लागवड कर पाहिली पाहिजे. कलमें बांधण्याचाही प्रय करून पाहिला पाहिजे.

**सिताफळ:–**या प्रातांत हें फळ फा सुलभ प्रकारें होणारें आहे. हें फळ सप्टें व आक्टोबर महिन्यांत पिकतें. हल्लीं त्या फारच अनास्था होत आहे. परंतु ह्या रु कर फळाची लागवड सुधारण्याची जित काळजी घ्यावी तितकी थोडीच आहे.

**केळ:–** अलीकडे कांहीं वर्षें हें फ चांगलें करण्याकडे कांहींसें लक्ष पुरविण्या येत आहे. पण व्यापारी धोरणावर त्या उत्पन्न करण्यास पुष्कळ अधिक प्रय करावयास पाहिजे. हल्लीं मध्य प्रांतांती बाजारांत दिसून येणारीं केळीं बहु करून मुंबई व कलकत्ता या बाजू असतात. परंतु हें फळ मध्य प्रांता होत असून अशी स्थिती कां असावी कळे. या फळापासून किफायत होण्यासा याच्याकडे जास्त लक्ष पोंचवून आधि काळजी मात्र घ्यावयास पाहिजे. सुधारलेल्य जातींपैकीं निवडक प्रकार आणवून प्रांतीं त्याचे मळे लावावयास पाहिजे. फळ चांगलें होण्यास पद्धतशीर मळे करू खत देणें व पाणी पोंचाविणें या मुख गोष्टी आहेत

**पपै:–** हें फळ मध्यप्रांतांत सहज व चांग होतें. तेव्हां त्या कडेही लक्ष पुरवून त्याच पद्धतशीर जोपासना करणें जास्त आ उष्ण कटिबंधांत व समसीतोष्ण कटिबंधां होणाऱ्या इतर फळांकडे ही दुर्लक्ष करू उपयोग नाहीं.

### सर्व साधारण सूचना.

आंबा पेरू आणि सायट्रस फळें यांच लागवड पद्धतशीर जोपासना व तसेंच त्यांचें सुधारलेल्या वाढविण्याचे आणि त्यांस पाणी देण्याचे प्रयोग नागपूर येथें सुरु करावे. असेच सिताफळाचे प्रयोग रायपूर येथें व्हावेत आणि छिंदवाडा येथें, सिताफळा खेरीज सर्व फळांची लागवड करण्यास सुरवात व्हावी.

कॅलिफोर्नियामध्यें फळांच्या लागवडी जें यश आलें आहे त्याचें बरेंचसें श्रे सहकारी पतपेढ्यांच्या घटनेकडे आहे आणि अशाप्रकारचे प्रयत्न या प्रांत कां होऊं नयेत याचें कारण समजत नाहीं. फळाच्यालागवडीसाठीं जिल्हा सह कारी मंडळया स्थापून त्या सर्वांना सल्ला देण्यासाठीं व इतर कामकाजासाठीं एखाद्या निवडक ठिकाणीं एक मध्यवर्ती मण्डळ स्थापावें. शेतकीमध्यें या प्रांतानीं अलिकडे थोड्यावर्षांत ज्या मजलावर मजला मारल्य आहेत त्यावरून पाहतां हें फळांच्या लाग

मण्डळही या प्रांतीं थोड्याच यशस्वी कां होऊं नये याचें कळत नाहीं.

ंसाठीं बाजारः— खरें उत्पात्ती- नें मागपूर तें टाकून मुंबईच्या त हल्लीं नागपूरचीं संत्रीं मागगें वित्र आहे. आणि आतां तर नाग- थें मार्केट बांधण्यांत येणार आहे तोच खरा बाजार होईल असा पाहिजे.

## अबकारी पत्रव्यवहार

१९१२ सालीं स्टेट सेक्रेटरी लॉर्ड चिकडे मद्यपाननिषेध कमिटीचें एक न गेलें होतें. त्यांच्यामध्यें झालेल्या धांनें पुढें स्टेटसेक्रेटरी व हिंदुस्थान यांच्यामध्यें झालेला पत्रव्यवहार न सरकाराकडून गेल्या आठवड्यांत करण्यांत आला आहे. हा पत्र- मद्यपान निषेधक चळवळींच्या ींना चांगला उत्तेजन देणारा आहे. वर्षांपूर्वीं मद्यपाननिषेधक मंडळी ह्मणजे खात्याच्या कामाला निष्कारण करणारी उपद्व्यापी मंडळी आहे सरकारी अधिकाऱ्यांची समजूत होती, अबकारी कमिशनर आपल्या वार्षिक या मंडळीला फटकारे मारण्यांत मानीत असत. पण हळूं हळूं तिनें अधिकाऱ्यांना आपल्या ह्मणण्याची पटविण्यांत यश संपादन केलें आहे. त्रव्यवहार या विधानाची सत्यता करणारा आहे. अबकारी खात्याचें वाढतें असलें तरी मद्याचा खप वाढला आहे असें नाहीं असे सरकारी अधिकारी आतां मद्याचा वाढत्या प्रमाणावर आहे ही गोष्ट करून तिच्या बद्दल अनुगाळीत आहेत. ढत आहे तेव्हां अतां तो कोणत्या बंद करतां येईल येवढाच काय राहिला. दारूचा मक्ता द्यावा ग्गाळण्यावर ठराविक फी ठरवावी प्रश्न आहे. हिंदुस्थानांतले अधि- मक्त्याला अनुकूल आहेत. पण सर्वांचें मत मद्यपान निषेधक ाणें ठराविक फी ठेवण्याला अनुकूल आहे. १९०६ सालीं नेमलेली कमिटी मक्तापद्धतीला अगदीं विरुद्ध मत अतां सर्वमान्य होऊं पाहत संतोषाची गोष्ट आहे. त्याच्प्र- ग्रागारमंडळ्यांचा उपयोग जितका पावयास पाहिजे तितका सरकारी करून वेत नाहींत व सदर ा हातीं नांवाला सुद्धां सत्ता ठेविली वाईट आहे असें मद्यपान निषेधक प्रणत आली आहे. लॉर्ड क्रू तसेंच वाटत आहे, व एकदम तरी हळूंहळूं या कमिट्यांच्या ता देण्याविषयीं स्टेट सेक्रेटरी शिफारस केली आहे. सारांश, वहार ह्मणजे एका दृष्टीनें मद्यपान डळीच्या नैतिक विजयाची पताकाच झटलें असतां अत्युक्ती होणार

•

ंधानें किहितांना एका देशी संस्था- नावात्सल्यानें प्रेरित होऊन घालून दिलेल्या उत्कृष्ट उदाहरणाचा उल्लेख केल्या- वांचून आमच्यानें राहवत नाहीं. आपल्या प्रजेनें मद्यपी होऊं नये अशी ब्रिटिश सर कारची ही निःसंशय मनःपूर्वक इच्छा आहे; परंतु अबकारीचे दांडगे उत्पन्नाचा मोह सर- कारास तोडवत नाहीं. पण म्हैसूरच्या महा- राजांनीं प्रजेच्या कल्याणापुढें पैसा तुच्छ मानून अबकारी खातें बंद करावें लागलें तरी तसें करण्याची आपली तयारी आहे असें भर दरबारांत जाहिर केलें. म्हैसूर सर- कारची या बाबतींत प्रशंसा करावी तेवढी थोडी आहे. म्हैसूर संस्थानचें अनुकरण इतर संस्थानांनीं केल्यास आज जवळ अर्धे हिंदु- स्थान मद्यपानासारख्या भयंकर राक्षसाच्या जबड्यांतून वाचेल.

## यूरोपखंडांत नवीन युद्धाला प्रारंभ.

ऑस्ट्रिया हंगेरीचे अभिषिक्त राजाराणी सर्व्हियामध्यें गेले असतां तिकडे त्यांचा अमानुष रीतीनें खून करण्यांत आला हें वर्तमानपत्रें वाचणाऱ्यांस माहित आहेच. हा खून व्यक्तिविषयक द्वेषाचा अगर मत्सराचा नसून त्याचे बुडाशीं राजकारण आहे असें आस्ट्रिया सरकारनें गृहित धरून तें आतां सबंध सर्व्हिया देशाचा जाब मागण्यासाठीं युद्धास सिद्ध होऊन लढाईला प्रारंभही झाल्याच्या बातम्या येऊं लागल्या आहेत. या राजव्यक्तिच्या खुनामुळें आस्ट्रिया देश इतका चिडून गेला आहे कीं त्यानें सर्व्हियाचीं पाळें मुळें खणून जगांतून नाहींसाकरून टाकण्याचा निश्चय केला आहे. यापायीं स्वतःचा देशही गेला तरी हरकत नाहीं पण सर्व्हियाला अगदीं चिरडून नाहींसा करावा इतका ऑस्ट्रियास संताप येऊन तो इरीस पेटला आहे. या लढाई मुळें युरोपांत तर काय पण बहुतेक सर्व जगात मोठी गडबड उडून राहिली आहे. युरोपांतील मोठमोठे देश या दोहों पैकीं कोणाला कोण जाऊन मिळतात आणि या धिनगीचा कवढा वणवा पेटतो तें आज सांगतां येत नाहीं. मात्र इतकें खरें कीं या लढाईचे व्यापारावर दृश्य परिणाम होऊं लागले आहेत.

# वऱ्हाडवृत्त

**हवामान**—गेल्या रविवारीं उघाड पडली ती बहुतेक आठवडाभर होती ह्मणण्यास हरकत नाहीं. क्वचित् मधून मधून पावसाची भुर भुर पडून शनिवारीं रात्रीं थोडा पा- ऊस झाला व काल च्या रविवारीं पुनः सूर्यदर्शन होऊन हवा साधारण स्वच्छ झाली. पिकांची वाढ समाधानकारक होत असून त्यांची स्थिती उत्तम आहे. निंदणी वगैरे कृषिकर्माचीं कामें सुरू आहेत. रोगराई विशेष नाहीं.

**अभिनंदनः**—मागील अंकीं आह्मी आशा प्रदर्शित केल्याप्रमाणें जमिनदारांतर्फे उमरा- वतीचे सुप्रसिद्ध आण्णासाहेब जोशी हेच कौंसिलदार निवडून आले. या त्यांच्या यशाबद्दल त्यांचें आह्मी अंतःकरणपूर्वक अ- भिनंदन करितों. हा बहुमान उपभोगण्यास व त्यांचे कामात पूर्ण यश संपादण्यास त्यांस पूर्ण आरोग्य व मार्कंडेयाचें आयुष्य ईश्वर देवो!

√ सरकारातर्फे प्रांतिक कौंसिलांत खालील गृहस्थ नेमण्यांत आले आहेतः—

सारंगदचे संस्थानिक, देउळघाटचे सुप्र- सिद्ध खानबहादूर नबाब महमद सलिमुल्लाखा, सर बिपीन कृष्णबोस आणि सर कस्तुरचंद डागा या चार गृहस्थांचें अभि- नंदन करितांना वऱ्हाडांतील नामांकित व सर्वप्रिय थोर गृहस्थ नेमण्यांत आलें हें कळवितांना विशेष आनंद वाटतो.

√ **पहिली बैठक** — मध्यप्रांताच्या प्रांतिक सरकारच्या नवीन कौंसिलची पहिली बैठक चालू महिन्याच्या १७ व्या तारखेस नागपूर मुक्कामीं होणार असल्याचें कळतें.

---

## नोटीस

अज्यान मर्द पांडु गणेशपुरे रा. कारंजेश्वर पो. मुर्तिजापुर ईस.

पांडु वा॥ दर्याजी गणेशपुरे कुणबी रा अंभोर ता. पो. मूर्तिजापूर यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं मला जी वत- नदार छापखान्यातून नोटीस नंबर ७६४ ता. १-७-१४ इसवी रोजीं दिली ती मला ता. ३१-७-१४ इसवी रोजीं पोहचली त्यावरून तुला या नोटीशीनें कळवितो कीं तूं दिलेली नोटीस अजीबात खोटी आहे. आह्मी तुला नेण्या करितां तीन चार वेळां आलो होतो तूं आमचे येथून गेली तेव्हां मानमोडे मिष करून गेली होती व तूं तेथें राहून वाईट लोकांचे नादीं लागून तूं आमचे वर विद्यमान रा. रा. अबदुल सतार स. डि. मा० कोर्ट आकोला कि. फौ. मु. नं. २ सन. १९१४ कलम ४८८ प्रमाणें तूं आमचेवर फौजदारी केली. त्या फौजदारीची ता. २०-६-१४ होती तिचा निकाल तारीख १९-७-१४ इसवी रोजी बार्शीटाकळी मुकामी साहेबानीं अर्ज नामंजूर केला तरी इतके करून मी तुला नांदविण्यास तयार आहे. तूं ज्यावेळेस माझे येथून गेली त्या वेळेस दागीनें अंदाज रुपये १०० शंभरचे होते तरी माझें तुला वजाऊन सांगणें आहे कीं मी जीवंत असतां माझे लेखी फारकती वांचून तूं जर मोहतराचा नवरा करशील तर तूं आणि तो सरकारचे व पंचाचे गुन्हेगार व्हाल व मी तुह्मा दोघांवर फौजदारी खटला करीन हे पक्के समजावे एक तर तूं माझें येथें नांदण्यास यावे मी तुला वागविण्यास तयार आहो तसें करणें नसल्यास माझ्या दागिन्याची किंमत रुपये १०० आणि लग्नाचे खर्चाबद्दल लागलेले रुपये ४०० चारशें एकूण रुपये ५०० पांचशें मला देऊन पंचासमक्ष माझी लेखी फारकती घेऊन तूं मोकळें व्हावें तूं वाईट मनुष्यांचे संगतीस लागून मला व्यर्थ त्रास दिलास करितां या नोटीशीचा व फौजदारीचा खर्च तुजवर असे कळावें ता. १-८-१९१४

सही

पांडु दा॥ दर्याजी गणेशपुरे
कुणबी नि. आंगठा अंगे

नो. नं. १७

---

## नोटीस

विद्यमान—सिनीअर सबजज साहेब कोर्ट आकोला

यांचे कोर्टात सक्सेशन सरटीफीकेट नं. ६ सन १९१४ चौ. ता. १९-८-१४

अर्ज सकशेषन सर्टिफिकीट मिळण्याकरितां सर्वत्र लोकांस कळविण्यात येते कीं सकऱ्या वा॥ चंद्या महार रा. आकोट फाईल यानें सरटीफिकेट मिळणे- करितां आमचे कोर्टात तारीख २-५-१४ इसवी रोजीं अर्ज दिला आहे व त्याची चौकशीची तारीख १९-८-१४ ची नेमली आहे. तरी त्यांची कांहीं अर्जाविरुद्ध तक्रार, असेल त्यानीं आमचे कोर्टात तारीख १९-८-१४ रोजीं सकाळचे १० वाजतां हजर राहावें तसें न केल्यास अर्जदारास सक्सेशन सर्टीफीकेट दिलें जाईल व मग कोणतेही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें तारीख ३०-७-१४

R. N. Trivedi.
सीनीअर सबजज आकोला

नो. नं. १८

## नोटीस

वि. सिनिअर सबजज सा० कोर्ट आकोला याचे कोर्टात सक्सेशन सार्टीफि- कीट नं० १० सन १९१४ चौकशी तारीख २६-९-१४ इ.

अर्ज सक्सेशन सर्टिफिकीट मिळण्याकरितां सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं, बनाई मर्द बापूजी पाटील कुणबी रा० किनखेड कामटें ता० मूर्तिजापूर जि० आकोला इनें सर्टिफिकीट मिळण्याकरितां आमचे कोर्टात ता० १८-७-१९१४ इ रोजीं अर्ज दिला आहे व त्याची चौकशी तारीख २६-९-१४ आहे. तरी ज्यांची कांहीं अर्जा विरुद्ध तक्रार असेल त्यांनीं आमचे कोर्टात ता० २६-९-१४ इ. रोजीं सका- ळचे १० वाजतां हजर राहावें तसें न केल्यास अर्जदार ईस सक्सेशन सर्टिफिकीट दिलें जाईल व मग कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें. ता० २८-७-१४ इ.

R. N. Trivedi.
सि० सबजज आकोला

नो. नं. १९

## नोटीस

राजमान्य राजश्री रामु वा॥ परशराम आगे सोनाजी वा॥ हरी अल्लम पा० क० चुकता रामु वा॥ परशराम इंगळे जात माळी राह- णार मौजे आलेगांव ता० बाळापूर यासीः—

नोटीस देणार मोहारमल कस्तुरचंद व दगडूलाल हाजारीमल अ० पा० क० चुकता मोहारमल कस्तूरचंद मारवाडी राहणार आले- गांव ता० बाळापूर जिल्हे आकोला नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मोहारमल चुन्नीलाल या नांवची दुकान मालक मोहारमल कस्तु- रचंद या नांवानें ता० ३।१।९।११ इसवी रोजीं रुपये ४०० चारशेचें गहाणखत लिहून दिलें आणि मोहारमल कस्तुरचंद व दगडू- लाल हाजारीमल अ० पा० क० आई धापी- बाई या नांवानें ता० १०-९-१९११ इ॥ रोजीं रु० २०० चें गहाणखत लिहून दिलें.

नोटीस
... साहेब
... आकोला
... सरटीफिकेट नं. ६
... १९१४
... फिकीट मिळण्याकरितां
... कळविण्यांत येते कीं
... महार रा. आकोला
... केट मिळणे-
... तारीख २-५-१४
... आहे व त्याची
... ८-१४ ची नेमली
... विरुद्ध तक्रार
... कोर्टात तारीख
... -१० वाजतां
... अर्जदारास
... दिलें जाईल. व
... तक्रार ऐकली
... तारीख ३०-७-१४
R. N. Trivedi.
... सबजज आकोला

... सबजज सा० कोर्ट
... सक्सेशन सार्टीफि-
... १९१४ चौकशी
... फिकीट मिळण्याकरितां
... येते कीं, बनाई
... कुणबी रा० किनखेड
... जि० आकोला
... मिळण्याकरितां आमचे
... १९१४ इ. रोजीं अर्ज
... चौकशी तारीख
... ज्यांची कांहीं
... असेल त्यांनीं आमचे
... ४ इ. रोजीं सका-
... हजर राहावें तसें न
... सक्सेशन सार्टीफिकीट
... कोणत्याही प्रकारची
... नाहीं कळावें
R. N. Trivedi.
... सबजज आकोला

... वा॥ परशराम आगे
... पा० क० चुकता
... जात माळी राह-
... बाळापूर यासीः—
... हारमल कस्तुरचंद व
... अ० पा० क० चुकता
... मारवाडी राहणार आले-
... आकोला नोटीस
... मोहारमल चुन्नीलाल
... मोहारमल कस्तुर-
... ३।१।९।११ इसवी
... गहाणखत लिहून
... कस्तुरचंद व दगडू-
... ता० क० आई धापी-
... १०-९-१९११ इ॥
... गहाणखत लिहून दिलें.

या दोन गहाणखताची फेड तुमचेकडून झाली नाहीं. फक्त रु० ४०० चे गहाणखतात तुह्मी रु० ४५ पंचेचाळीस वसूल मुदलांत दिला आहे. अशी आमची समजूत असल्यामुळें तितकी रक्कम आमचे वहींत आह्मा जमा केली लेकी आहे आणि पुढें वरील दोन्ही दस्तऐवजाची फेड तुमचे कडून होत नसल्यामुळें तुह्मी नवीन गहाणखत हिशेब करून करून यावें असें ह्मणालें ह्मणून आह्मी तुमचे पासून दोन्ही दस्तऐवजाचा हिशेब करून नवीन गहाणखत ४५ पंचेचाळीस रुपये वसूल देऊन ता० १० माहे जून सन १९१४ इ. रोजीं लिहून नोंदून ता. १७ जून १९१४ इ. रोजीं घेतलें ते रुपये दोनहजाराचे आहे. हा दस्तऐवज लिहितेसमयीं आह्मी तुह्मास वसुलाची पावती मागितली असता तुह्मी ती गहाळ झाल्याचें कळविलें. आणि त्यावेळीं तुह्मी सांगितलें कीं, तुमचे वहींत जो वसूल जमा असेल तो मजरा ध्यावा ह्मणून मी रु० ४५ वसूल दिला आणि नवीन गहाणखत रु० २००० हजाराचें लिहून नोंदून घेतलें. आणि तुह्मास सांगितलें कीं वसुलाची पावती सांपडल्यावर त्यात चुकभूल असल्यास देऊं घेऊं. तर आता तुह्मास या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, तुह्मी पावती दाखवावी. यात पंचेचाळीस रुपय पेक्षा अधीक रुपये निघाल्यास तितके नवीन दोन हजाराचे गहाणांत वसुलांत जमा करूं. अगर तुमची इच्छा असल्यास तुह्मास नगदी देऊ ही नोटीस दिली सही ता० २९।७।१४ मुकाम आकोला

सही ( मारवाडींत )

जोहारमल कस्तूरचंद व दगडूलाल हजारीलाल अ० पा० क० चुलता जोहारमल कस्तूरचंद मारवाडी स० आळेगाव ता० बाळापूर

नो. नं. २०

---

## नोटीस

रा. रा. शामजी वा॥ काशीबा सोनार रा. टाकळी उमरावती यास-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस करण्यांत येते कीं माझी बायको नामें सेवंती मर्द तुकाराम सोनार रा. उमर्डा ता० मूर्तिजापूर ही माझे घरून तारिख २६-१४ रोजी रात्री १२ वाजतां दुकानातील पेटीतून ४ तोळे सोने व तिच्या अंगावरील डागडागीन्यासह ह्मणजे तोड्याचा जोड वजन तोळे ६० चा व करणफुलाचा जोड वजन ३ मासे व नथ १ यासह मला न विचारतां पळून गेली आहे व ती हल्लीं तुमचे घरी आहे तरी तुह्मास या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसाचे आंत माझी बायको वरील सोन्यासह व डागिन्यासह आणून वाल्यावी तसे न केल्यास रीतीप्रमाणें काम चालविण्यांत येईल कळावें तारिख २१-७-१४ दस्तुर गणपत भैराम रा. आकोला.

सही

तुकाराम गोविंदा सोनार

द० खु०

नो. नं. २१

---

## नोटीस

रा० मोतजी वा० भगवान पाटील रा० पाळोधी ता० खामगांव जी० बुलढाणा

यांस

खाली सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास मौजे पाळोधी ता० खामगांव येथील माझे मालकीचे शेता पैकीं ३ तीन एकर जमीन रुपये ६०० ऐवजी सहाशे अक्षरी ता० १० माहे एप्रील सन १९१४ इ० रोजीं विकत दिली त्याचे भरण्यापैकीं रु. २०० दोनशे मजला नगदी दिले व रुपये २५ पंचवीस खरीदींचा वगैरे खर्च केला येकुण रु. २२५ मजला मिळाले बाकीचे राहीलेले रुपये ३७५ तीनशे पंच्याहत्तर तुमचेकडेस घेणें राहीले होते त्याजबद्दल तुह्मी मजला चिठ्ठी लिहून देऊन मजला भरणा पावल्या बद्दल तुह्मी सबरजिस्टर समोर जबानी देण्यास लावली व त्याप्रमाणें मी भरणा पावल्या बद्दल जबानी दिली. परंतु आपण चिठ्ठींतील लिहिलेले रुपये ३७५ तीनशे पंच्याहत्तर अद्याप पावेतों दिले नाहींत. तरि ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत मजला ते राहिलेले रुपये ३७५ पावणे चारशे देणें व माझी पावती घेऊन जाणे. तसे नकेल्यास मजला दिवाणींत दावा करावा लागेल व त्याचे खर्चासुद्धा सदरहु रकम तुमचे कडून वसुल करून घेईन. कळावें सही

नथु वा॥ केशोजी भेंडे

नं. २२ रा० पाळोधी नि० खुद

---

## नोटीस

रा० इयाबु वा॥ गणपत पाटील व झमु वा॥ गणपत पाटील अज्ञान पालन करणार आई कवसी मर्द गणपत पाटील राहणार पारस ता० बाळापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत तुह्मी मजला रुपये ८०० आठशे देण्याचे कबुल करून माझे मालकीचा स्थावर माल मौजे पारस ता० बाळापुर येथील शेत सर्वे नंबर १०१ यांतील एक द्वितिआंश हिस्सा विकत घेतला व त्याज बद्दल मज जवळुन खरीदीखत लिहून नोंदून घेतलें परंतु मजला भरण्याची रकम नगदी नदेतां मजला तुह्मी सदरहु सालीम नंबर तारण देऊन गहाणखत लिहून दिले. व ते नोंदण्याकरितां सबरजिस्टर कचेरींत दाखल केलें परंतु पुढें तुमचे मनात बेमानी येऊन राहून तो दस्तऐवज न नोंदून देतां तसाच परत घेऊन गेला. तुह्मी लबाडी केल्यामुळें मीही माझे खरीदीचा दस्तऐवज परत मी माझे जवळ घेऊन आलों. तो हल्लीं मजजवळ आहे तरी या नोटीशीने तुह्मास कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या दिवसा पासून १५ पंध्रा दिवसाचें आंत तुह्मी मजला खरीदीचे मोबदल्याची रकम नगदी आणून देणें अगर तुह्मी लहुन दीलेलें गहाणखत नोंदून आणून देणें. तसें नकेल्यास मी तुमचेवर गहाण खत पुरे करून मागण्या बद्दलचा दावा करीन त्याचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल तरी आगाऊ नोटीसीनें कळविलें आहे. कळावे ही नोटीस दिली सही

शेख यासीन वा॥ शेख इमाम मुसलमान

नं. २३ रा. बाळपूर नि. खु. हातची


शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, झाडा, संधिवात, फेंफरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरियनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ॥१२


बी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो. नं० २४

---

## घड्याळ फुकट मिळेल



( आमके आम और गुठालियोंके दाम )

गजकर्णाचे [ दाद ] रामबाण मलम किं. ४ आणे दराची १२ शीशी ३ तीन रुपयांची घेणारास टाइमपीस घड्याळ फुकट मिळेल. २४ शिशी एकदम घेणारास खिशांतील [ जेब ] घड्याळ फुकट मिळेल. औषध विकून घड्याळ फुकट वापरा.

आमचे कारखान्यांत, सर्व प्रकारचीं पुस्तकें, औषधें, घड्याळा वाचेस, सुगंधी सामान, तेलें, अत्तरें वगैरे योग्य किंमतीनें मिळतात. आमचा मोठा क्याटलाग फुकट मागवा. तसेंच आपण आपल्या व आसपासचे गांवातील लिहीणदार माणसाचीं ५० पन्नास नांवें पूर्ण पत्त्यासह लिहून कळविल्यास मनोरंजक पुस्तक पाठवू.

१ टेबलावर ठेवण्याचें टाईमपीस घड्याळ १॥ रु.

२ रास्कोप प्लीस्टिस [ खिशांतील घड्याळ २ रु.

पत्ता जयचंद्र कंपनी मुंबई-४ ( वर्धा सी. पी.)

नो. नं. २५

---

साताऱ्चे प्रसिद्ध कोल्हटकर राजवैद्यकृत

## कस्तुरीच्या गोळ्या

यापासून अपस्मार वायू-श्वास वाय्प्रह फीट्स [ हिस्टेरिया ] फेंपरे मिरगी, बतारणें, आंकडी घुरे ह्मणतात तो आजार, लहान मुलें व मोठीं माणसें यांचा नवा जुना आजार खात्रीनें बरा होतो. तसेच बहुतेक सर्व ज्वर अर्धांग वगैरे वायू बरे होतात. ४ आणे पासून वर कितीही किंमतीच्या गोळ्यांच्या बाटल्या माहितीचे कागदासह विकत मिळतात. रोखीनें अगर व्ही. पी. नें मागवा. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें. याशिवाय बहुतेक प्रकारच्या मात्रा, गोळ्या, भस्में, आसवे, वातहारक तेलें विकत मिळतात.

सखाराम अप्पाजी कोल्हटकर वैद्य,

ठाकुरद्वार रोड हरकुवरबाई नवी चाळ, मुंबई नं० २

नो० नं० २६

**तांबूल नवरत्न** — न कत्थेकी परवा न चुनेसे काम,
हमारे मसालेका सबको सलाम.
पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला.
चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे.

**नवरत्न टेबलेट** — उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे.

**नवरत्न तमाखु** — पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा.

**मद्रासी नस** — अति उत्तम सुवासिक नप. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे

**गजकर्णाचें मलम** — गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे.

**केश काढण्याचें तेल** — केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे.

**चन्द्रकान्त बाम** — मेंदूला व डोक्याला आत उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे.

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

**आकोल्याचे सोल एजंट– चमन कंपनी.**

पत्ता— ताजनापेठ बाजार– आकोला.

नो. नं. १२



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4,68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36,38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80,05,818 |
| 1898 | 31,36,422 | 1,41,32 356 |
| 1903 | 41,07,009 | 2,19,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future. "

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
C. P. Berar & Khandesh, NPU.

N. No. 13



अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडुन जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ·॥· औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. १४



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

**राजवंशी नवरत्न याकुती,**

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

**राजवंशी सांध्याचें तेल,**

किंमत रुपये ५ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

**परमा सायरप.**

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक खास अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना मुलेश्वर मुंबई.

नो० नं० १५



सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

**आयोडाईज्ड सार्सापरिला.**



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना संधिवात रक्त संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस नव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाणः— डॉ. गौतमराव केशव

नो० नं० १६ — ५६३ ठाकूरद्वार मुंबई.


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८] आकोला-- सोमवार तारीख १० माहे आगष्ट सन १९१४ इ० [अंक ३१

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठरविली आहे.

## नोटांशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
डिगच्या दोन ओळी धरल्या जातील- नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या पैसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयेप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमाच्या प्रती बँकेंत अर्ज केल्या असतां मिळतील.

मुंबई ब्यांक J. G. Ridland.
आकोला ११।१०।१९ एजंट
नो. नं. १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{?}{?}$ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } J. G. Ridland.
आकोला २१-९-१० } एजंट.
न० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ३

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाश्यांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या.**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं. रु. १।८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ४

### NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. (Natl) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN 301, Upper Circular Road, Calcutta.

No. No. 5

### 'विकावयाचा आहे.'

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाजवळ असलेला को॰ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायण भट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते हिंगोली व्हाया वाशीम कौकरच रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्त्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ६ वऱ्हाड

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेग्रनाईट नोटपेपर्स व त्यांच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्ही मिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी
नो. नं. ७

### "खरें पैष्टिक औषध"

पाहिजे असल्यास, आमचे हातभट्टीचे, शास्त्रोक्त यथासांग पद्धतीनें, निर्विकारी, व ज्यांत [ कारखान्याचे औ० प्रमाणें ] उष्ण गुणधर्म नाहीं, व प्रतिज्ञेनें १४ दिवसांत हटकून गुण देते, असे वंगभस्म वापरा कि. तो. २ रु. अनुपान खरडा सोबत असतो ४० विकार, यानें दुरुस्त होतात. तसेंच वरील पद्धतीनें, प्रवाल भस्म तयार असून ११ विकार घालविते. खरडा सोबत असतो. उपाना, परमा, उपदंश, व इतर कांहीं कारणामुळें, उन्हाळयांत, उन्हाळी लघवींत आग, धातुस्थानची कडकी, असे विकार होतात, यांना याचा फार उपयोग होतो. कि. तो. २ रु. शिवाय पौष्टिकही आहे. त्वचारोगांतक— १ मलम, खरुज, गजकर्ण, खवडा, आगपेण वगैरे कोणत्याही त्वचा रोगावर चालतो. अनेक मलमांची जरुरी नाहीं. कि. ८ आणे वि. लु. क्याटलाग मागवा. फुकट--व्ही. आर. मुळे, मीदुरा, जी. आय. पी.
नो. नं. ८

बंगाली कथानकाचे आधारें लिहिलेली

## मधुर-मीलन.

लेखक--श्रीयुत, कृष्णातुज— कालेकर.

वाचकांचें मन आनंदानें प्रफुल्लित करणारी अत्यंत चित्तवेधक नवी कादंबरी.

कथानक रम्य व उदात्त, भाषा सोपी पण ज्वटकदार. प्रकरणे २४. किं. व्ही. पी. सह आठ- आणे. प्रो० हरिहर प्रेस, पुना-सिटी

नो. नं. ९

**गवत ! गवत !! गवत !!!**

### जाहिरात.

जी. आय. पी. रेल्वे लाईन वरील वरोरा स्टेशन येथें वक्त मोहसमी कटाई केलेल्या चांगल्या प्रकारच्या वैराई गवताचे गठ्ठे बांधण्याचें काम पावसाळा संपतांच शुरु केलें जाईल. ज्या लोकांना गवत खरिदी करावयाचे असेल त्यांना विनंती करण्यांत येतेकीं त्यांनीं खालीं सही करणाराकडे ३१ आगष्ट १९१४ चे अगोदर आपले मागणी अर्ज पाठवावें-

दस्तुरखत
सही. सी. एफ. बेल
डिव्हीजनल फारेस्ट ऑफिसर
नार्थ चांदा डि. चांदा
नो० नं० १०

### मुद्दाम अगोदर हें वाचावें.

शेंकडों लोकांस गुण आला आहे. काळजीसारखा दुसरा रोगच नाहीं. कांहो, इतकी काळजी कां करतां. तुमची इच्छा हीच आहेना? व्यापारांत फायदा व्हावा, नोकरींत बढती मिळावी, परीक्षा पास व्हावी, संतती व्हावी, कर्जमुक्त व्हावें, घरांत कलह, होऊं नये, शरीरांत सौख्य व्हावें, कोणतीही बाधा होऊं नये, इतक्या गोष्टी बद्दल काळजी करण्यास नको असेल तर प्रसिद्ध मांत्रिक माणिकप्रभु येथील रामचंद्र तात्या ह्यांचा जगप्रसिद्ध अद्भुत ताईत जवळ ठेवा. म्हणजे सर्व गोष्टी मनाप्रमाणें होतील ताईताच गुणाची ह्या देशांत व परदेशांत ख्याति आहे. अनुभव घेऊन पहावा. गुण न आल्यास पैसे परत मिळतील. कोणतीही शंका घेऊं नका. कोणते वर्तमानपत्रावरून मागणी केली हें कळवावें. नंबर १ चा ताईत ह्याची किंमत रुपये ८ - नंबर २ चा ताईत किंमत रुपये ४ नं. ३ चा ताईत किंमत रु. १। ट. व्ही. पी. खर्च ०५ आणे. नंबर १ च्या ताईता पासून १९ दिवसांत गुण येईल. नंबर २ च्या ताईतापासून एक महिन्यांत गुण येईल. नं. ३ च्या ताईताचा गुण २ महिन्यांनीं येईल. जशी जरूर असेल त्याप्रमाणें मागणी करावी.

पत्ताः— वासुदेव रावजी लेले
नो. नं. ११ पिरंज

### नोटीस

रा० आनंदा व मगपत वल्द तुकाराम कासार राहणार नानेफळ तालुके मेहेकर जि० बुलढाणा.

मी खालीं सही करणार नोटीस देतो कीं, माझा पूर्वीचा नवरा व्यंकु तुकाराम कासार हा तुमचा भाऊ होता त्यास मरून सरासरी पंधरा वर्षे झालीं. त्याचे पोटची मला १ मुलगी नामे सुंदराबाई आहे ती अज्ञान असून तिचें पालनपोषण मीच केलें आहे. मीं पाट दुसरा मुरारी ज्यानबा कासार रा० इसोली यांच्याशीं केला असून त्यांचेच घरीं मुलीसुद्धां राहून त्यानींच आजपर्यंत पालनपोषण मुलीचें आजपर्यंत केलें असून ते मुलीचें लग्नास ४०० च्यारशे रुपये स्वतः लावण्यास तयार आहेत आणि मी गंधर्वाचे वेळीं त्यांच्याशीं करारही होता. मुलीचे लग्नास रुपये लावून लग्न तुह्मी करावें त्याप्रमाणें ते कबूल आहेत. असें असतां तुह्मी त्या मुलीचे चुलते असल्यानें तुह्मी आजपर्यंत नेआण करण्याची कोणतीच विचारणा केली नसून मुलीस काल नानेफळ येथें ता० २३-६-१४ इ० रोजीं मुलीस बलात्कार करून आणविलें होते आणि तुह्मी पंचाचाही अपमान केला होता. तरी आतां तुमचा विचार पैसे घेऊन अगर साटेलोटे करून कोणा गरीबाचे घरीं मुलगी द्यावी असा विचार दिसतो. तरी माझा विचार सदरहू मुलगी घोत्रे येथील दामोधर वा॥ नारायण कासार यांचे चिरंजीव कोंडबा या मुलास देण्याचे मुलीस योजिलें आहे तरी हें स्थळ चांगलें असून जवळ आहे. त्याठिकाणीं जर तुह्मी ही देण्यास खुश असाल आणि लग्न पैसे न घेतां कराल तर मी लग्न प्रसंगीं मी मुलीसह येऊन लग्न करण्यास तयार होईल. वर लिहिले प्रमाणें रुपये तुह्मी मुलीचे लग्नास लावत असल्यास मी राजी आहे तरी या नोटीशी पासून १५ दिवसांत तुमचा विचार मुलीचें लग्न वरील वरासी करणें योग्य असाल अगर तुमचा विचार कसा काय याजबद्दल कळवावें जर तुह्मी कळविणार नाहीं तरी मी मुलीचें लग्न वरील वरासी करील. पुढें तुमचें बोलणें कोणतेंच प्रकारें चालणार नाहीं. कळावें ही नोटीस मी आपले राजी खुषीनें लिहून दिली सही द० मुरारी ज्यानबा कासार रा० इसोली ता० ३१ जुलई सन १९१४ इ०

सही

गंगू मर्द मुरारी कासार राहणार इसोली ता० चिखली जि० बुलढाणा इची निशाणी हातचा आंगठा असे

नो. नं. १२

### नोटीस

नोटीस बेशमी १ शेख इब्राहीम वा फैज महमद २ भगु वा हरी माळी रा० गोधनापूर ता० खामगांव

यांस:—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं शेत सर्वे नं० ६४ मु. निरनगांव येथील मी ता० १४।६।१३ ला तोताराम महादु हजाम यांस बक्षीस दिलें आहे. तें शेत मी तुह्माला दहा वर्षाकरितां भाडेपट्यानें मागें दिलें होते व दोन वर्षे हा दस्तऐवज लिहिण्यापूर्वीं होऊन गेल्यानें व नंतर ही १ वर्ष लोटल्यानें १ वर्षाचे पैसे स्वामित्वाचे तुह्मी रा० तोताराम महादू यांस द्यावयास पाहिजे होते. परंतु तुह्मी १९१३ सालचे स्वामित्वाचे पैसे त्यांशीं मालूम त्यांस न देतां मला दिलें. हें तुमचे उभयताचे करणें गैर आहे. आतां तरी नवीन सालचे पिकाचे पैसे इसम मजकुरास द्यावे कायदेशीर ताबा त्या इसमाचा आहे. तसें न केल्यास रितीप्रमाणें त्यांनीं कोर्टांत तजवीज केल्यास त्याच्या खर्चास तुह्मी जबाबदार व्हाल. १९१३ पर्वितों पैसे मला पावले आहेत पुढें ७ वर्षाचे पैसे त्यास द्यावे क. ता. ३१।७।१४

सहीची नि० आंगठा

जानकाबाई मर्द महादू हजाम

रा० गोधनापूर पो. खामगांव

नो० नं० १३

### जाहिर नोटीस

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्र लोकांस जाहिर नोटीसीनें कळवितो कीं माझा मुलगा नामें गोपाळराव माधोराव हा उमर वर्षे १८।१९ चा असून वाईट व्यसनात असतो व तो माझे सल्लेचे अगदीं विरुद्ध आहे करितां यांस कोणी कर्ज वगैरे देऊं नये. दिल्यास त्या कर्जाकरितां मी किंवा माझी जिनगी जबाबदार होणार नाहीं. हें सर्वत्रास कळावें या करितां जाहीर कळविले आहे कळावें ता० ३१।७।१९१४ इ.

सहीची निशानी आंगठा

माधवराव भोंडीराव रा०

कसबे नांदुरा

नो. नं. १४

### नोटीस

ग्याशीराम वा॥ फत्तेचंद मारवाडी रा० बामुळगांव पो० उकळी वरुड ता० आकोट

यसं

खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्माला मौजे पिंपरद बु॥ प्रगणें बडनेर ता० आकोट येथील सेत सर्वे नंबर १९ एकर १२०३४ आकार ३०।= पातीचा ॥ हिस्सा तुह्माला मी ता० १८।११।१९०७ इ० रोजीं हे सेत नावे महाण रुपये २०० दोनशे घेऊन पट्टा करून दिला ते रुपये तुमचा घेण्याचा करार कोणत्याही वेळेस मोंडे घेण्याचा होता तरी आपण तसें नकरतां माझें जवळून तुह्मी रुपये ४०० चारशं दाम दुप्पट घेतले ते रुपये ता० १६ माहे १।१९१३ इ० रोजी मी परभारे नयनारायण वा॥ मालीराम मारवाडी दुकान शेगांव याचे जवळून आणून तुह्मांस दिले व तुमचे जवळून पावती घेतली आतां मी आपले सेत माझे ताब्यांत मागते तर आपण तुमचा पुतण्या रावाकीसन वा आसाराम मारवाडी याचे नांव सांगता तरी आपले करणें हें बरोबर नाहीं तर या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं माझे दोन वर्षाचे नुकसानी बद्दल ७५ रुपये दरसाल पाउणशें रुपये दिढशें व जास्ती घेतलेले रुपये २०० दोनशे असें एकंदर रुपये ३५० साडेतीनशें देऊन माझी पावती घ्यावी व माझे शेत १५ दिवसाचे आंत माझे ताब्यांत करून द्यावें. असें न केल्यास मी तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा करीन मग दाव्याचा खर्च व नोटीसीचा खर्च तुह्मांस भरावा लागेल कळावें तारीख ९।८।१९१४ इ.

सही

बनाबाई मर्द फकीरा कुंभार

रा० बामुळगांव इचे हातचा

आंगठा असे

नो. नं. १५

### नोटीस

नोटीस बेशमी बाळमुकुंद कस्तूरचंद मारवाडी रा० अंत्री व श्रीराम खेतसीदास मारवाडी रा० शेगांव यांस:—

खालीं सही करणारा कडून नोटीस देण्यांत येते कीं मागील वर्षी ह्मणजे सन १९१३ चे जुलई ता. ५ चा वऱ्हाडसमाचार वर्तमान पत्रांत आपणा उभयतास अज्ञानाचे घर बांधण्यासंबंधानें ६०० रु० देण्याबद्दल नोटीस दिली होती. ती त्या पत्राचे ता. ७ चे अंकांत छापिली. तुह्मास रजिष्टर झाल्यावर तुमची माझी समक्ष भेट झाली तेव्हां तुह्मी फिर्याद करूं नका मी लवकरच तुह्मास रुपये देतो असें तुह्मी ह्मणाला. त्याउपरही पुनः तुह्मास १-२ वेळेला रुपये मागितले त्या गोष्टीस आज सुमारे १२ महिने होतात पैसे आपण दिले नाहींत. अज्ञानाचें घर अर्धवट पूर्वीं बांधले असल्यानें त्याची पाणी पावसानें नुकसान होत आहे व झालें आहे तरी ही नोटीस पावतांच १५ दिवसांत रु० सहाशे देण्याची तजवीज करावी नाहींपेक्षां रुपये आजवर न दिल्यानें घराचे झालेलें नुकसानीसुद्धां वरील रक्कम व नोटीशीचा खर्च या सर्व खर्चाबद्दल कोर्ट मार्फत योग्य तजवीज करावी लागेल. ता. ४-८-१४

सही

राधाबाई जवजे भाऊराव तर्फे मुखत्यार

आनंदराव बापुराव देशमुख द. खु.

नो. नं. १६

### नोटीस

नोटीस बेशमी भन्या वा॥ पुन्या मांग रा० तुदगांव ता० आकोट यांसः—

नोटीस देण्यांत येते कीं मौजे तुदगांव येथील माझे मालकीचें घर (मी कचऱ्या वा॥ बनशा मांग रा. तुदगांव याचे जवळून घेतलेलें) ते तुह्मांस मी भाड्यानें दिलें. त्यास आज तीन वर्षे झालीं. आजपर्यंतचें भाडें मला पावलें परंतु मला सदरहू घराची सध्या गरज असल्यानें मी तें तुह्मांस या नोटिशीनें खालीं करून मागतो. नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत असें न केल्यास मला सरकार मार्फत तें ताब्यांत घ्यावें लागेल व तसें करण्यास जो खर्च लागेल त्यास तुह्मी जबाबदार व्हाल क. ता० ४-८-१४

सहीची निशानी आंगठा

कालु वा॥ भगु धनगर रा० तुदगांव

नो० नं० १७ याचा खद

### नोटीस

शेख मनू वा॥ शेखपनू मुसलमान देशमुख रा. लोहार ता० बाळापूर

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे साक्षांत बा असून तुह्मी ममला माझे हिशाबद्दल च सेते, भनकी, अंबाईवाले, बनुबोवाचा मळीचे अशी च्यार शेतें व जबारीचें पे खंडी १० च्यार शेरी पायलीचे मज देऊन माझे हिशाचा निकाल केला प आतां अलीकडेस तुमचे मनांत बेइमान येऊन तुह्मी त्या जिनगीचा अपहार कर पाहात आहा. मी हल्लीं सज्ञान झालों अस मी त्या जिनगीचा पूर्ण मालक बनलो आहे. त्या जिनगीवर आतां तुमचा मुळी हक्क नाहीं. सदर्हु जिनगी तुह्मी कोणा गहाण अगर खरिदी किंवा कोणा बक्षीस दिल्यास मुळींच चालणार नाही अलिकडेस तुमची मती भ्रमिष्ट झा असून इतकेंही करून तुह्मी कांहीं व्यवहार केल्यास तो बातल असे ही नोटीस दिली सही ता० १८।६।१४ इ

सही

गुलाम आहमद वा॥ शेकमनू द. ख

नो. न. १८

### नोटीस

महादेव कालूराम मारवाडी दुकान अकोट व नारायण उदेभान पा. दुकान मधंनपुर सावरा तालुके आकोट जी० अकोला

यांस

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे स्वत मालकीची सरकी खंडी ५३॥ पावणे चौपन दर ९। प्रमाणें आकोट येथे ठाकूरदास खेमराज याच्या जिनातून माझी नेली त्याला आज तिनवर्षे होत आली तरी अद्याप त्याचे पैसे मला मिळाले नाहीं व त्याबद्दल कांहीं हिशोबही झाला नाही सदरहु पैशाबद्दल आह्मीं तुह्मा दोघांस बरेच वेळा मागणी केली परंतु तुह्मी देऊं असे. ह्मणतात कधीं कधीं एकमेकांस लोटतां आतां त्याची मुदत संपत आली आहे तरी सदरहु नोटीस पावल्या पासून आठदिवसाचे आंत सरकीसंबधी आमचे पैशाचा निकाल करावा नाहींतर निरुपायानें तुमचे वर रिती प्रमाणें दावा करावा लागेल. सदरहु नोटीसीचा खर्च व लागणारा खर्च तुह्माला द्यावा लागेल कळावें ता० ३१।७।१९१४ इ० स

सही

संपत विठोबा पाटील कार्यकर्ता

राहणार साखरे

ता० अकोट

नो. नं. १९

वऱ्हाडसमाचार

मित्ती श्रावण वद्य ४ शके १८३६

## सावकारांच्या लोभास आळा.

सावकार लोक कुळांकडून कर्जरोखा लिहून घेऊन यांपासून बेसुमार व्याज वसूल करतात व देणें बकलें कीं दिवाणी कोर्टमार्फत दावे करून कुळांकडून निघतील तितके पैसे वसूल करतात दिवाणी कोर्टाचे अधिकारी सारासार विचार पाहून ऋणाच्याच रकमेबद्दलच्या डिक्रया देतात; तथापि दामदुपटीपर्यंत रकम देण्यास हरकत नाहीं अशी सवलत कायद्यानें ठेविली असल्यामुळें तितकी रकम तरी सावकाराचे पदरांत पडते, हें बरोबर नाहीं, व त्यामुळें कुळें विनाकारण पिळिलीं जाऊन निःसत्त्व होतात असें वाटून याचा बंदोबस्त करण्यासाठीं काय उपाय योजावे अशा प्रकारची विचारणा हिंदुस्थान सरकाराकडून प्रांतिक सरकारांना झालेली आहे. या संबंधांत हिंदुस्थान सरकारानें त्यांच्या विचारासाठीं पुढील प्रश्न मांडले आहेत—१ कोणी व्याजाची किती ही मागणी केली तरी ती दिवाणी कोर्टाला मंजूर करणें भाग पडेल कीं काय? २ भाग पडत असेल तर या गोष्टीचा प्रतिबंध करण्याची अवश्यकता आहे काय? ३ व असल्यास ती कशी करावी? खुद्द हिंदुस्थान सरकारानें सामान्यतः या संबंधांत सुचणारे पुढील उपाय मांडले आहेत. १ व्याजाचा ज्यास्तींत ज्यास्ती दर कायद्यानेंच ठरवून टाकणें २ व्याजाची एकंदर रकम मुद्दलाच्या मानानें ठरवून टाकणें, ३ कर्जरोख्यांत व्याजाचा दर बेसुमाराचा घातलेला असेल तर तो रद्द करून नवा कर्जरोखा करून देण्याचा अधिकार कोर्टाला देणें. या तीन उपायांपैकीं शेवटला उपाय हल्लीं इंग्लंडसारख्या देशात चालू आहे व तेथें त्याचा चांगला उपयोग होत आहे असें हिंदुस्थान सरकारचें ह्मणणें असून तशा प्रकारचा उपाय इकडे करून पाहण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति त्यांनीं स्पष्टपणें दाखविली आहे. पण इंग्लंडांत सावकार आणि कुळें यांच्या मधले संबंध येथल्याहून अगदीं निराळ्या प्रतीचे आहेत, तेव्हां तेथील उपाय येथें जसाचा तसा लागू करण्यापासून लाभ न होतां कुळांची सुद्धां हानि होण्याचा संभव आहे ही गोष्ट या संबंधानें विचार करतांना अवश्य लक्षांत घेतली पाहिजे असें आह्मांस वाटतें. आमच्या इकडे सावकार कुळांना बुडवूं पाहत नाहींत असें ह्मणण्यास आह्मी तयार नाहीं पण सरकार कुळाचा तेवढा पक्ष घेतें, आणि त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठीं झटतें पण सावकार लोक कुळांना अडचणीच्या वेळीं कसे उपयोगी पडतात, व कुळाला केव्हां केव्हां तर तारणावांचूनसुद्धां मोठाल्या रकमा कर्जाऊ देण्यांत ते केवढी जोखीम उचलतात या गोष्टीचा व त्याचप्रमाणें कित्येक कुळें पैसे देतांना सावकाराला कसे छळतात, कायद्याच्या ढालीखालीं अंग लपवून सावकाराला कसे बुडवितात, व त्या मुळें सावकारीचा धंदा अलीकडे किती मंदावला आहे, या ही गोष्टीचा विचार होणें अवश्य आहे. तुह्मी किती ही सरकारी मंडळ्या व पेढ्या काढल्या तरी सावकारीची संस्था नाहींशी करून तुमचें चालावयाचें नाहीं, व सावकाराच्या न्यायाच्या लाभांत तुह्मी विनाकारण आडकाठ्या घालूं लागलां तर त्यामुळें सावकारीचा धंदा बुडून कुळाला कर्ज मिळण्यास किती यातायात पडेल ही ही गोष्ट विचारात घेण्याजोगी आहे असें आह्मांस वाटतें. या संबंधात नुसतीं प्रांतिक सरकारचीं मतें न घेतां सरकारनें सावकारांना ही आपली बाजू पुढें मांडण्याची संधी द्यावी, आणि मग या प्रश्नाचा अखेरचा निकाल द्यावा अशी आमची सरकारापाशीं आग्रहाची विनंति आहे. सावकारांनीं अशा वेळी स्वस्थ न बसतां आपली एक संयुक्त संस्था स्थापून तिच्या द्वारें आपलें ह्मणणें सरकारापुढें योग्य रीतीनें मांडण्याची फार अवश्यकता आहे.

## इराणचे शहाचें राज्यारोहण.

ता० २१ जुलै रोजीं इराणचे नवे बादशहा महंमदशहा राज्यारूढ झाले. नियंत्रित अधिकारयुक्त असे हे पहिलेच बादशहा एशियाखंडात होत. आतां हे पंचमजॉर्ज बादशहाप्रमाणें पार्लमेंटनें नियंत्रित अशा शासनपद्धतीनें राज्य करणार. यांना पार्लमेंटनें खाजगी खर्चासाठीं दरसाल १९ लक्ष रुपयांची नेमणूक करून दिली आहे. गेल्या आठ वर्षांत इराण देशांत अशांतता माजली आहे. आतां या नव्या बादशहाच्या कारकीर्दींत तिचा नायनाट होऊन त्या देशाला शांततासुख लाभो ह्मणजे झालें. इराणांत नियंत्रितराजसत्तेचा हा प्रथमच अनुभव पाहण्यांत येणार आहे; आणि हा सफल झाला तर तो इराणलाच नव्हे तर एकंदर एशिया खंडाला फार हितावह होईल. या प्रयोगाच्या सफलतेविषयीं युरोपियन मुत्सद्यांना मोठीशी आशा वाटत नाहीं. ईश्वर करो, आणि त्यांचें भविष्य खोटें ठरो.

## तहकूब

येत्या जानेवारी महिन्यांत मुंबई मद्रास, कलकत्ता व लाहोर येथें जी सर्वधर्मांची परिषद भरणार होती तिला त्यावेळीं येण्यास बरीच परदेशी विद्वान मंडळी तयार नाहीं ह्मणून सदर परिषद भरण्याचें काम तूर्त वर्षभर तहकूब करण्यांत आलें आहे असें कळतें.

## हायकोर्ट जज्जांच्या नेमणुका.

मद्रास हायकोर्टाचे माजी न्यायाधीश सर एन. सुब्रह्मण्य आयर यांनीं कॉमनवील पत्राच्या द्वारें न्यायखात्याच्या सुधारणेसंबंधानें ज्या महत्त्वाच्या सुचना केल्या आहेत त्या विचार करण्यासारख्या आहेत. त्यांची एक सूचना फार अगत्याची आहे आणि इतके दिवस तिच्याकडे कोणाचेंच लक्ष कसें गेलें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. ही बाब ह्मणजे हायकोर्ट जज्जाच्या तूर्त नेमणुका प्रांतिक सरकारच्या शिफारशीवरून व अंमलबजावणी खात्याच्या मुख्य अधिकाऱ्याकडून होत असतात ही होय. तूर्त नेमणूक एकदा झाली ह्मणजे पुढें मागें तीच कायमची होते आणि अशा रीतीनें सरकारच्या शिफारशीचीं तट्टें हायकोर्टांत शिरलीं ह्मणजे सरकारचा कल पाहून खटल्याचा निकाल देण्याचा मोह कांहीं जज्जांना पडत असला पाहिजे. याचा परिणाम असा होतो कीं लोकांचा ब्रिटिशन्यायकोर्टावरचा विश्वास डळमळीत होतो, आणि न्यायदेवता जी स्वतंत्र असावयाला पाहिजे तिला हांजी हांजी करण्याची सवय जडून कोर्टाची इभ्रत कमी होते पूर्वींच्या काळापेक्षां हल्लींच्या काळीं हायकोर्टाची इभ्रत लोकांच्या दृष्टीनें कमी झाली आहे असें सर साहेब ह्मणतात. यासंबंधानें सरसकट विधान करणें अंमळ धोक्याचें आहे. तूर्तच्या जागीं एखादा जज्ज असला काय किंवा कायमच्या जागीं असला काय, सरकारी अधिकाऱ्यांचा कल पाहून निकाल देणारे जज्ज निघणें न निघणें हें मनुष्याच्या मनाच्या दृढतेवर व नीतिमत्तेवर अवलंबून आहे. तूर्तच्या जागीं काम करीत असतांना न्यायाची स्वतंत्रता कायम राखणारे दृढ मनाचे जज्जांचीं उदाहरणें बरीं आह्मांस माहित आहेत, तशींच कायमची नेमणूक झाल्यावर किंबहुना पेनशन घेतल्यावर सुद्धां सरकारी अधिकाऱ्यांची खुशामत केल्याशिवाय ज्याना चैन पडत नाहीं अशीं ही कित्येक उदाहरणें दाखवितां येतील. हा जरी व्यक्तिगत मनोधैर्याचा प्रश्न आहे, तथापि सर साहेबांनीं जो दोष दाखविला आहे तसल्या दोषारोपाला यत्किंचित् ही जागा न देणें एकंदरींत बरें असें आह्मांस वाटतें. ह्मणून या बाबतींत लवकर सुधारणा घडून यावी अशी आमची इच्छा आहे.

## मैत्रेय बुद्ध.

तिबेटाहून अशी बातमी आली आहे कीं शिकात्से येथील बौद्धगुरु ताशीलामा यानें मुख्य धर्मगुरु दलाईलामा याच्या परवानगीनें, लवकरच ज्याचा अवतार व्हावयाचा आहे त्या मैत्रेय बुद्धाची तयारी करविण्यास प्रारंभ केला आहे. ही मैत्रेय बुद्धाची मूर्ति ९० फूट उंचीची तांब्याची होणार असून तिच्यावर जाडा सोन्याचा पत्रा चढविला जाणार आहे. या मूर्तीचें वजन २०० मण होईल. ही मूर्ती ज्या मंदिरांत ठेविली जाणार आहे ते १० मजली व्हावयाचें असून मूर्तीचा एकेक अवयव एकेक मजला उंच असेल. मूर्तीचे कारागीर सर्व खुषीने पगार न घेतां काम करणारे असतील व मूर्तीचा आणि मंदिराचा सगळा खर्च लोकांनीं खुषीने दिलेल्या वर्गण्यांवर चालेल. आजपर्यंत तिबेटांत इतकें उत्तम प्रकारचें शिल्प काम झालें नसेल अशा प्रकारचें हें शील्पकाम होणार आहे. या कामासाठीं स्वतः ताशीलामा आणि त्यांचे हाताखालचे आचार्य मंडळ लोकांना उत्साह व उत्तेजन देत आहेत. कामाला सुरवात गेल्या मार्चमध्यें झाली असून हें काम तीन वर्षेंपर्यंत चालणार आहे.

## सूर्याचे किरण आणि क्षयरोग.

शुद्ध व मोकळ्या हवेंत क्षयरोग्याला ठेविल्यापासून त्याचा रोग हटतो ही गोष्ट आतां सर्वांना ठाऊक आहे. पण क्षयरोगाचे जंतु मारण्याचे कामीं सूर्याच्या किरणाचें होणारें मोठें साह्य शास्त्रज्ञांच्या लक्षांत पूर्णपणें आलेलें नाहीं. तथापि व्हा येथील डा. व्हिन्सडेल यांनीं १२०० क्षयरोग्यांवर सूर्य किरणांचा परिणाम अनुभवून पाहिल्यवर त्यांतले १००० रोगी बरे झाल्याचें आढळून आलें असें आतां त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. उपाय अगदी सोपा आहे. रोग्याला पांढराशुभ्र पोषाख घालून उन्हांत बसवावयाचें, व डोळ्यांला अपाय होऊं नये यासाठीं त्याला रंगीत काचेचा चष्मा घालावयास द्यावयाचा. उन्हांत बसविल्यावर पायापासून आरंभ करून हळूं हळूं त्याच्या शरीराचा एक एक भाग उघडा करून त्यावर सूर्य किरणांना आपला प्रभाव गाजवूं द्यावयाचा. अशा रीतीनें सर्व अवयव उघडे टाकिल्यानें शरीरांत क्षयरोगाचें बीज कोठेंही असलें तरी तें नाश पावून रोगी बरा होतो असें डा. हिन्सडेल याचें ह्मणणें आहे. आमच्या आर्य वैद्यकांत या रोगावर हा उपाय सांगितलेला आहे. पण तो करून पाहून आपला अनुभव शास्त्रीय पद्धतीनें टिपून ठेवणारे शोधक चिकित्सक हल्लीं कोठें आहेत?

## पंजाब सरकारचें स्तुत्यकृत्य

जित राष्ट्राला हत्याराचा कायदा लागू करण्यानें तेथील लोक निःसत्व होतात आणि त्याबरोबर त्यांची नीतिमत्ताही खालावते या मुद्यावर हिंदुस्थानांतला हत्याराचा कायदा रद्द करावा अशी मागणी आज कित्येक वर्षें होत आली आहे, पण या बाबतींत सरकार आपल्या निश्चयापासून ढळणार नाहीं अशी खात्री होऊन चुकल्यामुळें तो प्रश्न अलीकडे कोणी उपस्थितही करीत नाहीं. तथापि जेथें धर्माच्या तत्वाआड हा कायदा होईल तेथें सरकार या प्रश्नाचा विचार सहानुभूतिप्रेरित दृष्टीनें करण्यास तयार आहे याचें प्रत्यंतर पंजाबसरकारनें आणून दिलें आहे ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. शीख धर्माप्रमाणें एक सुरी नेहमीं बाळगणें हें धर्मकृत्य मानलें जातें. पण हत्याराच्या कायद्यामुळें हें धर्मकृत्य करतां येईना ही गोष्ट शीख लोकांच्या अंतःकरणांला दुःख देणारी होती पंजाबसरकारनें या गोष्टीचा विचार करून शीख लोकांच्या पंचभूषणापैकीं सुरी हत्याराच्या कायद्यातून मोकळी ठेविली आहे. वस्तुतः सरसहा हत्याराचा कायदा रद्द केला तरी कांहीं एक अनर्थ कोसळणार नाहीं हें हत्याराचा प्रतिबंध नसलेल्या कित्येक देशी संस्थानांच्या अनुभवावरून सरकारला ही कळलें असलें पाहिजे. म्यानांतल्या शस्त्रापेक्षां मनांतलें शस्त्र अधिक तीक्ष्ण असतें. आणि आप-

णास हत्यार चालवण्याचा प्रतिबंध आहे. ही कल्पनाच मनांतलें शल्य नेहमीं पाजळून ठेवण्यास बस आहे. हळूं हळूं सरकारनें याही गोष्टीचा विचार करून सरसकट सर्वांनाच कांहीं सवलती द्याव्या.

---

## युद्धाच्या बातम्या.

युरोपांत भारतीय युद्धासारखें 'न भूतो न भविष्यति' अशा स्वरूपाचें युद्ध बहुतेक सुरू झाल्यासारखें आहे. आस्ट्रियन तोफांचा भडिमार सर्व्हियाची राजधानी बेलग्रेड याजवर मागेंच झाला. हें युद्ध थांबविणें आतां ब्रह्मदेवाच्या हातून सुद्धां होणार नाहीं अशी आकाशवाणी राशियांतून आली. आपल्या मनांतून युद्ध करावयाचें नव्हतें, पण काय करावें? भवितव्यता टाळण्याचें आपल्या हातीं नाहीं असें ह्मणून जर्मनीनें राशियाशीं युद्ध जरी प्रत्यक्ष सुरू केलें नसलें, तरी दोन्ही राष्ट्रांनीं आपापले वकील परस्परांच्या दरबारांतून काढून नेले. बेल्जयम, स्विझर्लंड, इटली व इंग्लंड हे देश तटस्थवृत्ति धारण करून तूर्त आहेत. पण ही वृत्ति त्यांना केव्हां सोडून द्यावी लागेल याचा नेम नाहीं. फ्रान्स तर बोलून चालून जर्मनीचा पक्का हाडवैरी आहे. तेव्हां जर्मनीच्या पक्षाला मिळेल त्याच्या उलट बाजूला तो मिळणार. ह्मणजे युद्ध जरी झाले नसले तरी लवकरच या युद्धाच्या कारणासाठीं दोन तंगी तट होणार. एका तटांत जर्मनी, इटली, व आस्ट्रिया हीं राष्ट्रें असतील, व दुसऱ्यांत फ्रान्स, राशिया, व सर्व्हिया हीं राहतील. इंग्लंड देश मिळालाच तर या दुसऱ्या पक्षाला मिळेल असा पुष्कळ मुत्सद्यांचा अजमास आहे. असें झाल्यास प्रत्येक तटाचें सैन्य व तोफा किती असतील त्याचा अंदाज करण्यांत आला आहे तो येणें प्रमाणें—

| देश | सैन्य | तोफा |
|---|---|---|
| जर्मनी | ५० लक्ष | ३६०० |
| राशिया | ४५ ,, | ३००० |
| फ्रान्स | ४० ,, | ३००० |
| आस्ट्रिया | २५ ,, | २००० |
| इटली | २० ,, | १७२५ |
| इग्लंड | ८ ,, | ६५० |

ह्मणजे एका पक्षाकडे ९५ लक्ष सैन्य ७३२६ तोफा, आणि दुसऱ्याही पक्षा[कडे] ९३ लक्ष सैन्य व ६६५० तोफा [अस]तील. हें युद्ध बहुतेक जमिनीवरच होईल [असा] अंदाज आहे. तथापि भूमध्य समु[द्रा]सारख्या जलमार्गीं तें झाल्यास प्रत्येक [पक्षा]जवळ केवढें आरमार तयार आहे त्या[चे] आकडेही या अंकांत दुसरीकडे आहेत. त्यांवरून या युद्धांत किती [लोकां]चा संबंध येत आहे व झाल्यास रक्त[पात], प्राणहानि व द्रव्यहानि किती होईल [याची] कल्पनाच करवत नाहीं. हा वणवा युरोपांत पेटला आहे, पण तो युरो[पांत]च राहील असा तरी भरंवसा [कोणी] सांगावा? प्रत्यक्ष ज्वाला जरी [इकडे] आली नाहीं, तरी त्या युद्धाची उष्णता इतकी प्रखर आहे कीं तिचा स्पर्श सुद्धां हिंदुस्थानासारख्या दुर्बळ देशाला सहन होईल कीं नाहीं अशी भीती वाटते. युद्ध सुरू होते न होते तोंच इकडे बाजारात गडबड उडून गेली आहे. मुंबईच्या ब्यांका, दलाल, व युरोपियन व्यापाराशीं संबंध ठेवणारे यांचीं धाबीं दणाणलीं आहेत. नोटांचा भाव उतरला आहे. कारण नोटांविषयीं गैरविश्वास उत्पन्न होऊन जो तो त्या बदलून सोन्याचें नाणें घेऊं पाहत आहे. कित्येक बाजार तर एक आठवडाभर अजिबात बंद ठेवावे लागले आहेत. विलायतला जाणाऱ्या बोटी जाऊं कीं नको अशा संदेहांत आहेत. सुरवातीलाच ही स्थिति, तर पुढें काय होणार त्याची कल्पना सुद्धां कशी करतां यावी?

---

## जय जगदीश!

कलकत्त्याचे प्रो. जगदीशचंद्र बोस यांच्या शास्त्रीय शोधांची किंमत गाजर पारख्या कलकत्ता युनिव्हर्सिटीला कळली नाहीं, व तिनें त्यांना नुसतें आपले फेलो सुद्धा आजपर्यंत नेमलें नाहीं, तरी युरोपात प्रो. जगदीशचंद्र एकसारखा दिग्विजय करीत चालले आहेत. ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी, केंब्रिज युनिव्हर्सिटी, व्हिएना येथील वनस्पतिशास्त्रज्ञमंडळ, वगैरे संस्था त्यांना व्याख्यानें देण्यासाठीं आदरपूर्वक बोलावीत आहेत आणि त्यांचे शोध व प्रयोग पाहून आश्चर्यानें थक्क होऊन जात आहेत. माजी मुख्य प्रधान मि. बाल्फोर यांच्या सारखे शास्त्राभिरुचि असलेले विद्वान् प्रो. जगदीशचंद्र यांच्या घरीं येऊन प्रयोग पाहून जात आहेत, व जातांना 'युरोप इतका मागें कसा राहिला! असे खेदाचे उद्गार काढीत आहेत. हिंदुस्थान देश अनेक बाबतींत युरोपाच्या मागें आहे ही गोष्ट कोणीही कबूल करील. पण त्याच्या अंगांत कर्तृत्वशक्तीच नाहीं, बुद्धिमत्ता नाहीं, नुसती स्मरणशक्ति आहे व घोकंपट्टी करून परीक्षा पास होण्याचें तेवढें सामर्थ्य आहे असा जो आक्षेप कित्येक आंग्लो इंडियन लेखक करीत असतात तो किती निराधार आहे, व ज्या देशाला इतक्या भयंकर अवनतीच्या प्रतिकूळ काळांत प्रो. जगदीशचंद्रासारखा तेजस्वी चंद्र निर्माण करतां येतो, तोच अनुकूळ परिस्थिति असती तर याहूनही तेजस्वी असे किती सूर्य निर्माण करता याची कल्पना केली पाहिजे.

---

## पोलिसांना उपदेश

**पोलीस–** विशेषतः सी० आय० डी० मधले पोलीस यांच्यासंबंधानें निरनिराळ्या प्रांतांतून कित्येकवेळां ज्या खबरा येत असतात, त्या पाहिल्या ह्मणजे तो प्राणी मोठा गमतीचा असला पाहिजे असें वाटूं लागतें. ज्याला कान असून खरे बोललेले शब्द ऐकूं येत नाहींत, पण न उच्चारलेले ऐकूं येतात, डोळे असून दिसत नाहीं, पण कित्येकवेळां अंधारांत दोरी सुद्धां नसतां सर्पाचा भास होतो, जो भोळा ह्मणावा तर इतका कीं सांवाच्याही पलीकडे, आणि व्यवहारज्ञ ह्मणावा तर अप्रातिम अशा प्रकारचा अतर्क्य, दुर्दैव (दुर्जन नव्हे) आणि दुर्धर्ष प्राणी तो असला पाहिजे. त्याला तोंड असून तें एरव्हीं बोलत नाहीं, फक्त न्यायाधिशापुढें मात्र तें उघडतें. त्याला उपदेशाची गरज वाटत नाहीं, पण खरें पाहिलें तर ती पुष्कळच असते. अशा या प्राण्यासंबंधानें ग्वाल्हेरचे महाराज श्री० शिंदेसरकार यांच्यासारखे अतिशय कडक व दक्ष राज्यकर्ते काय ह्मणतात तें पहा. ते ह्मणतात कीं सी० आय० डी० मधल्या पोलिसांनीं आणिलेल्या सगळ्या बातम्या जर गीतावाक्यासारख्या प्रमाणभूत धरून सरकार चालेल तर तें लवकरच लोकांना अप्रिय होऊन अपकीर्तीचें मालक होऊन बसेल. ह्मणून पोलिसांनीं आपले कान व डोळे उघडे ठेवावे, पण भोळेपणानें भलभलत्या गोष्टींवर विश्वास ठेवून चालूं नये. तर सारासार विचार करून त्याच्या साह्यानें योग्य तोच निर्णय मनाशीं करावा! हा उपदेश जरी महाराजांनीं आपल्या राज्यांतल्या पोलिसाला केला आहे तरी तो ग्वालेर संस्थानाबाहेरही गेल्यास हितप्रद होईल.

---

## के० सी० आय० ई व ना० गोखले

बादशहांच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ पदव्या देण्यांत आल्या त्यांत ना० गोखले यांना के० सी० आय ई० पदवी देण्याचें ठरलें होतें असें विलायतेंतील "एक्सप्रेस" पत्रावरून समजतें. लॉर्ड हार्डिंज यांनीं ही पदवी देण्याबद्दल लॉर्ड क्रयू यांच्याकडे शिफारस केली होती ती त्यांना मान्य होऊन त्यांनीं नां० गोखले याचें नांव बादशहांना सुचविलें होतें. बादशहांनींही त्यास आपली संमति देऊन पदवीचा स्वीकार करण्यासंबंधांत ना० गोखले यांचें मत काय आहे यासंबंधानें त्यांनीं चौकशीही करविली. आपल्याला हा मान देऊं केल्याबद्दल ना० गोखले यांनीं आपल्या उत्तरांत बादशहांचे कृतज्ञापूर्वक आभार मानले. पदवीचा स्वीकार केल्यास आपण सरकारचे माणूस आहोत असा लोकांचा समज होऊन त्यामुळें प्रामाणिकपणें सार्वजनिक कर्तव्य करण्याचे कामीं व्यत्यय येण्याचा संभव आहे. तेव्हां हा मान नाकारण्याची आपल्याला परवानगी मिळावी असें त्यांनीं सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्यामार्फत बादशहांना कळविलें त्यांची ही अडचण बादशहांनाही योग्य वाटून त्यांनीं ना. गोखले यांच्या इच्छेनुरूप यादींतून त्यांचें नांव कमी केलें ना. गोखले यांच्या थोर कामगिरीबद्दल त्यांचा सन्मान करण्याची सरकारची इच्छा सफल झाली नाहीं याबद्दल लॉर्ड क्रयू यांनीं दिलगिरीही प्रदर्शित केली.

वरील बातमी ना. गोखल्याचें (सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचें) पत्र 'ज्ञान प्रकाश' यांत ही प्रसिद्ध झालेली आहे- ती कितपत खरी आहे तें आह्मांस ठाऊक नाहीं, व ज्ञानप्रकाशानेंही यावर आपल्या खाजगी माहितीचा प्रकाश पाडावयास पाहिजे होता तो पाडला नाहीं. आमचा या बातमीसंबंधानें अविश्वास होण्याचें एक कारण हें आहे कीं ११ वर्षांपूर्वीं जेव्हां ना० गोखले यांनीं सरकारानें सी. आय. ई. केलें. तेव्हां ना० गोखल्यांनीं हल्लींच्या सारखे कांहीं एक सबब पुढें न आणतां सरकारनें केलेल्या बहुमानाचा मुकाट्यानें व आभारपूर्वक स्वीकार केला होता. ते वेळीं त्याच्या संबंधानें लोकांना हल्लीं इतकी खरी माहिती नसल्यामुळें सरकारी मान स्वीकारण्यापासून आपल्यासंबंधानें लोकांचा गैर समज कदाचित् होईल अशी भीती हल्लींच्या पेक्षा त्या वेळीं ज्यास्त होती. असें असतां ज्यांनीं त्या मानाचा अनादर केला नाहीं, त्यांनीं आतां तो करण्याला तर मुळींच कारण दिसत नाहीं

---

## आस्ट्रिया व सर्व्हिया

या दोन राष्ट्रांमध्यें नुकतेंच युद्ध सुरू झालें आहे व या युद्धाचा वणवा लवकरच सर्व युरोपभर पसरून समळ्या युरोपखंडाच्या किंबहुना सर्व जगाच्या इतिहासावर त्या युद्धाचा परिणाम घडेल अशी भीती मोठमोठ्या मुत्सद्यांना वाटत आहे. ह्मणून या युद्धाकडे हिंदुस्थानांतल्या लोकांचेंही डोळे लागून राहिले आहेत. अशा वेळीं या दोन्ही देशांविषयीं कांहीं ठळक माहिती आमच्या वाचकांच्या उपयोगासाठीं पुढें दिली आहे.

आस्ट्रिया हा देश युरोपखंडाच्या मध्यभागीं असून त्याला उत्तरकडून राशिया व जर्मनी, पूर्वेकडून राशिया व रुमानिया पश्चिमेकडून जर्मनी, स्वित्झर्लंड, व इटली आणि दक्षिणेकडून सर्व्हिया व मांटिनीग्रो हे देश लागलेले आहेत. आस्ट्रियाच्या राज्याचा विस्तार २६०००० चौरस मैल असून लोकसंख्या पांच कोटी तेरा लक्ष आहे. युरोपांतल्या पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांत त्याची गणना होते. आस्ट्रिया व हंगेरी हें संयुक्त राज्य आहे, तथापि हंगेरीला स्वराज्याचे हक्क असल्यामुळें आस्ट्रियन बादशहाचा त्या देशावरील ताबा नुसता नांवाचा आहे. तथापि येवढा सुद्धां ताबा आस्ट्रियानें ठेविल्याबद्दल हंगेरीचे लोक असंतुष्ट आहत. आस्ट्रियाचें व जर्मनीचें सख्य आहे, व त्या जोरावरच बर्लिन कांग्रेसमध्यें ठरलेल्या नियमाला न जुमानतां आस्ट्रियानें १९०८ मध्ये बोस्निया व हर्जगोविना हे प्रांत आपल्या राज्याला जोडल्यापासून युरोपियन राष्ट्रांचा आस्ट्रियाच्या शब्दावरील विश्वास उडाला आहे. आस्ट्रियामध्यें पार्लमेंट सभा आहे. तिला रीचस्राथ ह्मणतात. त्यात प्रजानियुक्त व राजानियुक्त असे सभासद असून शिवाय सरदारही लोक बसतात. आस्ट्रियांत १९ पासून ४२ वर्षांच्या वयाच्या सर्व प्रजेवर कष्करी शिक्षणाची सक्ति आहे. शिवाय कायमचें सैन्य सुमारें पांच लक्ष आहे. आरमारांत १३ मोठालीं लढाऊ जहाजें, ३ सशस्त्र क्रुझरें, ८ लहान क्रुझरें, ६ टार्पेडो जहाजें, १२ डिस्ट्रॉयर, ५५ टार्पेडो बोटी व ६ समुद्राच्या पोटांतून चालणारीं जहाजें आहेत. यामध्यें १९११ मध्यें

व नंतर आस्ट्रियानें आणखी भर टाकली आहे. सारांश, लष्करी व आरमारी बळ बरेंच मोठें आहे.

सर्व्हियाचें राज्य बाल्कन संस्थानापैकीं एक आहे. हें राज्य व आस्ट्रिया यांच्यामध्यें ड्यानुब व सेव्ह अशा दोन मोठाल्या नद्या आहेत. पैकीं सेव्ह नदीवर पूल आहे त्या पुलावरून आस्ट्रियाचें सैन्य सर्व्हियांत उतरण्याची भीती होती ह्मणून लढाईला सुरुवात करण्यापूर्वीं सर्व्हियन लोकांनीं तो मोडून टाकिला. पण तेथें बंदोबस्त ठेवावयाचा तो न ठेविल्यामुळें आस्ट्रियानें तेथें एक तात्पुरता पूल बांधून आपलें सैन्य सर्व्हियांत नेलें व सर्व्हियाची राजधानी बेलग्रेड या शहरावर तोफांचा भडीमार करून पहिल्या सपाट्यासरशीं त्याला आग लावून दिली. आस्ट्रियाच्या मनानें सर्व्हियाचें राज्य फारच लहान ह्मणजे अवघें १८६९० चौरस मैल आहे. तथापि तो प्रदेश डोंगराळ असल्यामुळें लपून बसण्यास पुष्कळ जागा आहेत. या देशावर पूर्वीं तुर्क लोकांचे राज्य होतें तेव्हां तुर्कांनीं सर्व्ह लोकांना फार क्रूरपणानें वागविलें. १८७८ सालीं बर्लिनच्या तहानें सर्व्हियाला पूर्ण स्वातंत्र्य मिळालें. १९०८ सालीं आस्ट्रियानें बोसानिया आणि हर्झगोविना हे प्रांत खालसा केल्यापासून सर्व्हियाच्या मनांत आस्ट्रियाविषयींचा द्वेषभाव आहे. व गेल्या महिन्यांत आस्ट्रियाच्या युवराजाचा खून झाला, तो सर्व्हियाच्या चिथावणीवरून आणि मदतीनें झाला अशी आस्ट्रियाची समजूत झाल्यापासून या द्वेषाग्नींत तेल पडून तो भडकला व हल्लींचें युद्ध त्याचाच परिणाम आहे. सर्व्हियांत नियमित राजसत्ता आहे. राजा व त्याचे अष्ट प्रधान यांच्या हातात सत्ता आहे. तरी लोकनियुक्त अशा १६० सभासदांच्या मदतीनें राज्य कारभार चालतो. येथें लोकशिक्षण सक्तीचे व फुकट आहे. प्रत्यक माणसानें लष्करांत नोकरी केलीच पाहिजे अशी सक्ती आहे. लोकसंख्या ९० लक्ष आहे. लोक अतीशय उद्योगी आहेत. पण हे लोक अतीशय स्वाभिमानी असून रक्तपात करण्यांत मोठी मौज मानणारे आहेत. शिवाय ते भांडखोर असल्या मुळें शेजारच्या एकाही राष्ट्राचें व त्यांचें सूत नाहीं. ते अतिशय युद्धप्रिय आहेत. त्यांच्यांत एक गुण फार मोठा आहे. तो एकवचनीपणा हा होय. त्यांना वचनभंग करणें ठाऊक नाहीं. शत्रूंच्या शिरांचा भंग करण्याची विद्या मात्र त्यांना पूर्णपणें ठाऊक आहे. सर्व्हिया देश अतिशय कर्ज बाजारी आहे. त्याला सध्याच २॥ कोटि पौंड कर्ज आहे. त्यामुळें एकंदर उत्पन्नाच्या एक चतुर्थांश रकम त्याला व्याजापायीं सावकारांस द्यावी लागते. ग्रेटब्रिटन हें त्याच्या सावकारांपैकीं एक आहे. सर्विया जवळ लष्कर व आरमार दोन्ही लहान आहेत. तथापि लष्करी शिपाई व आफिसर फार हिमतीचे आहेत, व त्या हिमतीवरच सध्याचें युद्ध त्यांनीं सुरू केलें आहे. त्याला फ्रान्स कडून मदत मिळण्याची मोठी आशा आहे.

---

## हिंदुस्थानांतील पोस्ट हापीस.

हिंदुस्थानांतल्या पोस्ट हापिसांचा इतिहास मोठी गमतीचा आहे. १८३७ पर्यंत हिंदुस्थानात पोस्ट हापीस ठाऊक नव्हतें. सरकारनें आपलीं पत्रें नेण्या आणण्या साठीं कांहीं व्यवस्था त्यावेळीं केलेली होती, पण तिचा फायदा लोकांना देण्यांत येत नसे. १८३७ सालीं लोकांसाठीं पहिलें पोस्ट हापीस उघडण्यांत आलें. त्यावेळीं पोस्टाचें वेगळें खातें नव्हतें. जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखी खालींच सगळी व्यवस्था होत असे. त्यावेळीं पोस्टाचीं तिकिटें नव्हतीं, व पत्रांचें हशील सारखें नव्हतें. पत्राचें वजन व गांवाचें अंतर पाहून कम ज्यास्त महसूल व तोही रोख घेण्यांत येई. कलकत्याहून मुंबईला पत्र पाठविणें झालें तर एक तोळा वजनाच्या पत्राला १ रुपया हशील द्यावें लागे. कलकत्याहून आग्र्याचें हशील १२ आणे होतें. १८५७ सालीं पोस्टाचीं तिकिटें निघालीं, व सर्व ठिकाणीं एक दर झाला. याचवेळीं सगळ्या हिंदुस्थानांतल्या पोस्ट हपिसावर देखरेख करण्यासाठीं डायरेक्टर जनरल नेमण्यांत आला. पूर्वीं पोस्टाकडे पत्रें नेण्याचेंच काम होतें असें नाहीं, तर डाकबंगले, माल नेण्यासाठीं ओड्याच्या बैलांच्या गाड्या व पालख्या यांचा पुरवठा करण्याचें ही काम होतें १८६४ सालापासून आगगाड्यांतून पत्रांचें सॉर्टिंग होऊं लागलें १८७५ सालीं पोस्टल युनियन स्थापित झालें व पुढच्याच वर्षीं हिंदुस्थानचें टपाल खातें त्यांत सामिल झालें, व तेव्हांपासून इतर देशांशीं पत्रव्यवहार सुरू झाला. तो वाढत वाढत हल्लीं अमर्याद झाला आहे. हल्लीं हिंदुस्थानांत १८७८९ पोस्ट आफिसें व ४८९२४ पत्रांच्या पेट्या आहेत. १८७३ सालापासून पी आणि ओ. कंपनीच्या मार्फत विलायतेशी पार्सलांचा व्यवहार सुरु झाला. १८९९ पासून हव्या त्या देशांला पार्सल पाठवितां येऊं लागलीं. १८७७ मध्यें व्हॅल्युपेबल पद्धति निघाली. ती लवकरच इतकी प्रचारात आली कीं १९१२ मध्यें ११ कोट रुपयांच्या मालाची देवघेव टपालखात्यामार्फत झाली. १८८० मध्यें मनीआर्डरीनें पैसे पाठवितां येऊं लागले. पूर्वीं सरकारी खजिन्यामार्फत पैसे पाठवीत, ते आतां टपालांतून जाऊं लागले. गेल्या तीस वर्षांत मनीआर्डरींची एकंदर रकम ४ कोटी रुपयांवरून ४७ कोट रु० वर गेली १८७० सालीं सरकारच्या जिल्ह्याच्या खजिन्याला जोडून सेव्हिंग्ज ब्यांका होत्या. १८८२ साला पासून पोस्टानें अशा ब्यांका उघडल्या. १८८२ सालीं फक्त २८ लक्ष रु० या ब्यांकांतून होते ते तीस वर्षांनीं २०॥ कोट झाले. १८८३ मध्यें पोस्टामार्फत तारा पाठविण्यांची सोय करण्यांत आली. १८८४ मध्यें पोस्टाच्या नोकरांच्या आयुष्याचा विमा पोस्टामार्फत उतरण्याची स्कीम निघाली. १८८८ मध्यें ही सवलत तारखात्यांतल्या नोकरांनाही देण्यांत आली. १८९८ पासून पोस्टामार्फत क्विनीन विकण्यांत येऊं लागलें. त्याप्रमाणें पोस्ट हपिसाची वाढ होत आली असून आतां पोस्टासारखें लोकांच्या सोईचें दुसरें खातें नाहीं असा त्याचा सर्वत्र लौकिक झाला आहे.

---

## आधुनिक गुरु

### अवस्था तिसरी

अंक ३० वरून पुढें चालू.

कानफुके गुरु होतात असेंच ग्रहित धरूं. त्यांना शिष्यांची कळकळ असली पाहिजे. कळकळ आहे असेंही समजूं. शिष्यास देवता कोपाचें भय घालणें ही कळकळ काय? तेंही कबूल. मंत्र द्यावयाचा देवता प्राप्तीसाठीं. प्रत्यय आणून देण्याच्या नावानें पूज्य. मग हळूंच शिष्यांस वेदांतांत गुरुजी नेतात. ह्मणजे देवतेपेक्षां वेदांत श्रेष्ठ. देवता मोक्ष देऊं शकत नाहीं असें तोंडानें ह्मणावयाचें. जी देवता मोक्ष देऊं शकत नाहीं ती कोपली तरी काय करूं शकणार? देवता मोक्ष देऊं शकत नसेल तर मंत्राचें थोतांड तरी कशास हवें? शिवाय मंत्र मागितलेला असतो शिष्यानें. त्याचा असतो देवतेंत पूर्ण भंवसा. लोकांत एक पुरातन समजूत आहे कीं मंत्र अथवा कर्मयज्ञ कोणातरी ब्राह्मणाचे मुखानें ऐकावा. आणि मग जप अथवा इतर कर्में केल्यानें तीं सिद्ध होतात. गुरूंस शिष्यांच्या या भावना ठाऊक असतात. ते प्रथमतः काडीगोडीनें शिष्यास नादीं लावतात. त्यांनींच पसंत केलेला मंत्र त्यांस सांगतात याचें नांव गुरुपदेश असें आह्मी पूर्वीं सांगितलेंच आहे. मंत्र हल्लीं सर्व पुस्तकांतून सांपडतात. परंतु ते कोणीतरी उच्चारले पाहिजेत व आपण ऐकले पाहिजेत. इतकीच शिष्यांची भावना असते. प्रत्ययावांचून विश्वास बसत नाहीं अनुभव करून देणें प्रत्येक माणसाचें काम नाहीं. ज्याला देवता साक्षात्कार करून देतां येत नाहीं तोच ज्ञानाच्या गप्पा झोकूं लागतो. देवतेचा अपमान करूं लागतो. त्याच्यावर त्याचे शिष्याचा विश्वास रहात नाहीं. कानफुक्यास " सद्गुरु " " सद्गुरु " असें शिष्य मानीत नाहीं ह्मणून शिष्यावर देवतेंचा कोप होतो हें ह्मणणें कितीतरी बाष्कळ आहे? हें विचारवंतास सांगणें नकोच परंतु बाया बापड्या, ज्ञाताज्ञातकुताऱ्या, पोरेंसोरें अशा तर्कज्ञानास फार भितात. भक्तिविजयांतील जयदेव संत होता. कारण नसतां त्याचा चोरानीं छळ केला. ह्मणून जयदेव त्या चोरांच्यातर्फे करुणा भाकीत असतां देखील देवांनीं चोरांस पारिपत्य केलें. आमचे सद्गुरु शिष्यास पहिल्यानें भाळवितात आपले नादीं लावतात. त्याच्याच देवतेचा त्यास मंत्र देतात, आणि त्या देवतेचा कोप होईल ह्मणून त्यास भिती घालतात. गुरूंचा देवतेवर विश्वास नाहीं. संबंध होताना आपलें नूं किती अवनड आहे व आपण तें कसें मोडणार आहोंत हें सामावयाचें नाहीं आणि नंतर आपल्या देवतेस कोप करण्याबद्दल सांगणार! देवता त्याचें ह्मणणें ऐकणार. देवता ह्मणजे दरवेशाचें आस्वलच झालें. गुरुनी आज्ञा करतील तशी देवता नाचणार! तिचें काम कोणतें? तर कानफुक्यांच्या अमत्तांचा नाश करणें हें.

आह्मी वर सांगतलेंच आहे कीं आमची देवते बद्दलची कल्पना याच्या अगदी उलट आहे. आह्मी सहस्रशः अपराधी असलों तरी नुसत्या नामस्मरणानें आमची देवता आह्मांस पापमुक्त करते. असें ती करीत नसेल तर ती देवता नव्हे. पण

> गुरवो बहवः संति।
> शिष्यहृत्ताप कारकाः॥
> गुरवो विरक्ताः संति।
> शिष्यहृत्ताप हारकाः॥

दुसरी गोळी पडत नाहीं असें आढळ आल्यावर गुरुजी काढितातः—

**तिसरी गोळी**—गुरुजी नवेंच अस्त्र का[ढ]तात तें पुढील श्लोकार्ध ह्मणण्यानें शिष्य कर्णोपकर्णीं परंपरेनें पोहोंचवितातः—

> गुरु त्यागात् भवेत् मृत्युः॥
> मंत्र त्यागात् दरिद्रता॥

हा श्लोकार्धही बायकापोरांच्या द्वारें, शिष्य पक्के गुरफटवून ठेवण्याकरितां आणि शि[ष्यांना] भय घालण्या करितां आहे. सर्व भूतमा[त्रांत] मनुष्यजात वाचाशक्तीमुळें आणि सद[स]द्विचारशक्तीमुळें किंवा वेदांतिक भाषेंत [बोल]लें असतां बुद्धीनें श्रेष्ठ आहे. म[नुष्य] आपला अनुभव आणि प्रत्यय विसर[तो] तो मनुष्यसंज्ञेस पात्रच नाहीं. गुरु ठरवाव[याचा] तो उदकानें, घुंगट पांघरल्यानें, क्षौरानें, [पि]... अगर इतर बाह्य साधनानें ठरवाव[याचा] नसतो. मन, अनेक प्रसंगीं काष्टांदि[कांस] पुस्तकांस दुसऱ्यांशीं भाषण चाललें [असतां] तिसऱ्याच व्यक्तीस एकादा विधि न [करतां] पूज्यस्थानीं व कधीं कधीं गुरुस्थानीं [मानतें]. मानतें. त्यास कोणी शिकवीत नाहीं. त[्याला] मार्गें कोणी लागत नाहीं. हा माझा असा गुरु डांगोरा फोडीत नाहीं. त[थापि] याचें मन अशा ग्रंथकारास अगर दिकांस अगर व्यक्तीस गुरुच मानीत [असतें]. आपलें मन खेचून घेणारी शक्ति ह[ी] गुरु हें नातें मानसिक आहे. एकदां गुरु मानिलें तो सुटूंच शकत नाहीं मात्र गुरूचा अर्थ आत्मा. गुरुत्याग शक्य नाहीं तर मृत्युही शक्य [नाहीं]. जीवात्म्यास जन्म मरणच नाहीं. तो प्रकाश स्वसंवेद्य आ[हे] ... परमात्मा जीवात्मा एकच आहे. ... त्याग होतो [तर] गुरुस्वीकार करतो कोण? आणि मृ[त्यु] कोणाचा व कसा? गुरुत्याग शि[ष्याला] होऊच शकत नाहीं. गुरुनें नाशिवं[त] देहाचा ह्मणजे गुरुनें देहाचा त्याग [केला तर] देहास मृत्यु प्राप्त होतो. जीवात्मा त्म्यास ह्मणतो हें परमात्मन् गुरुनें तूं या शरिरास सोडलेस कीं या मृत्यु आलाच, जीवात्मा अशा री[तीनें] त्म्याची करुणा भाकीत आहे. त्यास भीति नसून तो परमात्म्याची स्तुति [करीत] आहे, परंतु आधुनिक गुरुलोक [गुरु] पदाचा षष्टितत्पुरुष समास करितात अर्थानें आपल्या शिष्यास भेडावतात [आणि] मूर्खच तेही भितात. एक घटकाभर [हे] मानव देहधारी वाल्मीक, वसिष्ठ, [इत्यादि] मुनींच्या पंक्तितले मानव पु[रुष] घेऊन चालूं. याज्ञवल्क्य [मैत्रेयीची] गोष्ट उपनिषदप्रसिद्ध आहे व

त याच मालिकेंत] येऊनही गेली आहे. ...नेषत्प्रसिद्ध सत्यकाम जाबाली आणि ...की यांची ही मानवी गुरु सोडण्याची ... पूर्वी आलेलीच आहे. अनेक गुरु ... हे भागवतांत आहेच. शिवाजींची ...दासावरची भक्ती थोरी उडाली आणि ...तुकारामबुवांकडे आले. तेथें तुकारामबु... काय काय चमत्कार करुन दाख... तें इतिहासप्रसिद्ध तर आहेच पण ...विनवांतही आहेत. रंगभूमीवर हो...या दृश्य काव्यांतही आहेत. रामदासांस ...हून जाणाऱ्या शिवाजी महाराजांचे म... जाण्याचा विचार येतांच प्राणोत्क्रमण ...व्यास पाहिजे होतें. रामदासांस सोडून ...ारामबुवांकडे जाणाऱ्या दुसऱ्या एका ...ाचीही अशीच आख्यायिका आहे. ...ारामबुवांनीं मंत्र परत करण्याकरितां त्या ...त्यांस पाठविलें. तेथें समर्थांनीं सांगित...वरुन त्यानें दगडावर चूळ टाकिली. दगडावर ...ी सरशीं राम अक्षरें उमटलीं. लोक या ...ख्यायिकेचा थोडा विपर्यास करतात. खरी ...यायिका अशी आहे. तुकाराम बुवांकडे ...ल्यावर ते ह्मणाले अद्याप मंत्र गेला ...हीं. त्यांनीं पुनः चुळा भरुन टाकाविल्या ...र चुळेकि बरोबर रामनाम निघालें. त्यांनीं ...व्याची खात्री करुन देऊन त्यास परत ...ाविलें. ही आख्यायिका अनंत प्रकारें ...धप्रद आहे. ज्या गुरुस शिष्यास परमार्थ ...ावा एवढीच इच्छा असते, त्यास शिष्य ...ोठेंही असो, सन्मार्गांत आहे येवढें कळ...यानें आनंद होईलच होईल. शिष्य त्यांचे ...ाराशीं येतील. ते शिष्य शोधार्थ दारोदार ...हिंडत नाहींत. एक गुरु दुसऱ्या गुरुचे ...शिष्य फोडीत नसे. परंतु हल्लीचे प्रात्मगुरु ' गुरुः गुरु दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते आणि ...असे कां ? तर ' सांप्रदायस्य हानिर्भवतीति मे निश्चयो ध्रुवम् ' ही त्यांची गर्वोक्ति असते. रामदासास सोडावें इतकें या ओक्या शिष्याचे मनांत आल्याबरोबर त्यांचे प्राणोत्क्रमण कां झालें नाहीं बरें? आधुनिक गुरु पैकीं एखादा या... कारणाचा शोध लावील तर ' सर्वथा ...सैन्यं ' होईल. या वरुन ' गुरु त्यागांत ' पदाची षष्ठि तत्पुरुष समास नाहीं हें खास तसा केल्यास वरील अपवादांमुळें त्या श्लोकांतील भयाणक स्वरूप सिद्धांतरूपी नसून बीभत्सरस पोषक आहे असें ह्मणावें लागेल. शिवाय गुरुस जें त्याज्य रूपच नाहीं तें प्राप्त होऊन त्यास अधम पद प्राप्त होते. शिवाय व्यवहारांतील व्यक्ति पृथक्त्व आणि भेदभाव गुरु मार्गी लागतात.

दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं वरील पादार्थांत मृत्यूची मुदत दिली नाहीं. आडक्याचे तीन आषाढ शुद्ध पौर्णिमेस हातांत लोटा घेऊन येणाऱ्या गुचा त्याग वाटेल तेव्हां आणि लागेल तसा करितां येतो. खरा गुरु ज्याचा तोच. जो तो आपलें आपणास सोडूं शकत नाहीं. तरी पण आपण समजूं कीं आपण आपणा स्वःतांस सोडून देऊं शकतो व त्याप्रमाणें त्यानें सोडलेंही. घटकाभर जीवात्म्यास (ह्मणजे परम स्थास मृत्यु आहे असें धरुं. तर मग हा मृत्यु गुरुत्यागापासून किती दिवसांनीं होईल याचें उत्तर कोणी गुरु देईल काय ? आह्मांस येथें मुदतीचा कायदा पाहिजे. आमचें या पेक्षां अधिक मागणें नाहीं. ' उभयोः शिष्यगुरवोर्मृत्युर्निश्चितएवाहि ' हेंही आह्मांस ठाऊक आहे. आह्मांस जें काय पाहिजे तें हेंच कीं ही गोष्ट किती दिवसांत घडून येते, हे कोणी तरी कळवावें. आह्मावर उपकार होतील.

हरएक सांप्रदायांत मग तो सगळा दहा पांच शिष्यांचा अगर दशसहस्त्र शिष्यांचा असो. एका गुरुकडून फोडून आपल्या सांप्रदायांत सामील केलेले कांहीं ना कांहीं तरी शिष्य सांपडतात. त्यांचें प्राणोत्क्रमण कां झालेलें नसतें ? मागाहून बनणारे गुरु अधिक लफंगे असतात. ते ह्मणतात पूर्वीचे गुरुंत ज्ञान देण्याचें सामर्थ्य नव्हतें. माझ्यांत आहे ह्मणून हें पांखरुं पूर्वींच्या गुरुच्या आज्ञेनेंच, पूर्वींच्या कळपास सोडून माझ्या संप्रदयांत आलें यावरुन ही गोष्ट निर्विवाद आहे. वरील पदार्थ जादू टोण्यासारखा शिष्यास मानसिक मूठ मारण्यासाठीं उच्चाला जातो.

कोणी मृत्पिंड बुद्धिसांप्रदायिक ह्मणतात हीं उदाहरणें थोडीं आहेत याबद्दल सार्वत्रिक सिद्धांत काढतां येत नाहींत. अशांनीं आपल्या बुद्धीवर लागेल तितके आप्रवाह जल सिंचन करुन घ्यावें. त्यांनीं आपली नाशिवंत खुशातें गुरुंस समर्पण करावी. हा लेख फक्त ज्यांना समाजाची काळजी असेल, फसले गेलेले असतील, ज्यांना गुरुपदेश असह्य वेदनादेत असेल, अशांसाठीं आहे. भाविक लोकांच्या श्रद्धेचा फायदा घेऊन स्त्रियांनां उद्धट, बेमर्याद, असभ्य वर्तन करण्याचा जो यत्न चालला आहे त्यास आळा बसावा ह्मणून लिहिलेला. या पलीकडे यांत कोणताही उद्देश नाहीं. स्वयंमन्य झाल्यावर यांचा कांहींच परिणाम होणार नाहीं मग त्यांच्या सच्छिष्यांवर कोठून होईल? मानवी प्राण्यास गुरु मानण्यास लावणारी गुरुगीता देखोल अशा 'मानवी' गुरुंस सोडावें ह्मणून सांगते.

अपूर्ण

## महा युद्ध

### (युरोपांतील प्रज्वलित होमकुंड)

कौंट टालस्टाय यांनीं आपल्या मरणापूर्वी थोडे दिवस रशियाचे श्रीमंत झार यांनकडे आपल्या दीव्यदृष्टीची एक पत्रिका पाठविली होती. त्यामध्यें त्यानें १९१२ त लढाईच्या पहिल्या ज्वाला पेटतील असें सांगून हा कलहाग्नि सर्वत्र प्रलय मांडील असें ह्मटलें हेतें. त्या वाणीचा खरेपणा सांप्रतचें महायुद्ध स्पष्ट करीत आहे. बेलजीऊम लोकांनीं जर्मनीचा खडा जंगीचा पराभव करुन एक लढाऊ जहाज बुडवून टाकलें. फ्रेंचांनीं जर्मनीचीं दुसरीं दोन जहाजें पकडलीं आहेत रशियानें जर्मनीला आपल्या हद्दीबाहेर हांकलून दिलें. सरव्हियानें मोठ्या बहादरीनें आस्ट्रियावर ताण केली आहे. हा लढाईचा वणवा सर्व युरोपभर पेटला असून सर्वत्र रक्तपात चालू आहेत. जन्माचे हाडवैरी जें फ्रान्स राष्ट्र त्याच्या मदतीला इंग्लंडनें लढाई चालविली आहे ही इतिहासांतील अद्भुत व अपूर्व गोष्ट होय. अशा लढायाच्या बातम्या शिवाय लोकांस चैन पडत नाहींसें झालें आहे. व्यापाराची दाणादाण उडत चालली असून विलक्षण क्रांती घडून येत आहेत. १८२९ सालीं एका देवर्षि बाईनें भविष्य केल्याप्रमाणें जर्मनीचा ऱ्हास व अंत १९१२ तें होणार होता तो आतां या सालीं होत आहे की काय कोण जाणे ! या विक्राळ कालाच्या दाढेंत कोणकोणत्या राष्ट्रांचा स्वाहा होणार आहे हें लोक आपापल्या तर्काप्रमाणें ठरवित आहेत, आणि ल्हान ल्हान मुलें देखील युरोपाचा नकाशा घेऊन लढायाच्या बातम्या कौतुकानें समजून घेतात- क्षणोक्षणीं विद्युत्संदेश वाचण्यास मिळतील तरी ते पाहिजेत अशी अपूर्व उत्कंठा उद्भवली आहे.

या वेळीं इंग्लंडाच्या अन्नासाठीं इंडियन राष्ट्र सर्वस्व अर्पण करण्यास सिद्ध आहे असा विलक्षण एकीभूत ध्वनि ऐकून इंग्लिश सरकारास आमच्या राजनिष्ठेचीं खरी पारख होईल आणि असा भरंवसा आहे कीं ज्या हत्याराच्या कायद्यानें इंडियन राज्यावर मोठा कालिमा आणिला आहे तो कायदा रद्द होऊन ब्रिटिश प्रजेचे सर्व हक्क सर्व पृथ्वीभर इंडियाला दिले जातील.

ईश्वरीसूत्राप्रमाणें अशा भयंकर युद्धाचा गोड शेवट करणारा एक दिव्य पुरुष निघाला पाहिजेच आणि कौंट टॉलस्टाय यांनीं ह्मटलें आहे कीं तो दीव्य पुरुष पुढील वर्षी जगास आपलें आगमन आनंदाच्या बातम्यांनीं जाहिर करील.

॥ तथाऽस्तु शुभं भवतु ॥

## वऱ्हाडवृत्त

हवामानः— मागील आठवड्यांत पावसाची उघडच होती. तरी पण हवा अगदीं स्वच्छ नव्हती. ती साधारण गेल्या बुधवारीं ह्मणजे राखी पौर्णिमेच्या दिवशीं बरीच निवळली आणि परवाच्या शनिवारीं तर आकाश स्वच्छ होऊन बरेच दिवसांनीं चांगलें कडक ऊन पडलें परंतु रात्रीं पावसाची भुरभूर होतीच. काल सकाळीं फिरुन आकाश अभ्राच्छादित झालें आहे. आतां चांगली उघाडी एक आठवडाभर तरी पाहिजे. नाहीं पेक्षां पिकें खुरटण्याचा बराच संभव आहे. वाशीम पुसद कडील व इतर डोंगर पट्टीच्या भागांत उघाडी पडेल तरच पिकाची स्थिती उत्तम होईल. निंदणी, कोळपणी वगैरे सुरू आहेत. रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

मूर्तिजापूरहून निघालेल्या एका माल गाडीचें एंजिन गेल्या शनिवारीं मूर्तिजापूर आणि काटेपूर्णा या दोन स्टेशनचे दरम्यान एका ओढ्याच्या पुला जवळच रुळावरुन घसरुन चारी चाकें जमिनींत घुसून बसलीं. ही गाडी आणखी दहावीस यार्ड पुढें गेली असती तर सर्व गाडी पुलावरुन कोसळून तिचा चुराच झाला असता. अर्थात ते दिवशीं सर्व गाड्यांना चार चार पांच पांच तास उशीर झाला. रस्ता साफ करण्याची व उतारुंस एका गाडींतून नाल्या पलिकडे दुसऱ्या गाडींत बसविण्याची व्यवस्था रा. रा. ऑटले रेल्वेचे अधिकारी, यांनीं उत्तम तऱ्हेनें केली होती.

रा० रा० नारायण भार्गव गाडगीळ, एक्स्ट्रा असिस्टंट कामिशनर उमरावती, हे रजेवर जातील त्या तारखेपासून त्यांस तीन माहिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली आहे,

रा० रा० ठाकूर रघुवीरसिंग, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, हे आपल्या रजेवरुन परत आले ह्मणजे त्यांस उमरावती येथें नेमण्यांत आलें आहे.

पुणें येथील ज्ञानमित्र पुस्तकमालेंतील "मधुर-मीलन" नांवाचें ११ वें पुष्प आमचे कडे आलें आहे त्याचा आह्मी साभार स्वीकार करितों. हें पुष्प अगदीं जाई, जुई, मोगरा, चमेली या जाती इतकें सुवक, व सुवासिक जरी नाहीं तरी पण काटाकोरांड्या इतकें नीरसही नाहीं. तसें पाहूं जातां प्रत्येक फुलांत मग तें कसलेंही असलें तरी मधुर मधु मधुमाक्षिकेला सांपडतोच. तद्वत्च सदर पुष्पात मध भरपूर आहे. मात्र तो कमळापासुन निघणाऱ्या मधाइतका उच्च दर्जाचा नाहीं. या "मधुर-मीलन" कादंबरीची भाषा साधारण आहे. कथानक मात्र चटकदार आहे. त्यांतील रमणीमोहन व चित्रलेखा ह्या दोन व्यक्ति बऱ्याच उच्च दर्जाच्या असून पहिल्याची मातृभक्ति व दुसरीचें उच्चशील वाचकाला थक्क करुन सोडतात. एकंदरीनें "लाइट लिटरेचर" या दृष्टीनें घटकाभर करमणुक होण्यास हें पुस्तक योग्य आहे. याचे लेखक कृष्णानुज-कालेवर असून किं० ६ आणे आहे.

### पत्रव्यवहार

मुर्तिजापुर ९।८।१९१४

पाऊस उत्तम झाला असुन पिकांची स्थिती उत्तम आहे. निंदण डवरण करितां ८.१९ दिवसांची जरुर उघाडी पाहिजे. मे. डिपुटी कमीशनर साहेब आपल्या पत्नी सह रविवारीं येथें येऊन काल सायंकाळीं परत गेले. सॅनिटरी पंचाईतीचे जागीं म्युनिसिपाल कमटी स्थापन करण्या करितां लागणाऱ्या जमा खर्चाचा हिशोब पाहून जमल्यास १ आक्टोबर किंवा १ जानेवारी १९१५ पासून म्युनिसीपाल कमेटी स्थापन होण्या विषयीं बहुतेक मर्जी ठरल्या प्रमाणेंच आहे. खर्चाची मिळवणी कमेच्या कोण कोणत्या बाबी कडून करवावयाची याबद्दल हिशेबाचो वाटाघाट झाली. म्युनिसिपाल कमेटी झाल्यावर आमला काय काय ठेवावयाचा याबद्दल ही ठरलेंच आहे.

मे० डेबर साहेबांची लोकांशी मिळून मिसळून प्रेमानें दुसऱ्याचें अंतःकरण न दुखविता वागण्याची शैली अपूर्व आहे! नागपूर प्रातांत देव साहेब अशी बोलण्याची वहीवाट असल्याचें एकीवांत आहे तें अक्षरशः खरें आहे.

ईश्वर कृपेनें उत्तमोत्तम लोकप्रीय अधिकाऱ्यास दीर्घायुष्य होऊन ते या जिल्ह्यास चिरकाल लाभोत अशी सर्व मूर्तिजापुरस्थ लोकांची ईश्वरा पाशीं प्रार्थना. आहे. कळावें.

स

## सेंटचा राजा

वापरुन तर पहा!!

# ओटो सुगंधीचा भांडार दिलचमन

( रजिस्टर्ड )

आजपर्यंत बाजारांमध्यें निघालेल्या सर्व सेंट, अत्तर, यापेक्षां हे ओटो दिलचमन जास्त टीकाऊ मधुर आणि अधीक खुशबेदार आहे अशी आह्मी पुरी खात्री देतों. जर तुह्मी **ओटो दील-चमन** वापरला नसेल तर, एक वेळ वापरुन खातरी करुन घ्या. व ह्यांत स्पीरीट बिलकूल नाहीं, **चमेली** आणि **बटमोगरांच्या** ताज्या फुलांच्या अर्कापासून तयार केलेला आहे. फक्त २, ३ थेंब रुमालावर किंवा वस्त्रावर टाकल्यानें एकदम अनेक सुंगधाचा भांडार प्रस्तृत् होऊन तुमच्या आसपासच्या सर्व लोकांच्या मनास आनंद होईल.

किंमत -॥- ड्रामची टयुब ८ आणे | किंमत -॥- औंसाची बाटली २ रुपये.
" १ " " १२ आणे | व्ही. पी. पो. खर्च वेगळा,

**ओटो दीलचमनचीं सुगंधी कार्डे दर डझनास १२ आणे,**
**सेंटच्या नमुन्यासाठीं दोन आण्याची टिकीटें पाठवा.**

**सेंट, ओटो किंवा सुगंधी कार्डे** खरेदी करतेवेळीं **ओटो दीलचमन** हें नांव बरोबर वाचून पहावें. जर तुमच्या जवळच्या दुकानदाराकडे मिळत नसेल तर, खालील पत्त्यावर लिहून माल मागवावा.

एकटे एजंटस् **एच्. आर. मोदी आणि कं.**

तारेचा पत्ता "सेकेरीन" मुंबई. } विलायती औषधें व परफ्युमरीचे व्यापारी
नं. २० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर मुंबई.



वार्षिक वर्गणी टपाल व्ही. पी. सह १८२
वर्षारंभ जुलै.

### बाल सन्मित्र पुस्तक माला.

या मालत सन्मित्रा प्रमाणें सदुपदेश करुन चांगलें वळण लावणारीं, सोप्या पण चटकदार भाषेंत लिहिलेलीं १००।१०० पृष्ठांचीं मनोरंजक व अत्यंत उपयुक्त पुस्तकें वर्षांत चार प्रसिद्ध होतात. डॉ. सर भालचंद्र; स. ब. चि. वि. वैद्य एम्. ए. एल. एल् बी. रा. ब वि. मो महाजनि एम्. ए. रा. सा. मो. वा. कानिटकर बी. ए. एल्. एल्. बी; रा. सा. वि. कॉ. ओक; ह. ना. आपटे वा. गो. आ. बी. ए इ. सुप्रसिद्ध विद्वान् गृहस्थांचे उत्कृष्ट अभिप्राय मालेंतील विक्रीचीं पुस्तकें १ **अभ्यास** ( अत्यंत उपयुक्त निबंध ) २ **दिवाळीची देणगी** ३ **नीतिभूषण** ४ **सद्बोध रत्नहार**, ( तिहींतही गोष्टी, कविता, निबंध, नाटकें, चरित्रें, पत्रें इ० उत्कृष्ट विविध विषय ) प्रत्येक पुस्तकास व्ही. पी. नें ८८ एकदम चारी घेतल्यास १८७ नवीन वर्गणीदारांस फक्त १८२ पडतील.

एजंट परचुरे पुराणिक मंडळी मुंबई नं० ४ } व्यवस्थापक **बालसन्मित्र कार्यालय मुंबई नं० २**
**अगर मालवण**
**जि० रत्नागिरी.**

नो. नं. २१


### नोटीस

नोटीस बेशमी नागोजी वा॥ निंबाजी जात बेलदार राहणार डोंगरगांव तालुका आकोला यांसः— खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी. तुमची लग्नाची बायको असून सुमारें ९ वर्षें झालीं तुह्मी मजला टाकून दिले. व तुह्मी दुसरी गंधर्वाची बायको केली. तरी तुह्मास कळविण्यांत येतें कीं, मी किसन वाघ याचे जवळून अन्नवस्त्राकरितां रुपये दोनशे पांच वर्षांकरितां कर्जाऊ घेतले आहेत. तरी ते दोनशे रुपये देऊन मजल आपण घेऊन जावे. मी नांदण्यास तयार आहे. असे जर नकाराल तर हीच फारकती ह्मणून समजावी. तरी या नोटीशीचे उत्तर पंधरा दिवसाचे आत यावे. या नोटीशीचे व कोर्ट खर्चाचे सुद्धां पैसे भरुन घेतले जातील. कळावें तारीख २८।७।१४ ई०

सही

जनाबाई मर्द नागोजी रा. डोंगरगांव ता. आकोला नि० आंगठा असे.

नो० नं०२२


शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, झाडा, संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरियनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ८१२


बी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो. नं०२३



## घड्याळ फुकट मिळेल



( आमके आम और गुठलियोंके दाम )

गजकर्णाचे [ दाद ] रामबाण मलम किं. ४ आणे दराची १२ शीशी ३ तीन रुपयांची घेणारास टाइमपीस घड्याळ फुकट मिळेल. २४ शिशी एकदम घेणारास खिशांतील [ जेब ] घड्याळ फुकट मिळेल. औषध विकून घड्याळ फुकट वापरा.

आमचे कारखान्यांत, सर्व प्रकारचीं पुस्तकें, औषधें, घड्याळा चाचेस, सुगंधी सामान, तेलें, अत्तरें वगैरे योग्य किंमतीनें मिळतात. आमचा मोठा क्याटलाग फुकट मागवा. तसेंच आपण आपल्या व आसपासचे गांवातील लिहीणदार माणसाचीं ५० पन्नास नांवें पूर्ण पत्त्यासह लिहून कळविल्यास मनोरंजक पुस्तक पाठवू.

१ टेबलावर ठेवण्याचें टाईमपीस घड्याळ १॥ रु.
२ रास्कोप सीस्टिम [ खिशांतील घड्याळ २ रु.

**पत्ता जयचंद्र कंपनी ( वर्धा सी. पी.)**

नो. नं. २४



साताऱ्याचे प्रसिद्ध कोल्हटकर राजवैद्यकृत

## कस्तुरीच्या गोळ्या

यापासून अपस्मार वायू—ज्यांस बालग्रह फीट्स [ हिस्टेरिया ] फेंपरे मिरगी, वतारणें, आंकडी वगैरे ह्मणतात तो आजार, लहान मुलें व मोठीं माणसें यांचा नवा जुना आजार खात्रीनें बरा होतो. तसेच बहुतेक सर्व ज्वर अर्धांग वगैरे वायू बरे होतात. ४ आणे पासून वर कितीही किंमतीच्या गोळ्यांच्या बाटल्या माहितीचे कागदासह विकत मिळतात. रोखीनें अगर व्ही. पी. नें मागवा. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें. याशिवाय बहुतेक प्रकारच्या मात्रा, गोळ्या, भस्में, आंसवे, यातहारक तेलें विकत मिळतात.

**सखाराम अप्पाजी कोल्हटकर वैद्य,**

ठाकुरद्वार रोड हरकुवरबाई नवी चाळ, मुंबई नं० २

नो० नं० २९

| | |
|---|---|
| नवरत्न | न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे. |
| न टेबलेट | उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे. |
| त्न तमाखु | पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा. |
| ासी नस | अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे |
| र्णीचें मलम | गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे. |
| ढण्याचें तेल | केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे. |
| कान्त बाम | मेंदूला व डोक्याला आत उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे. |

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट— चमन कंपनी.

ा— ताजनापेठ बाजार— आकोला.

. नं. २६



# riental Government securi;y Life Assurance Co:, Ltc.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPA Y

## FUNDs 4½ CRORES.

ITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICI PAL AND PORT TRUST BOUNDS.

## inquennial Record of Prog:ess.

| No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|
| | Rs. |
| 8,668 | 2,63,38,000 |
| 17,657 | 4.68,36,090 |
| 28,516 | 6 81,27,774 |
| 40,390 | 8.47,06,108 |
| 52,168 | 10,12,93,883 |
| 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36'38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| 1898 | 31,36,422 | 1,41,32 356 |
| 1903 | 41,07,009 | 2,10,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*he Bonus declared for the last triennium constitutes a record.*

DIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH d TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*ct from report made npon the Company's position as at 31st December Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

each of the last three Valuations the Reserves of the Company n calculated on an increasingly stringent basis. On this occasion s been a further addition to the reserves and the financial position Company has been further strengthened. The resources of the are now so ample that the security which they afford is undoubted icyholders and Shareholders alike may confidently look forward to uation of prosperity in the future."

not delay in applying for Insurance—delays are dangerous. The is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy with a absolute security and possessing all the important factors essential class office it commands the full confidence of the public.

ENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL particulars, prospectus and prosposal forms on application to:—

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh, NPU.*

N. No. 27



अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ॥ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. २८



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांड्याचें तेल,

किंमत रुपये ५ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलयझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,

दवाखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० २९



सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

## आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षे अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना संधिवात, त्वचा संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यास उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गौतमराव केशव

नो० नं० ३०

५६३ ठाकूरद्वार मुंबई.


हें पत्र आकोला येथें कैलासवासी रंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण रंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला-- सोमवार तारीख १७ माहे आगष्ट सन १९१४ इ० [ अंक ३२

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

---

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पावुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.
ह्या बॅंकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेविल्या घेतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवता येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयेप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ } J. G. Ridleand. एजंट

नो. नं १

---

## मुंबई बॅंकचें सोनें.

मुंबई बॅंकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बॅंकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बॅंकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{३}{४}$ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बॅंक
आकोला २१-९-१० } J. G. Ridland. एजंट.

नो० नं० २

---

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व बाढदार भांडीं आमचे-कडे विक्रीस तयार असतात. माल माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ३

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाश्यांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १॥८

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ॥४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरुज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ॥४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ४

---

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. ( Natl ) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S. I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN 301, *Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 5

---

## 'विकावयाचा आहे.'

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टा-जवळ असलेला के॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायण भट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते हिंगोली व्हाया वाशीम लौकरच रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ६ वऱ्हाड

---

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ॥८ व्हीपीनें ॥१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १॥६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी

नो. नं. ७

---

### "खरें पौष्टिक औषध"

पाहिने असल्यास, आमचे हात भट्टीचे, शास्त्रोक्त यथासांग पद्धतीनें, निर्विकारी, व ज्यांत [ कारखान्याचे औ० प्रमाणें ] उष्ण गुणधर्म नाहीं, व प्रतिज्ञेनें १४ दिवसांत हटकुन गुण देते, असे वंगभस्म वापरा किं. तो. ३ रु. अनुपान खरडा सोबत असतो ४० विकार, यानें दुरुस्त होतात. तसेंच वरील पद्धतीनें, प्रवाल भस्म तयार असून ११ विकार घालविते. खरडा सोबत असतो. ज्यांना, परमा, उपदंश, व इतर कांहीं कारणामुळें, उन्हाळ्यांत, उन्हाळी लघवींत आग, धातुस्थानची कडकी, असे विकार होतात, यांना याचा फार उपयोग होतो. किं. तो. २ रु. शिवाय पौष्टीकही आहे. त्वचारोगांतक— १ मलम, खरुज, गजकर्ण, खवडा, आगपैण वगैरे कोणत्याही त्वचा रोगावर चालतो. अनेक मलमाची जरुरी नाहीं. किं. ८ आणे वि. सु. क्याटलाग मागवा. फुकट--व्ही. आर. मुळे, नांदुरा, जी. आय. पी.

नो. नं. ८

---

बंगाली कथानकाचे आधारें लिहीलेली

## मधुर-मीलन.

लेखक--श्रीयुत, कृष्णानुज—कालेकर.
वाचकांचें मन आनंदानें प्रफुल्लित करणारी अत्यंत चित्तवेधक नवी कादंबरी.
कथानक रम्य व उदात्त, भाषा सोपी पण चटकदार. प्रकरणे २४. किं. व्ही. पी. सह आठ-आणे. प्रो० हरिहर प्रेस, पुना–सिटी

नो. नं. ९

---

गवत ! गवत !! गवत !!!

### जाहिरात.

जी. आय. पी. रेल्वे लाईन वरिल वरोरा ष्टेशन येथें वक्त मोहसमी कटाई केलेल्या चांगल्या प्रकारच्या चराई गवताचे गठ्ठे बांधण्याचें काम पावसाळा संपतांच शुरु केलें जाईल. ज्या लोकांना गवत खरिदी करावयाचे असेल त्यांना विनंती करण्यांत येतेकीं त्यांनीं खाली सही करणाराकडे ३१ आगष्ट १९१४ चे अगोदर आपले मागणी अर्ज पाठवावे.

दस्तखत
सही. सी. एफ. बेल.
डिव्हीजनल फारेस्ट आफिसर
नार्थ-चांदा डि. चांदा.

नो० नं० १०

---

### मुद्दाम अगोदर हें वाचावें.

शेंकडों लोकांस गुण आला आहे. काळजीसारखा दुसरा रोगच नाहीं. कांहो, इतकी काळजी कां करतां. तुमची इच्छा हीच आहेना? व्यापारांत फायदा व्हावा, नोकरींत बढती मिळावी, परीक्षा पास व्हावी, संतती व्हावी, कर्जमुक्त व्हावें, घरांत कलह, होऊं नये, शरीरांत सौख्य व्हावें, कोणतीही बाधा होऊं नये, इतक्या गोष्टी बद्दल काळजी करण्यास नको असेल तर प्रसिद्ध मांत्रिक माणिकप्रभु येथील रामचंद्र तात्या ह्यांचा **जगप्रसिद्ध अद्भुत ताईत** जवळ ठेवा. म्हणजे सर्व गोष्टी मनाप्रमाणें होतील ताईताच गुणाची ह्या देशांत व परदेशांत ख्याति आहे. अनुभव घेऊन पहावा. गुण न आल्यास पैसे परत मिळतील. कोणतीही शंका घेऊं नका. कोणते वर्तमान पत्रावरून मागणी केली हें कळवावें. नंबर १ चा ताईत ह्याची किंमत रुपये ८ - नंबर २ चा ताईत किंमत रुपये ४ नं. ३ चा ताईत किंमत रु. १। ट. व्ही. पी. खर्च ॥९ आणे. नंबर १ च्या ताईता पासून १५ दिवसांत गुण येईल. नंबर २ च्या ताईतापासून एक महिन्यांत गुण येईल. नं. ३ च्या ताईताचा गुण २ महिन्यानीं येईल. जशी जरूर असेल त्याप्रमाणें मागणी करावी.

पत्ताः—वासुदेव रावजी लेले
नो. नं. ११ मिरज

### नोटिस

बेशमी जयराम वल्लद महाजी दरेकार कुणबी राहणार धानोरेभुसे व रामजी वा॥ लक्ष्मणजी वानखेडे कुणबी राहणार दापुर खुर्द ता० मंगरुळपीर यांसः-

खालीं सही करणारी यांज कडून नोटीस देण्यांत येते की दापुरखुर्द येथील गढीतील जागा पु० प० हात ६० व दक्षण उत्तर हात ५० व गावचा मानपान पोळा, दसरा, होळी व माबाचा टिकला व मानपानाची सुपारी व ताना सुताचा सदरहू पैकीं जागा सालीम व गावचे मानपानात निमेचा हक्क हे पुर्वी सिताराम वा॥ बापुजी करडे यांस माझा जेठ रावजी वा॥ रावोजी यानें विकले असून व त्याचा ताबा असून तुह्मी माझे नवऱ्या पासून फंदफितुरानें खरीदी करून घेतले व रुपयेही न देता रजिष्टर करून घेतलें सबब या नोटीसीनें असें कळविण्यांत येते कीं सदरहू खरीदी खत पोकळ आहे व खरीदी खता नंतर सोनबा वा॥ रावोजी व रामजी अमनकार, व श्यामा तेली यान पासून कांहीं तरी थापेनें भाडे चिठ्या लिहून घेतल्या त्या रद्द असत माझा नवरा अगदी ह्मातारा असून त्यास आफूचे व्यसन असल्यानें माझे समत्ती वाचून लिहून घेतले ते सर्व दस्तऐवज या नोटीसी वरून रद्द असत कळावें ता० ४।८।१४ मुक्काम आकोला द० विष्णु प्रभुराम पेनशनर आकोला

सही

नि० रंगु मर्द सोनबा करडे रा० दापुर खु० पोलीस स्टेशन मानोरा ता० मंगरुळपीर इचे खुद्द हातची बांगडी असे

नो० नं० १२

### नोटीस

नोटीस बेशमी बाबाजी विश्वंभर बाहिरसदे राहणार नरवेल तालुके मल्कापुर जिल्हे बुलढाणा यांसः—

नोटीस देणार भिकाजी बाबाजी बाहिरसदे यांजकडून नोटीस देण्यांत येतेकीं, तुह्मी पांचसात वर्षांपासून वाईट लोकांचे संगतीनें लागून असलेले आपले वडिलोपार्जीत इस्टेटीची अफरातफर करीत आहांत तर असे करून मज आह्मानास बुडविणें आपणास योग्य नाहीं व या तुमचे वाईट वर्तनामुळें मी व माझी आई असे आह्मी सहा वर्षांपासून माझे मामाचे गांवीं त्याचे आश्रयानें लोकांचें कर्ज काढून राहत आहे. यामुळें आह्मांस आमचे खाण्यापिण्याबद्दल सहा वर्षांचे कर्ज रुपये ७९० साडसातशें आणि याशिवाय माझे मौंजीस लागलेले २०० रुपये लोकाचे कर्ज असे एकंदर रुपये ९९० साडेनऊसे कर्ज झालें आहे. करितां तुह्मास या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत आमचेवर झालेले कर्जाची व्यवस्था लाऊन आमची पुढें खाण्यापिण्याची व्यवस्था चांगलें रीतीनें लाऊन द्यावी नोटीसीचे मुदतींत आपलेकडुन व्यवस्था न झाल्यास आमचेवर आजपर्यंतचे झालेले कर्जाबद्दल आणि पुढें आह्मास लागणारे खाण्यापिण्याचे खर्चाबद्दल दिवाणी कोर्टांत आपलेवर दावा आणणे भाग पडेल आणि पुढें आपले पासून कोर्टखर्चासह रुपये भरून घेतले जातील करितां व्यर्थ दोघानींही खर्चाचे पेचांत येऊनये आणि लोकांनींही दोष देऊनये ह्मणून आपणास या आगाऊ नोटीसीनें सुचविलें आहे व या पुढें तुह्मी आपली कोणतीही स्थावर जंगम इस्टेट कोणास कोणतेही प्रकारे गहाणखरेदी बक्षीस अथवा भाड्यानीं देऊनये दिल्यास ती आह्मानास बुडविण्याचे हेतुनें दिली असे समजून ती केलेली व्यवस्था खोटी समजली जाईल करितां आपणापासून कोणी घेऊनये आणि फसूं नये ह्मणून या नोटीसीनें सुचविले आहे कळावें ता० ६-७.१४ इसवी.

सही

भिकाजी बाबाजी बहीरसदे शेगांव

नो० नं० १३

### नोटीस

नोटीस बेशमी भिवराज राममुक मालक राममुक दयाराम मारवाडी सहू दु॥ हिवरखेड ता॥ आकोट यांसः—

नोटीस देणार उत्तमराव संपतराव देशमुख रा० हिवरखेड ता॥ आकोट नोटीस देतोकीं, आमचा मैयत बाप संपतराव केशवराव यांनीं तुह्माला ता० १९ एप्रील सन १९०२ ई० रोजीं २ दोन साल बंदि तारे गहाणखत करून दिलें. त्याप्रमाणें त्यांनीं संवत १९६६ पर्यंत सालबंदि शेती स्वतः वाहून फेडल्या. संवत १९६७ चे मिती मार्गशीर्ष शु॥ १९ चे कराराबद्दल जो ता० १३-६-१९१० ई॥ रोजीं सालबंदि तारेगहाणखताचा जो कबुलपट्टा रुपयें ३९० यांचा त्यांनीं लिहून दिला त्याची फेड ते मरण पावले करितां अडचणीमुळें आह्माकडून झाली नाहीं, करितां तुह्मी आह्मा तीघांवुस प्रतीवादि करून वि० सबजजसा॥ कोर्ट अकोला यांचें फैलाबरिल मु॥ नंबर ११२ सन १९११ यांचें कडेस शेती ताब्यांत मिळण्याबद्दल व पट्ट्याचे रुपये ३९० संमत १९६७ मा. शु. १९चे सालबंदीबद्दल मिळून फिर्याद केली त्यावेळीं त्या मुकदम्याचा निकाल तारिख २०-७-१९११ ई॥ रोजीं तुमच्यांत व आमच्यांत असा निकाल झाला कीं, १ सर्वसाल बंदि फिटेपावेतो जोखीम तुमचेवर राहील २ तुह्मी स्वतः पट्टा करून घ्यावा. ३ सालबंदि पडीत पडल्यास जमीन आह्मी ताब्यांत घेउ असा आपला आपसांत ठराव होऊन त्या प्रमाणें आपसांत निकाल झाला वादीचा ९० रुपये खर्च प्रतीवादिने द्यावे वादीचा दावा डिसमीस असा कोर्टाकडून फैसल करून घेतला. त्याप्रमाणें आजपावेतो १ सर्व जोखीम माझेवर घेतली २ माझे नांवानीं आजपावेतो कबुलपट्टे करून दिलें ३ सालबंदि पडीत पाडली नाहीं, मी आजपर्यंत ठरावाबाहेर कांहीच सुद्धा गेलो नाहीं, पण तुह्मी विनाकारण संवत १९७१ चे मिती मार्गशिर्ष शु॥ १९ सालबंदिचा कबुलपट्टा ता० ११-७-१४ ई॥ आपणास लिहून दिला असतां, आपण घेतला नाहीं आजपर्यंत पट्टा घेण्याबद्दल आपली वाट पाहीली शेवटीं नाईलाजास्तव ता० ११-७-१४ ई॥ चा पट्टा ता० १-८-१४ ई॥ रोजी महादेव भगवानजी तीडके साहु दुकान हिवरखेड यांचेपाशीं ठेऊन या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं, त्यांचे दुकानावरून पट्टा परभारे घ्यावा व पट्टा पावलेबद्दल त्याना पावती द्यावी नरकारितां आपण फीर्यादी वगैरे केल्यास आह्माकडून आतां कोर्टखर्च वगैरे कांहीं मिळणार नाहीं, कळावें ता० १-८-१४ ई॥ द. खु

सही

उत्तमराव संपतराव देशमुख स० हिवरखेड

नो० नं० १४

### नोटीस

गोविंद सखाराम रंगारी रा. पंचगव्हाण ता० आकोट जि० आकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे वडील बंधु आहा तुमचा आणि आमचा वर्षा-दीडवर्षांपूर्वी आपसांत घराचा व शेतीचा कपड्याचा हिस्याप्रमाणें निकाल झाला त्यापैकीं येणें कपड्याचे उधारी व गहाणाचे दस्तऐवज व कर्जरोखे हे तुमचे नांवानीं असून तुह्मी तो वसूल घेतला तो आह्मांस दिला नाहीं तो हिशोब वहीखतावणीनें दाखवून आमचा आह्मांस हिस्सा निम्मे याप्रमाणें जो हिशोब निघेल तो आह्मांस व्याजासुद्धां पंधरा दिवसाचे आंत तुह्मी आह्मास द्यावा तसे न केल्यास तुमचेवर कोर्टमार्फत दावा केला जाईल मग दाव्याचा खर्च व या नोटीसीचा खर्च तुह्मांस भरून द्यावा लागेल. कळावें ता० ९-८-१४ ई. सही

भोनासा सखारामसा रंगारी रा० पंचगव्हाण

नो० नं० १५

### नोटीस

सर्वत्र लोकास कळविण्यांत येते कीं अमीरशा वा॥ बुटाशा (अमीर शेख धुंधु) मुसलमान फकीर राहणार नांदुरा खुर्द ता० मलकापूर यांसः—

माझे मालकीची व माझे ताब्यांत असलेली स्थावर जिनगी मौजे नांदुरा खुर्द ता० मलकापूर येथील शेत सर्वे नंबर १२७ मळीवाला सालीम झाडाझुडासुद्धां व फकीराचे तक्याची जागा ही जिनगी माझे ताब्यांत राहून तारीख १५।९।०३ इसवी रोजीं बक्षीसपत्र लिहून देऊन नोंदून दिलें आहे. सदरील अमीरशा हा माझ्याशीं नेहमीं तंटा-भांडण शिवीगाळ करितो यावरून तो मला पुढें चांगले रितीनें वागविणार नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. सबब वरील तारखेस लिहून व नोंदून दिलेले बक्षीसपत्र या जाहीर नोटीसीनें रद्द केलें आहे कोणी गहाण खरेदी अगर दुसरा दर लेख सदर्हु इस्टेटीबद्दल करून घेतल्यास त्यास सदर्हु इस्टेट अगर मी जबाबदार नाहीं तारीख १२।८।१९१४ सही

मगबुकशा वा॥ मस्तनशा फकीर रा० नांदुरा खुर्द नि० हातची रेघ

नो. नं० १६

### नोटीस

नोटीस बेशमी काशिबा वा॥ कोंडू धनगर राहणार मौजे सेलगांव आटोळी तालुके चिखली जि० बुलडाणे यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्न झाल्यास १४।१५ वर्षे झालीं. तुमचे घरीं जितकें दिवस होतें त्या मध्यें पोटभर अन्नवस्त्र व सुखाचा शब्द असा कधींच मिळाला नाहीं. तुमचे आईचे जाचास त्रासून २ वर्षें झालीं मी दरसाल ५० रुपयेप्रमाणें कर्ज काढून चरितार्थ चाल-वीत आहे.

तुमचे पासून मला संसार सुख मिळेल अशी मुळींच आशा नाहीं. शिवाय तुमचे डोळे गेल्यामुळें व तुमचे अंगांत रोग जडल्या मुळें तुमच्या कडून जागेवरूनसुद्धां हलवत नाहीं तेव्हां अन्नवस्त्र ही मिळणें दुर्लभ आहे करितां ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत सावकाराचे कर्ज फेडुन मला फारकत द्यावी या प्रमाणें न झाल्यास मी कोर्ट मार्फत कर्जाच्या फेडीची तजवीज करून घेईन व दुसरा घरठाव करीन कळावें ता० ७ माहे आगष्ट सन १९१४ ई. सहीची निशाणी बांगडी

सही

गजी मर्द कासीबा धनगर ईच्या हातची निसानी बांगडी

नो. नं. १७

### नोटीस


बेशमी पांडुरंग नारायण भाकेराव व शंकरसिंह सरदारसिंह जमादार उभयतां रा० पातूरशेखबाबू ता० बाळापूर जि० आकोला यांस खालीं सही करणार तुळसाई मर्द पुंजाजी माळी रा० पातूरशेखबाबू ईजकडुन नोटीसीने कळविण्यांत येते कीं कसबे पातूरशेखबाबू ता० बाळापूर जि० आकोला येथील शेत स० नं० ७४ आणि ११८ सदर्हू दोन्ही सालीम शेतांची भोग कबजेदार असून आज पावेतों माझाच ताबा आहे माझ्या शिवाय दुसरा कोणिही या दोन्ही शेतांत हिस्सेदार नाहीत. हल्लीं माझ्या ऐकण्यांत असे आले आहे कीं तुह्मी लक्ष्मण व नवलाजी वा॥ कुकाजी माळी ईंगळें रा० पातूरशेखबाबु ता० बाळापूर जि० आकोला या उभयतांपासून सदर्हू माझ्यावरील दोन्ही शेतांपैकीं कांहीं जमीन खरेदी घेतली आहे करितां या नोटीसीने तुह्मांस कळावितो कीं ज्या ईसमा पासून तुह्मी माझ्या शेतांतील जमीन खरेदी घेतली त्या ईसमाचा सदर्हू माझ्या दोन्हीं शेतांवर कोणतेच प्रकारचा हक्क संबंध नाहीं सबब तुह्मी त्याचेपासून घेतलेली खरेदी व्यर्थ आणि खोटी आहे करितां तुह्मास या नोटीसीनें जाहीर करितो कीं तुह्मी माझ्या शेतांतील खरेदी घेतलेली कांहीं जमीनीचा ताबा घेण्याचा मुळींच हेतु करू नयेत ईतक्यावर ताबा घेण्याविषई कांहीं खटपट कराल तर त्याबद्दल तुह्मावर फौजदारी करण्यांत येईल करितां मुद्दाम या नोटीसीनें आगाऊ सूचना केली आहे कळावें ता० १२।८।१९१४ ई०

सही

तुळसाई मर्द पुंजाजी माळी नी० बांगडी

द० घेरखां दर्गाखां पि० स० आकोला

नो० नं० १८



२०–२४ रुस्तम हौस रोड, फोर्ट, मुंबई.

मो० नं० १९

## पत्रव्यवहार

( श्रीराम कृष्ण सदन )
— मु० कोळें.
तर्फ — खारे पाटण
जि० रत्नागिरी.

रा० रा० वऱ्हाड समाचार वर्तमान पत्रकर्ते रा० मु० अकोलें यांसी

सा० नमस्कार वि० वि० —

आपल्या बहुमान्य पत्रीं पुढील चार ओळींस अवश्य स्थळ मिळण्याची कृपा व्हावी. फार आभार होतील.

गेल्या जुन महांत बादशहांच्या वाढ दिवसानिमित्त पदवी मिळून गौरव पावलेल्या "वऱ्हाडस्थ" सद्गृहस्थांच्या अभिनंदनार्थ इकडील एका समाजसेवकांनीं अत्यंत आनंदानें गायगरीबांस यथाशक्ति धर्म केला होता हें कळविण्यास विशेष संतोष वाटतो.

वऱ्हाड समाचार पत्राचे फार दिवसांचे वर्गणीदार व वऱ्हाडांतील पेन्शनर स्कुल इनस्पेक्टर श्री० गंगाधर रावजी सोहनी उर्फ भाऊसाहेब यांच्या मौजे "मुवाठी" गावीं कै. वा. सुप्रसिद्ध श्रीमंत नामदार जगन्नाथ शंकर शेटजी मुर्कुटे यांची ४९ वी पुण्यतिथी मोठ्या अपूर्व समारंभानें सुरेख साजरी झाली. सोहनी साहेबाच्या "देवज्ञ ग्रामस्थांनीं" या कामीं दाखविलेला उत्साह खरोखरच किती तरी वर्णनीय आहे.

वऱ्हाडांतील शाळाखात्याचे माजी डायरेक्टर प० वा० रावबहादुर श्रीराम काशीनाथ कुठार, बी. ए., सी. आय्. ई. यांच्या १९ वे निधन दिवसा निमित्त सालमजकुरीं ता० १२ दिसेंबर रोजीं एक चांगला समारंभ करण्याचें या भागीं कऱ्हाडे वर्गांतील कांहीं मंडळीनें निश्चित केलें आहे. त्यास सर्वांची सहानुभूती असावी अशी विनंती करितों.

सदरच्या थोर हुद्याचे जागीं काम केलेले विद्यमान पेन्शनर गुरुवर्य रावबहादुर विष्णु मोरेश्वर महाजनी एम्. ए. आणि रा० ब० सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. या २ लोक विख्यात विद्वत्भूषणांचे वाढदिवस शक्य तितक्या उत्तम प्रकारें पाळण्याची माझी उत्कट मनीषा आहे तरी कृपा करुन आपण अगर आपले हाताखालचे वाचक यांजकडून उभय राव बहादुरांचे जन्मदिवस व जन्ममास समजून आल्यास मी आपला अतीशय उपकारी होईन. हा वेळपर्यंत ईश कृपेनें पाऊसपाणी चांगलें आहे.

तसदी व न्युनाधिक्य यांची क्षमा असावी. कळावें. हे विनंती. ता. ३।८।१४

आपला
सर्वांचा नम्र शुभचिंतक.
भाईराय महाजन
नांभिकर.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ११ शके १८३६

## सध्याचा युद्धप्रसंग

सध्या युरोपांत चाललेल्या युद्धासंबंधानें साऱ्या जगांत खळबळ उडून गेली आहे. या युद्धाचा परिणाम प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें जगांतल्या प्रत्येक राष्ट्रावर घडणार आहे. आतांपर्यंत या युद्धांत आस्ट्रिया, सर्व्हिया, रशिया, जर्मनी, बेल्ज्यम फ्रान्स व इंग्लंड इतकीं राष्ट्रें कांहीं स्वपण होऊन आणि कांहीं निरुपायास्तव पडलीं आहेत. बाकीच्यांनाही युद्धांत ओढून साऱ्या युरोपखंडाला किंबहुना साऱ्या जगाला युद्धसत्रांत ओढण्याचा कित्येक राष्ट्रांचा प्रयत्न चालला आहे. या युद्धाचें अग्रेसरत्व जर्मनीनें आपलेकडे घेतलें आहे. अर्थात् या युद्धाच्या पायीं होणारी प्राणहानि व इतर प्रकारचीं दुःखें याबद्दलच्या पातकास नीतिदृष्ट्या व धर्मदृष्ट्या जर्मनी देवाच्या घरीं जबाबदार आहे. पण आश्चर्याची गोष्ट कीं जर्मनीचे केसर आपल्या लोकांना उत्साह देणारें भाषण करतांना परमेश्वराचें साह्य मागत आहे! केसर बादशहाची ईश्वराच्या न्यायीपणाची आणि भक्तवत्सलतेची कल्पना साऱ्या जगाहून कांहीं तरी निराळी असली पाहिजे. एरव्हीं ज्या जर्मनीनें कांहीं कारण नसतां राष्ट्राराष्ट्रांत ठरलेल्या शांततेचा तहनामा पायाखालीं तुडविला, बेल्ज्यमच्या तटस्थवृत्तीचा भंग करुन त्या बिचाऱ्या राष्ट्राला युद्धांत खेंचिलें, लक्सेंबर्गवर निष्कारण हल्ला करुन युद्धाचा हरिओम् मंत्र म्हटला, जर्मन समुद्रांतून फ्रान्समध्यें जाल तर आह्मांला तटस्थवृत्ति सोडून स्वसंरक्षणासाठीं तरी युद्धांत पडावें लागेल असें नीट समजावून सांगणाऱ्या इंग्लंडच्या टेम्स नदीच्या मुखापर्यंत समुद्रांत सुरुंग लावून ठेवणारीं जहाजें सोडलीं, आणि भारतीय युद्धाची आठवण करुन देणाऱ्या व युरोपांतल्या क्षत्रिय कुलाचा विध्वंस करुन टाकणाऱ्या महायुद्धाची मुहूर्तमेढ रोविली, तोच जर्मनी पुण्यकोपाचा आव घालून आणि भावी परिणामाविषयीं नक्राश्रु गाळून आपण हातीं घेतलेल्या सत्कार्यास (!) ईश्वर हातभार लावो ह्मणून प्रार्थना करीत आहे!

सध्याच्या युद्धाचें आणि भारतीय युद्धाचें पुष्कळ साम्य आहे खरें. या युद्धांत कौरवांचा पार्ट जर्मनी व आस्ट्रियाकडे आहे. पांडव ह्मणजे फ्रान्स, सर्व्हिया, बेल्ज्यम हीं राष्ट्रें आणि कृष्ण ह्मणजे ग्रेट ब्रिटन होय. श्रीकृष्णाची शिष्टाई जशी कौरवांनीं निरर्थक केली तशी बेल्ज्यमची तटस्थवृत्ति कायम राहूं देण्याविषयींचा व युरोपची शांतता कायम राखण्याविषयींचा इंग्लंडचा उपदेश जर्मनीनें नीट ऐकून घेण्यापूर्वीच जर्मनी व इंग्लंड यांच्यामध्यें पसरलेल्या विस्तीर्ण उत्तर समुद्रांत आपलीं लढाऊ जहाजें नेऊन सोडिलीं. पण ज्याप्रमाणें कृष्णाचें बळ कौरवांनीं अविचारानें अंध होऊन ओळखलें नाहीं, तसेंच याप्रसंगीं जर्मनीनें केलें आहे. इंग्लंडचें आरमारी बळ जर्मनीला पुरुन उरणारें आहे. 'यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयोऽ भूति र्ध्रुवा नीतिर्मति र्मम ।' हा श्लोक सध्याच्या काळीं जर कोणाला सत्यत्वानें लागू असेल तर तो इंग्लंडलाच होय. इंग्लंड स्वतः नीतिमत्तेनें चाललें आहे. तेव्हां सगळें नीतिबळ, सगळें धर्मबळ, सगळें श्रीबळ इंग्लंडच्या बाजूचें आहे आणि अखेरीस त्याचाच जय होणार अशी दृढ श्रद्धा प्रत्येक न्यायी, विचारी व श्रद्धाळु माणसाच्या ठायीं आहे. कौरवांच्या बाजूला द्रोण, भीष्म, कृप यांसारखे नीतिमान् पण कौरवांच्या आश्रयानें अंकित करुन टाकलेले महात्मे होते, तसे महात्मेही जर्मनीच्या बाजूला कोणी नाहींत. ह्मणजे केसर बादशहाच्या अन्यायी कृत्याच्या प्रायश्चित्ताचा वाटा उचलण्यास दुसरे कोणी वाटेकरी केसरला मिळालेले नाहींत. यावरुन कौरवांपेक्षांही त्यांचें दुर्दैव अधिक ह्मटलें पाहिजे.

---

या बाबतींत इंग्लंड खरोखर भाग्यवान् आणि पुण्यवान् आहे यांत शंका नाहीं. धर्म, न्याय, नीति, सत्य आणि पापभीरुता यांचें बळ त्यांच्या बाजूला आहे. हें बळ कांहीं सामान्य नाहीं. त्यांत आणखी खुद्द ग्रेटब्रिटनच्या लोकांची एकी, आयरिश लोकांनीं आपला जीव कीं प्राण असा होमरूल बिलाचा प्रश्न बाजूला ठेवून एकदिलानें इंग्लंडला मदत करण्यांत दाखविलेला सुविचार' वसाहतींचें आपल्या मातेविषयींचें प्रेम व हिंदुस्थानच्या लोकांची अलौकिक राजनिष्ठा यांची भर इंग्लंडच्या बळांत पडली आहे. असें भाग्य भारतीय युद्धांत धर्मराजाचें देखील होतें कीं नाहीं याची शंकाच आहे. इंग्लंडांत मताधिकारी बायांनीं घातलेला धुमाकूळ आणि केलेलीं अचाट साहसाचीं कृत्यें सुप्रसिद्धच आहेत. पण त्यांच्या पुढाऱ्यांनीं ही यावेळीं आपली धामधूम बंद ठेवून इंग्लंडच्या सत्कार्यांत विघ्न न आणण्याचा ठराव केला आहे. कानडा, न्यूझीलंड, आस्ट्रेलिया वगैरे ब्रिटिश वसाहतींनीं या प्रसंगीं मुद्दाम लढाऊ जहाजें पाठवून आपली इंग्लंडला साह्य करण्याविषयींची तत्परता व्यक्त केली आहे. हिंदुस्थानच्या देशी संस्थानिकांनीं व इतर प्रजाजनांनीं आपलें तन मन धन इंग्लंडला अर्पण केलें आहे. रजपुतान्यांतल्या कित्येक क्षत्रिय संस्थानिकांनीं स्वतः लढाईला येण्याची, कित्येक वृद्ध राजांनीं आपल्या युवराजाला व राजकुमारांना पाठविण्याची, कित्येक सरकारी नौकरांनीं स्वतः व्हालेंटियर होऊन येण्याची, आणि कित्येकांनी जखमी होणाऱ्या सैनिकांची सुश्रूषा करण्याविषयींचा आपली उत्सुकता दाखविली आहे. हिंदुस्थानच्या राज्य कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांनीं न्यायाचे कामीं काळा व गोरा यांच्यामध्यें ठेविलेला भेद, हत्याराच्या कायद्यासारखे कायदे पास करुन काळ्या प्रजेविषयीं दाखविलेला अविश्वास, प्रेस आक्टासारख्या त्रासदायक कायद्यांनीं उच्चार स्वातंत्र्यास घातलेल्या मुसक्या व स्वराज्याचे हक्क मिळूं न देण्याचे कामीं कित्येक आंग्लो इंडियनांनीं आणिलेले अडथळे वगैरे गोष्टी मनांत मुळीं न आणितां अशा संकटाचे काळीं ग्रेटब्रिटनचें जें हित तेंच आपलें हित, ब्रिटिशराज्याची जी अब्रू तीच आपली अब्रू, व ग्रेट ब्रिटनची जी दैवगति तीच आपली दैवगति असें समजून सर्वथा ग्रेट ब्रिटनशीं स्वतःला राजनिष्ठेच्या बंधनानें निगडित करुन टाकलें आहे. याहून ग्रेटब्रिटनला व हिंदुस्थानाला दोघांनाही अधिक भूषणास्पद काय असावयाचें!

---

पण गांव आहे तेथें महारवाडा आहेच. सुष्ट आहेत तेथें कांहीं तरी दुष्ट असावयाचेच. तेंव्हा अशाही संकटाच्या काळीं नीच स्वार्थवृत्तीनें प्रेरित होऊन बाजारांत निष्कारण धान्य वगैरेंचे दर वाढवून लोकांमध्यें असंतोष वाढविणारे समाजाचे शत्रु आमच्या व्यापारी मंडळींत दिसावे यांत आश्चर्य नाहीं. सध्यां लढाईमुळें धान्य परदेशीं पाठविणें बंद झाल्यामुळें या देशांतलें धान्य या देशांतच राहिलें आहे व अर्थांत तें अधिक स्वस्त व्हावें, पण अनुभव उलट आला आहे. परदेशाहून आयात होणाऱ्या मालाबरोबर या स्वदेशी मालाच्याही किंमती लोभी व्यापाऱ्यांनीं चढवून ठेविल्या! आस्ट्रियामधून येणारी साखर महाग होणें वाजवी होत, पण मॉरिशसची किंवा जाव्हा साखर महाग कां? पंजाब, वायव्य प्रांत माळवा या प्रांतांतून येणारे गहूं महाग कां? या प्रश्नांचें उत्तर आमच्या व्यापारी लोकांची नीच लोभीवृत्ति याहून दुसरें उत्तर नाहीं. अशा वेळीं लोभीवृत्तीला वश होऊन राष्ट्रावरलें संकट वाढविणाऱ्या नीच व दुष्ट लोकांना सरकारनें चांगलें शासन करावयास पाहिजे, व मुंबई सरकारनें या बाबतींत आपलें कर्तव्य ओळखून सक्तीनें मुंबई शहरांतले जिनसाचे दर योग्य मर्यादेंत आणून ठेवण्याचें व्यापाऱ्यांस भाग पाडल्याची खबर आली आहे. हें मुंबई सरकारचें उदाहरण इतर प्रांताधिकाऱ्यांनीं घेण्यासारखें आहे यांत शंका नाहीं.

## आधुनिक गुरु

### अवस्था तिसरी

[ मागील अंकावरुन पुढें चालूं ]

तिसऱ्या गोळीनें गुण आला नाहीं असें आढळून येतांच गुरुजी

**चौथी गोळी** — देतात. "आमचें काय ? आह्मांस शिष्याची कळकळ ह्मणून आह्मी उपदेश देतों. ज्ञान आमचें थोडेंच आहे. तें आह्मास तरी

आमच्या सद्गुरु पासूनच मिळालें. तें शिष्यास देऊन टाकिलें व त्यांस आमच्या स्वरूपास मिळाविलें, कीं सांप्रदायक्रम पुढें सतत चालला. झालें. माझी बायको माझ्या शिष्यासाठीं त्यांचे सर्व मंत्र जपीत असते. तिच्यावर केवढा बोजा आहे! तिची तरी सुटका होईल, व माझ्यावरची ही जबाबदारी कमी होईल.” ही मात्रा गुरुजी स्वतः देत नाहींत. ही शिष्यां करवीं स्फुटित ग्रंथी रुग्ण शिष्यांकडे पाठवितात. ह्मणजे ज्यांना गुरुजींच्या कर्माचा किळस येऊं लागला अशांस शिष्यशिष्य मुखानें ही मात्रा पाठवितात. दुसरे शिष्य अंगद शिष्टाई करण्यास जातात. गुरुजींच्या बायकोस सर्व शिष्यांचे मंत्र ठाऊक असतात, व ते ती जपत असते, हें खरें धरिलें तर संन्यासी गुरूंस जरूर विवाह करणें भाग आहे. स्वतः गुरुच जातीनें पतीस तोंडाकडे पहाण्यास लावून त्याच्यासमक्ष त्याच्या बायकोस एकांतांत नेऊन मंत्र देतात. कां? तर तो षट्कर्णी होऊं नये ह्मणून! गुरुच्या बायकोनें दुसऱ्याचे मंत्र जपले तर ते षट्कर्ण होत नाहींत काय? मंत्र देतांना स्त्रिया बरोबर एकांत करण्यास मिळावा ह्मणूनच मंत्र एकांतात देतात असें दिसतें. सन्याशास प्रौढ स्त्री न मिळाल्यास त्यांस विधवा विवाह करण्याची देखील शिष्यकार्यासाठीं हे गुरुलोक परवानगी देतील असा संभव दिसतो. शिष्यांचे मंत्र नित्य जपानें आपल्या गृहिणीं कडून रोज सिद्ध न करणाऱ्या ब्रह्मचारी व संन्यासी गुरु अगर ज्यांनीं आपल्या विवाहित स्त्रियांचा त्याग केला आहे अशा गुरूंमधील आणि आधुनिक गुरूंमधील ही भानगड आहे. त्यांनीं वाटल्यास त्याचा निकाल लावावा. बायका शिष्याचा मंत्र जपतात हें बकणें जितकें अप्रयोजक आहे तितकेंच असत्य आहे. शिष्यास वळवण्याचें समजावण्याचें काम चांगलें असेल, पण साधनें असत्य मूळ आहेत. त्यामुळें त्यांचा परिणाम घडत नाहीं. हे गुरु ज्ञानी नसून मिथ्याचार व निर्वाहार्थ अगर लोकमान्यतार्थ कपटछद्म भगलंपट समाजशत्रु आहेत हें उघड उघड आहे. या मात्रेचा गुण न आल्यास गुरुजी

**पांचवी गोळी—** प्रायः स्वतःच देतात. त्यांचें ह्मणणें “हा संबंध विवाह संबंध सदृश आहे. विवाहानें पति पत्नीचा संबंध एक जन्मापुरताच घडतो. परंतु गुरुशिष्यसंबंध शिष्यास मोक्ष होईपर्यंत जन्मोजन्मीं चालू रहात जातो. मी ज्ञानी मला सर्व कांहीं समजतें. तुह्मांला समजत नाहीं. ह्मणून मी तुह्मांस सांगतों, तुमच्या कृतीनें मला पुनर्जन्म येईल कीं काय यास मी भितों कारण तुह्मांस मोक्ष न मिळाला तर मला पुनर्जन्मास यावें लागेल. या भाषणानें शिष्यास संसार यात्रेचीच काळजी लागावी, इतकेंच नाहीं, तर अन्य जन्माचीही येथेंच व एव्हांच काळजी सुरु होते, शिष्य जरा दुर्बळ मनाचा मात्र असला पाहिजे, किंवा स्त्रैण असला पाहिजे, किंवा निदान कोमळ तरी असला पाहिजे. त्यावर या सहस्त्रोद्देशी वाक्यांनीं लागेल तो परिणाम घडण्याचा संभव आहे. हीं वाक्यें उच्चारणारे आह्मी निदान ६०-७० गुरु २९।३० गांवांत मिळून पाहिले आहेत अशीं भयंकर वाक्यें उच्चारणारांस कोणता सन्मान द्यावा हें रामदास एकनाथादि संतांनीं सांगितलेंच आहे. घटकाभर समजूं उभयतांसही पुनर्जन्म आला. वाईट काय झालें? ज्ञानी आपलें ज्ञान कधींच विसरत नाहीं असें ह्मणतात. तो ज्ञानीच रहाणार. शिष्यास मोक्ष मिळण्यासाठीं असे सद्गुरु जन्मोजन्मी लाभणार! कारण **‘नहि कल्याण कृत्कश्चित दुर्गतिंतात गच्छति’** शिष्याची पुढील श्रद्धा या जन्मींच निश्चित झाली. मग भिण्याचें कारणच नाहीं. कांहीं स्वयंभू गुरु स्त्रियांस पुरुष देवतेचा आणि पुरुषांस स्त्री देवतांचा उपदेश देतात. गुरुस वर्ण संकराचे आणि पुनर्जन्माचें कायतें भय असते. बाकी भय ह्मणून कसलेंच नसतें. पण गुरुस पुढें किती जन्म होणार, कोण कोणते होणार. पूर्वी आपले आणि शिष्यांचे कोण कोणते जन्म होते, हें मात्र कळत नसतें. गुरुच ते ते अंदाज घोड्यावर बसतात, आणि शिष्यानें मोतद्दार होऊन पुढें पळावें अशी इच्छा करितात. या गोळीनें गुण न आला कीं या धन्वंतरी जवळ.

**सहावीगोळी**--तयार असतेच ते आपल्या शिष्यसांप्रदायाजवळ ह्मणतात “माझें सर्व भाषण एक तर्फी आहे. त्या शिष्याचें नांव घेऊ नका माझी धृत्ति उखडते. पांच पन्नास लोकांत त्यास घेऊन या. त्याचा धुव्वा धुव्वा उडवीन त्यास पळवून लावीन. गुरुची वृत्ति उखडते या बद्दल शिष्या मुळीच दोषी नाहीं. गुरु देवतेस तर मानीत नसतो. भक्ति स्वतः करतां येत नाहीं. सगुण मनुष्यानें निर्गुण उपासना करणें किती दुर्घट आहे हें गीताध्याय १२ श्लो० १--७ मध्यें साक्षात श्रीकृष्णानीं सांगितलें आहे. परंतु “मी ज्ञानी” तो ज्ञानी” असली पोचट वाचालता ज्ञानास स्थायिभाव आणते ज्ञानाभिमानाखालीं अहमन्यता झाकतां येते. आपल्यापेक्षां कोणीच विद्वान अगर विचारवान अगर शीलवान वाटूं नये ही ज्ञानाची पहिली ओळखण! गुरु देवतेस नमस्कार देखील करीत नाहींत. कां! स्वरूपांत मग्न असतात. या विवेक भ्रष्टांस असंपजस व नादीं लागतील अशा बरोबर वाद करण्याची मोठी हौस असते. वादविवादाची खुमखुम असते ती शिष्य निरविण्यास तयार होतात. वरील पांच गोळ्यांनीं त्यांस बराच चिवटपणा आलेला असतो. ते वादास सिद्ध झाले तर गुरु ह्मणतात “मजपासून तुह्मी विद्या घेतली आहे सबब नीचा बरोबर श्रेष्ठ वाद करू शकत नाहीं.” यांत दोन चार बारीक खुब्या आहेत. श्रेष्ठ कसा ह्मणाल तर त्यानें वाचनीक अननुभवीक मंत्रोपदेश केला एवढ्या वरून गुरुजी श्रेष्ठ बनतात. शिष्याच्या ठिकाणची त्याची समदृष्टि जाते. शिष्य अधम पदवीचा होतो. ज्ञान्यास आचार नको. वाडवडिलाबद्दल आदर नको. संस्कृत ज्ञान नको. फक्त “मी काय तो शहाणा बाकी सर्व मन्मत प्रतिकूल मूर्ख, अज्ञ आणि नरपशु इतकी मनाची बालंबाल अढळ खात्री करून घ्यावी कीं झाला ज्ञानी.” त्यात जर एखादा नादीं लावतां आला आणि त्यास कां मंत्र दिला कीं ज्ञान्याचा बनतो सद्गुरु ह्या ज्ञानाची कोणास किळस येणार नाहीं बरें? गुरु प्रथमतः वादांत असच्छिष्यास हटवण्याचें भय घालतात. पण शिष्य वादास तयार झालाच तर शेंपूट घालतात! कारण काय योजतात? वर दिलेंच आहे! निर्गुण उपासनाभिमानी सगुणोपासना मंत्रास विद्या हें नांव देऊन वाट लावतात! मधल्या गोळ्या गाळू--

**शेवटची गोळी** असते. सहाव्या आणि या शेवटच्या गोळींत मध्यें अनेक गोळ्या आणि अनुपान वैचित्र्यें असतात. तीं कल्पनानुमय आहेत. ह्मणून आह्मी देत नाहीं. अगदीं अखेर निर्वाणीची गोळी **शेषं शापेन पूरयेत् न कोपेन** कोपाची परमावधि झालेली असते. शाप मधून मधून दिलेले असतात. ज्याचें आशिर्वाद विफल होतात त्यांच्या शापांस शिष्यानीं न भिणें उक्तच आहे. उदक अभिमंत्रून आणून विमुक्त शिष्याचा स्त्रीपुत्रांसह नाश व्हावा ह्मणून तें सोडवण्यास गुरुजी झटत असतातच. केक गुरुजींनीं शिष्यांकडून आपला कोप शांत व्हावा ह्मणून खूनही करविलेले आहेत!!! ह्या सर्व गोळ्या आत्माधिकार कायम रहावा ह्मणून दिल्या जातात. कुलक्षयालाही शिष्य भीत नाहींसें पाहिलें ह्मणजे गुरुजी शिष्याचा पिच्छा सोडतात.

## अंतभाग

याप्रमाणें हें पंचवर्ष कालव्यापी शोकपर्यवसायी नाटक समाप्त होतें. परंतु सुंदर गायन ऐकिल्यावर जसा त्याचा ध्वनी कांहीं कालपर्यंत कानांत घुमत रहातो तद्वतच या नाटकांत ज्यांस ज्यांस दुर्दैवानें भूमिका घ्याव्या लागतात त्यांच्या पुढें यांतील बरेच भाग सदैव उभे रहात असतील यांत नवल नाहीं. मागें सांगितलेंच आहे कीं हा संबंध हितकर होण्यास गुरूंत सामर्थ्य पाहिजे आणि शिष्यांत श्रद्धा पाहिजे. हीं नसतील तर दंडपशाईनें हें नातें टिकवू पहाणारा मनुष्य दुष्ट अगर मुर्ख असला पाहिजे. असे गुरु सोडण्यापासून मुळींच नुकसान न होतां उलट उभयतांस फायदाच आहे. बऱ्याच गुरूंचा स्फोट होऊन बरेच सांप्रदायही नामशेष झाले आहेत. तरी पण ही सांप्रदाय पद्धति पुनः अस्तित्वांत येऊं पहात आहे. तिच्यांतील दोष तरी जावेत व ती गुणैकपूर्ण असावी हीच आमची इच्छा आहे. हल्लींच्या सांप्रदायांत ज्यांची ज्यांची अश्रद्धा झाली असेल त्यांनीं ते ताबडतोब सोडणें त्यांसच श्रेयस्कर आहे.

> गुरो रप्य वलिप्तस्य ।
> कार्याकार्य मजानतः ।
> उत्पथ प्रतिपन्नस्य ।
> परि त्यागो विधीयते ॥

श्री० म० भारत.

“ज्या गुरूंत अभिमान असेल, जो कर्तव्याकर्तव्य--विचार शून्य असेल, (स्त्रियांसच उपदेश देत असेल, देवास नांवें ठेवित नुसत्याच मोक्षाची थोरवी गात असेल) असा उलट्याच मार्गाला लागलेला असेल, अशास सोडून देणें शास्त्रसंमत आहे.” सोडून दिल्यावर कदाचित कोणी ह्मणेल त्यानें काय वाईट सांगितलें होतें. देव नामच घ्यावयास सांगितलें होतेंना? त्यानें तसें सांगण्यापूर्वी आह्मी काहींच करीत नव्हतों आतां काहीं तरी करूं लागलों हें त्यानें आमचें कल्याणच केलें, हें तर्कशास्त्र आणि पूर्वीचे जिप्सींचे लोकांचीं बायकामुलें पळवून नेण्याचे वेळचें शास्त्र बिलकूल एक आहे. एकानें सात घरें बांधलीं. एक देवळासाठीं, एक धर्मशाळेऐवजीं एक केवळ लोकांनीं पाणी नेऊन वाटल्यास स्नानसंध्यादिकनें करण्यासाठीं. एक एकाद्या विस्तीर्ण बगिच्यामध्यें अहारविहारासाठीं, एक नाटक गृहासाठीं एक चंडोलखाना आणि द्यूत क्रियासाठीं आणि एक अनाथ वेश्यासाठीं. कार्य एकच परंतु कार्य प्रेरक संकल्प निरनिराळे असल्याकारणानें कार्याचे परिणाम भिन्न होतील तसेंच एक अनुष्ठान करतो पुत्र प्राप्तीसाठीं एक करतो

शेजाऱ्याच्या निधनासाठीं आणि एक करतो ईश्वर प्राप्तीसाठीं तिघाचे परिणाम वेगळे होतील. व दुसऱ्याचे नाशासाठीं केलेल्या अनुष्ठानानें अनुष्ठान कर्त्याचा क्षय झालाच पाहजे. नाहीं तर देवताराधनाचा दुरुपयोग होईल. देवता कल्याणासाठीं असतात व दुसऱ्याच्या नाशा साठीं नसतात. शिष्यास जेव्हा साधन करावें असें वाटतें तेव्हाच तो साधनास लागणारीं उत्साहानें करण्यास तयार होतो. त्याच्या श्रद्धेस आणि भावनेस आत्महितासाठीं किंवा आत्मप्रौढी साठीं भलतेंच वळण लावल्यास किंवा भलताच संकल्प ठेवून भलतीच दिशा लावल्यास त्यास सन्मार्गीं न लावतां त्याचा नाश केला असें होईल. जे गुरु पूर्वी अन्य गुरूंची ठठेली करीत असतात तेच गुरु त्या अन्य गुरूंचा स्फोट झाल्यावर स्वतः च्या बचावा करितां ह्मणून या त्यक्त गुरुची अशा विधानांनीं तरफदारी करीत असतात. ही तरफदारी अनेक प्रकारें लंगडी आहे. मुळींच कांहींच नकरण्यापेक्षां विपरीत रीतीनें एखादी क्रिया केल्यास मनुष्यसुखास भर नपडतां मनुष्य वेडा व परतंत्र बनेल. स्वतंत्र जीवास भलत्याच्याच नादीं लागून परतंत्र करणें ह्मणजे आपल्या उन्नतीचे ऐवजी अवनति करून घेणें आहे. पूर्वी जेथें धर्म औदासिन्य होतें तेथे धर्म द्वेषाचरण करणें आहे. यासाठीं साधकानें जरत्यास शास्त्र बाह्य गुरु मिळालेच असतील तर त्यांस सोडून दिलेंच पाहिजे. श्रीमत् भागवतावरून हें स्पष्ट आहे कीं गृहस्थाश्रम्यास मंत्रोपदेशच नाहीं. परंतु श्रीमत् भागवतास न मानतां हल्लीं शतवारी शिष्य रोजच्या रोज निघत आहेत. ही धर्मोन्नति कीं हा धर्मक्षय? हें पुनः एकवार लिहितो कीं हे लेख टीका करण्याच्या बुद्धीनें लिहिले नाहींत यापेक्षां स्वार्थ निराभिलाष लेख क्वचितच असतील गुरुचे सामर्थ्य न तोलतां गुरु केल्यास उभयतां गुरु शिष्यांस किती ताप होतो व इतकें करूनही खऱ्या वैदिक ऊर्फ सनातन धर्मांत केवढा प्रत्यवाय येतो हें आपण नित्य पहात आहोंच. यासाठीं जो पंच वर्षकाल उतावळीनें गुरु शिष्यसंबंध जोडण्यांत व तोडण्यांत जातो. जो गृहसौख्यभंग होतो तो सहज टाळतां येण्यासारखा आहे. आणि वृथा आयास न पडूं देतां येण्याजोगें आहे. साधक गुरु करण्यापूर्वी गुरुचें भाषण आणि कृति इच्छा

आणि वर्तन, चमत्कार लालसा आणि चमत्कार ताटस्थ्य इत्यादिकांवर बराच काल पावेतों लक्ष देऊं लागला आणि मग तो त्यास शरण गेला तरी देखील एक महत्कार्य झालें असेंच होइल.

॥ सहसा विदधीत न क्रियाम्॥
॥ अविवेकः परमापदांपदम्॥

अपूर्ण

---

## आकोल्याच्या नागरिकांची राजनिष्ठा.

# जंगी जाहीर सभा.

आपल्या नगरीं श्रीराम थिएटरमध्यें बुधवार ता० १२ रोजीं सायंकाळीं पांच वाजतां आकोला जिल्ह्याची राजनिष्ठा व्यक्त करण्यास आपल्या जिल्ह्याचे लोकप्रिय डेप्युटी कमिशनर रा० रा० डेवर साहेब यांचे अध्यक्षतेखालीं येथील पौरजनांची जंगी जाहीर सभा भरली होती. इतकी मोठी सभा अलीकडे पांच सात वर्षांत भरली नसेल म्हटलें तरी चालेल. जागेच्या अभावीं कित्येक लोकांना निराश होऊन परत जावें लागलें. एकंदर जमाव ९००० वर असेल असें म्हणतात! अशी सभा वास्तविक खुल्या मैदानांत भरवावयास पाहिजे होती आणि हल्लीं सुदैवानें पावसाची उघाडीही होती. असो. कोणत्याही सरकारला संकट समयीं शक्य ती "तन मन धन" मदत करणें हे प्रजेचें आद्य पवित्र कर्तव्य आहे. हल्लीं युरोपांत सुरु असलेल्या युद्धाच्या धुमश्चक्रींत आपलें इंग्रज सरकार कांहीं कारणानें सामील झालें आहे, किंबहुना त्यांस तसें करणें भाग पडलें आहे. अशा समयीं विलायतच्या लोकांनीं व निरनिराळ्या डिपेंडंसींच्या लोकांनीं सरकारास पैशाची व जरूर पडल्यास शारिरीक–अगदीं शक्य तितकी–मदत करूं म्हणून जाहीर केलें आहे. आपल्या हिंदी मांडलिक संस्थानिकांनीं ही वरील प्रमाणें सरकारास कळविलें असून कित्येकांनीं तर आपण आपल्या सैन्यानिशीं स्वतः देखील समरभूमीवर येण्यास कबूल असल्याचें कळविलें आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील प्रत्येक इलाख्यांतील बहुतेक प्रत्येक जिल्ह्यांतील लोकांनीं अशावेळीं कल्याणदृष्टी सरकारास आपण वाटेल ती मदत करण्यास तयार असल्याबद्दल जाहीर ठराव केले आहेत व करीत आहेत या गोष्टींत वऱ्हाडप्रांतही मागें नाहीं हें पाहून आनंद वाटतो. रावबहादूर मुधोळकर यांचे खटपटीनें नुकतीच उमरावतीस ही सभा झाली तिची हकीगत वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध झालेलीच आहे. परवाचे बुधवारीं आकोल्यास ही सभा झाली त्यासमयीं लोकांचा उत्साह पहाण्यासारखा होता.

इतिहासामध्यें अशी उदार लोकनिष्ठा व्यक्त करण्याचा प्रसंग हा पहिलाच आहे. किंबहुना हिंदी प्रजेच्या स्थितींत असलेल्या प्रजेला हा अपूर्व प्रसंग होय! हल्लीं प्रांतोप्रांतीं ज्या जाहीर सभा होत आहेत त्यांमधील मुख्य ध्यानांत ठेवण्यासारखा भाग म्हणजे हिंदी प्रजेच्या अंतःकरणाची विलक्षण उत्कंठा व अनृणी होण्याविषयींची उदार बुद्धि ही होत. ब्रिटिश राज्यापासून अद्याप पुष्कळ गोष्टी लाभण्याच्या आहेत व त्या संबंधानें राज्यकर्त्यांबरोबर आमचा कडाक्याचा वादही चालू आहे. तथापि या युरोपांतील महायुद्धानें सर्व भेदाभेद, विरोधभाव नष्ट केला असून सर्व राष्ट्राचें हृदय राजभक्तीनें ओथंबून गेलें आहे. हा विलक्षण देखावा इंग्रज इतिहासकर्ते जेव्हां आपल्या ग्रथांत नमूद करतील तेव्हां ते हिंदी राष्ट्राविषयीं अत्यंत प्रेमळ उद्गार काढल्यावांचून रहाणार नाहींत. या एका महायुद्धानें ब्रिटिश लोक व इंडियन लोक यांचीं अंतःकरणें इतकीं संलग्न कशीं आहेत कीं या महायुद्धाच्या रसायन क्रियेचें ज्ञान एक ते तज्ज्ञच जाणोत.

गेल्या बुधवारीं येथील व्हॉलंटियर पलटणीचे मुख्य अधिपति रा० रा० डेवर साहेब हे आपल्या सैनिकांसह वाजत गाजत सभामंदिराजवळ आले तेव्हांचे ते लष्करी वाद्यांचे स्वर, लोकांच्या चर्येवरील विजयश्री आणि मनानें युद्धस्थळीं चाललेले आबाल वृद्ध सभाजन हीं लोकांच्या मनांतून कधींही ढळणार नाहींत. या सभेमध्यें हिंदू, पारशी, मुसलमान ख्रिस्ती हे सर्व एका विश्वधर्माचे दिसले. विद्यार्थी, व्यापारी, अधिकारी व इतर नानाविध व्यवसायी लोक एक दिलानें विचार करीत होते हे दिसलें. आणि निरनिराळ्या भाषणांच्या ओघा ओघामध्यें जहाल मवाळ किंवा अन्यविध सर्व राजकीय विचार एकाचप्रवाहानें चालले होते. असा हा हृदयंगम संगम पहाणारे ते राजकर्ते व प्रजाजन धन्य व कृतकृत्य होत!

रा० रा० डेवर साहेबांनीं टाळ्यांच्या व आनंदाच्या जयघोषांत अध्यक्षस्थान विभूषित केल्यानंतर नामदार रावबहादुर दामले, रा० रा० रामभाऊ महाजनी, खानसाहेब अमानखां व रा० रा० लक्ष्मणराव ओक, रहिमान बेग, मश्रुवाले, व श्रीराम सुरजमल यांनीं आपापल्या कुशलतेनें व अंतःकरणाच्या स्फूर्तीनें लोकांच्या स्वीकारासाठीं पहिला ठराव मांडला. या ठरावामध्यें लोकांची राजभक्ति व राजकर्त्यांच्या युद्धकार्याबद्दल सहानुभूति व तद्विषयक ईशप्रार्थना अशीं तीन अंगें होतीं. त्यांचा सर्वच ठराव शब्दशः व्यक्त करण्यापेक्षां कल्पनेलाच तो विशेष अर्थपूर्ण व उत्साहवर्धक वाटेल. दुसरा ठराव रावबहादूर देवराव विनायक, रा० रा० खरे, घवरे व उमरहाजी यांनीं सभेपुढें आणिला कीं उमरावतीमध्यें जी प्रांतिक सभा स्थापन झाली आहे व जिच्यामध्यें आकोल्याचे सहा शिष्ट सभ्य गृहस्थ आहेत त्या सभेच्या विचारानेंच आपल्या पुढील कर्तव्यतेचा मार्ग क्रमण्यांत येईल. या दुसऱ्या ठरावा मागून रा० रा० चिपळूणकर, आठल्ये व खान साहेब मिरझा अब्बासबेग यांनीं आपल्या वक्तृत्वपूर्ण वाणीनें अशा आशयाचा ठराव आणिला कीं ब्रिटिश राज्यासाठीं तन मन धन अर्पण करणाऱ्या स्वयं सेवकांची व्हॉलंटिअर पलटण तयार करण्यासाठीं सरकारनें आपली प्रशस्ती व्यक्त करावी. वरील संभाषणांच्या गर्दीमध्यें आमच्या येथील एक म्हातारा शेतकरी रा० रा० निवाजी तेली इतका आवेशाला व वीरश्रीला चढला आणि याचें हें उदाहरण सर्व रयतेच्या मनःस्फूर्तीचें द्योतक आहे–– कीं या युद्धाच्या अग्नींत उडी घालण्यास मी एका पायावर तयार आहे इतकेंच नाहीं पण मी आपले मुलगेही सरकारास अर्पण करण्यास सिद्ध आहे असें मोठ्यानें ओरडून सांगितलें। हे त्याचे स्वयं स्फूर्तीचे उद्गार ब्रिटिश राज्याचे जणू विजयस्तंभच होत!!

वरील भाषणांस उत्तरादाखल अध्यक्ष रा. रा. डेवर साहेब यांनीं जें भाषण केलें तें येथें अक्षरशः देण्याशिवाय त्यांची यथार्थ कल्पना नुसत्या गोषवाऱ्यानें होणार नाहीं ते म्हणाले:–

Gentlemen,

I have in the first place to thank you for the honour you have done me in asking me to preside at this great meeting of loyal and patriotic citizens.

Then, I should like to explain the situation so far as I can. This war, gentlemen, is the biggest war that has ever been opened in all the long history of our earth. At this moment there are at least 15 crores of men trained, disciplined, fighting men, rapidly getting together to meet in battle. In history there has never been a war engaging more than three or atmost four crores.

But it is not only the vast number of the armies engaged. All the wonderful and terrible resources of modern science are engaged. One example of this terror has already occurred outside the Liege Forts when underground mines were fired and the Germans were annihilated a thousand at one breath.

And why, Gentlemen, has this great and terrible war broken out? I shall tell you.

It has broken out because for 44 years the two German Empires, Germany and Austria, have prepared, unceasingly and always, for a great war to conquer the whole world. First they prepared by land an enormous army which has swelled and swelled steadily for 44 years, till it is now far the biggest army in the world. For 15 years Germany has recognised that a land army is not enough. The dreams of the German Emperor are far wider than those of Napoleon Buonaparte. He dreamed for France of a great French Empire extending over all Europe. But Napoleon was broken on land by Russia (our ancient ally) and at sea by the might of the British navy. The German Emperor and his people have for many years in addition to their enormous army been preparing a great fleet of battleships to meet the British Navy. For they dreamed not of an European Empire only but of a world wide contract of all commerce and trade in German hands.

That means, Gentlemen, the destruction of the British Empire.

This great war on which the British Empire has entered, may possibly be the Armageddon, "the last great fight of all" The sacrifice of human life will be so vast and so terrific that it may well be that the nations of the earth will, after it, conclude a great and universal peace and live in the future not as separate quarrelsome nations and tribes, but as one great and kindly human faimly courteous, well disciplined. And the father and mother of that peaceful and prosperous family of the earth will be our King Emperor George and our Queen Empress Mary.

And now, Gentlemen, let us see how the war will affect us in India. In the first place it is practically certain that an expeditionary force will be sent from India to our ally of France. It may be that we shall have to send 50 thousand British troops and 50 thousand Indian troops. This will be the first time that the British and Indian soldiers will march side by side across the map of Europe.

A Great Day for our India!

Since war was declared I have had many offers of personal service from young Indian gentlemen, and I see that you have a resolution on paper asking for an extension of Volunteering. I have sent the offers of service on to the higher authorities. We may be sure that this matter will be wisely considered by the King Emperor himself and that orders will issue, if necessary. All that I can say is that, if I get such orders nothing would give Mr. Scott and myself greater pleasure than to raise and train an Akola Regiment.

Then another point that touches us in India is a great question of trade and of prices. One false impression should be at once banished, and that is, that there will be any danger of our merchant ships, going and coming, being captured.

In England the price of food stuffs has actually gone down during the war. It is only the Germanic peoples that will be starved. Because the British Navy holds the seas and the two other great powers in the world, the United States of America and Japanese Empire, are both friendly. More than that those two Powers do not wish their own trade to be interfered with. But even without America and without the help of Japan, the German Squadron in the China Seas is much smaller than our own squadron there. The Indian squadron is busy capturing German shipping. And you must remember that there are now the Australian and Newzealand Fleets who will not be idle. In all probability while we starve Germany our own food grain markets will be cheap.

The effect on cotton will probably be cheapness, and all that I can say is that Berar should make arrangements to store its present promising harvest. At the end of the war the demand for cotton will be enormous.

That is all I can tell you, Gentlemen.

वरील इंग्रजी भाषणाचा आशय आमच्या मराठी वाचकांसाठीं थोडक्यांत खालीं दिला आहे.

राजनिष्ठ व देशाभिमानी मोठ्या जनसमूहाच्या अध्यक्षस्थानाचा मान दिल्याबद्दल प्रथम आभार मानून सध्याची आपली स्थिती कशी आहे ते सांगण्याला अध्यक्ष साहेबांनीं प्रारंभ केला.

जगाच्या आज पर्यंतच्या इतिहासांत प्रस्तुतचें युद्ध सर्वांत मोठें आहे. या युद्धांत किमानपक्षीं १५ कोटी लढवैये समरांगणांत जमत आहेत. आजपर्यंत ३।४ कोटींपेक्षां अधिक सैन्य कोणत्याही लढाईत एकत्र झालें नव्हतें. या लष्करापेक्षांही आधुनिक शास्त्रीय शोधांनीं सहस्रावधी प्राण एका क्षणार्धांत नाहींसे होतात. याचें एक ताजें उदाहरण लीजचा किल्ला उडवितेवेळीं दिसून आलें.

ऑस्ट्रिया व जर्मनी मिळून एकं

जर्मन साम्राज्याची सैन्य वाढविण्याची तयारी आज ४४ वर्षें चालू आहे. जर्मनीचें सैन्य सगळ्यांत मोठें आहे. नेपोलियनची महत्वाकांक्षा युरोपभर फ्रेंच साम्राज्य करण्याची होती. पण जर्मनीचें मनोराज्य युरोपभरच काय पण सर्व पृथ्वीवर साम्राज्य स्थापन करून सर्व व्यापाराचीं सूत्रें आपल्याच हातीं असावीत असें आहे. या महत्वाकांक्षेच्या बुडाशीं ब्रिटिश साम्राज्याचा नाश ध्वनित होत आहे. प्रस्तुतचें हें महायुद्ध कदाचित् जगाच्या इतिहासांत शेवटचेंच युद्ध होईल. इतकी भयंकर प्राणहानी पाहून सर्व पृथ्वीवरील राष्ट्रें विश्वबंधुत्वाचा धडा शिकतील आणि भावी शांतता अशी होईल कीं आपापसांतला वैरभाव विसरून सर्व मानव जाति एका कुटुंबाप्रमाणें धर्मन्यायानें वागूं सागेल. अशा कुटुंबाचे मातापिता म्हणजे श्री. सौ. महाराणी मेरीबाईसाहेब व श्री. चक्रवर्ति जॉर्ज महाराज हे होत.

या नंतर लढाईचा हिंदुस्थानावर होणारा परिणाम सागताना रा० रा० डेवर साहेब म्हणाले कीं हिंदी सैन्य १०००० व ब्रिटीश सैन्य १०००० असे फ्रान्सच्या मदतीसाठीं जाणार आहे. तेव्हां हें हिंदुस्थानचें महद्भाग्य कीं ब्रिटिश सैनिकांच्या खांद्या खांदा देऊन हिंदी सैनिक प्रथमच लढतील.

लढाई सुरू झाल्यापासून पुष्कळ हिंदी तरुणांनीं स्वयंसेवा अर्पण करण्यासंबंधानें अर्ज केले आहेत व या सभेचाही एक ठराव त्याचसंबंधाचा आहे. खुद्द बादशाह या सूचनेचा योग्य विचार करतील अशी पक्की उमेद आहे आणि आकोल्याची पलटण उभारण्याचा जर सुयोग येईल तर तो आम्हांस मोठा सुदिन वाटेल.

व्यापार व बाजारभाव यासंबंधानें बोलताना ते म्हणाले कीं आपल्या व्यापारी जहाजाना या लढाईमुळें कोणत्याही प्रकारचा धोका पोहचणार नाहीं. विलायतेंत धान्याचे भाव तर उतरले आहेत. काय तो जर्मनीचाच उपासमार होणार आहे. समुद्रावरील सर्व सत्ता ब्रिटिश लोकांच्या हातीं आहे. अमेरिका व जपान हीं दोन्हीं राष्ट्रें दोस्त आहेत आणि त्याशिवाय आस्ट्रेलिया न्यूझीलंड येथील आरमारेंही जर्मनीला त्राही करून सोडतील. कापूस लढाईमुळें स्वस्त होईल खरा पण वऱ्हाडचे लोक जर सध्याचें पीक सांठवून ठेवतील तर त्यास लढाईनंतर उत्तम भाव येईल.

येणेंप्रमाणें अध्यक्षाचें सुश्राव्य व कळकळीचें भाषण झाल्यावर व रीतीप्रमाणें आभार प्रदर्शनाचें काम झाल्यावर सभा बरखास्त झाली.

## लढाईच्या बातम्या.

सध्याच्या काळांत आमच्यासारख्या प्रांतिक साप्ताहिक पत्रांनीं वाचकांना लढाईच्या इत्थंभूत बातम्या आणि त्याही वेळेवर पुरविणें हें धाडसाचें किंबहुना अशक्य काम आहे. कारण लढाईसंबंधानें परस्पर विरोधी किंवा अतिशयोक्तीच्या बातम्या इतक्या झपाट्यानें येत आहेत कीं साप्ताहिकाच्या मागच्या अंकाची शाई वाळली नाहीं, तोंच युद्धक्षेत्राचा सगळा रंग एकदम पालटल्याची ताजी खबर येऊन पोंचलीच. ती वाचून लिहूं लागावें, तों मागाहून निराळी बातमी तयारच! सध्याच्या लढाईचे रंग क्षणाक्षणास पालटत आहे. लेज येथें बेल्ज्यम व जर्मनी यांचें युद्ध होऊन ८००० जर्मन मारले गेल्याची बातमी गेल्या आठवड्याचे प्रारंभीं होती. तिचें आतां २६००० जर्मन मारले गेले असें रुपांतर झालें आहे आणि ही तरी बातमी विश्वसनीय कशावरून असें इंग्रजी पत्रेंच विचारीत आहेत! कधीं कधीं अठ्ठेचाळीस तासपर्यंत लढाईची खबरच येत नाहीं. इंग्लंडची व जर्मनीची उत्तर समुद्रात खास लढाई झाली असली पाहिजे. पण तारांचीं तोंडें तिच्यासंबंधानें अवाक्षर काढीत नाहींत. जर्मनीनें समुद्रात सुरुंग लावणारें एक जहाज टेम्स नदीच्या मुखापर्यंत आणून सोडलें होतें, पण इंग्लंडनें त्याचा नाश केला व नाश करणारें जहाजही स्वत: बुडालें. जर्मनीनें २४ तासाची अल्पकालीन मुदत मागितली अशीही वदंता होती. पण ती खोटी ठरली. जर्मनजहाजें लपून लपून ब्रिटिशजहाजावर हल्ले करीतच आहेत. फ्रान्सनें आतां आपलें सैन्य हलविलें आहे, व मर्यादा उल्लंघून जर्मनींत पाऊल टाकलें आहे. त्यांचा हल्ला इतका जोराचा झाला कीं जर्मन लोक पळून गेले अशी बातमी आहे. जर्मनाधिपायाचें धाडस व शूरत्व या विषयींचा लौकिक या पहिल्याच चकमकींत एकदम कसा पार नाहींसा झाला याचें लोक आश्चर्य करीत आहेत. बेल्ज्यमच्या शूरत्वाची मात्र कमाल झटली पाहिजे जर्मनीशीं टक्कर देण्यांत तें यशस्वी होईल असें कोणास वाटत नव्हतें. याप्रमाणें इंग्लंड, फ्रान्स, बेल्ज्यम यांच्याकडून ठिकाठिकाणीं नाक ठेंचलें गेले तरी जर्मनीची आत्मश्लाघेची खोड जात नाहीं. सगळें जग सैतानांनीं भरलें तरी आमची पुण्याई सर्वांना पुरुन उरेल हा आपला त्याचा मंत्रपाठ चालूच आहे.

इकडे पूर्वेकडे चिनी समुद्रात एक जर्मन लढाऊ जहाज मुंबईचा रोख धरून येत आहे अशी गप्प उठली होती व त्यामुळें मुंबईच्या व्यापारांत अतिशय खळबळ उडून बाजारचे दर दुप्पट तिप्पट किंमत देऊन ही मिळेनासे झाले होते. पण पुढें अशी ही बातमी आली कीं एक जर्मन जहाज व एक रशियन जहाज याची चिनी समुद्रांत चकमक होऊन दोन्ही बुडालीं! त्यानंतर पुनः अशी गप्प उठली आहे कीं हें एकच नव्हे तर जर्मन जहाजांचा एक समुदाय पूर्वेकडे आहे व त्याच्यावर नजर ठेवून जपाननें आपलेंही आरमार ॲडमिरल देवा याच्या हाताखालीं देऊन पाठविलें आहे. जपानचें इंग्लंडशीं पूर्ण सख्य आहे हें सांगावयास नकोच. मुंबईस बाजारात चढलेले दर सरकारच्या वेळींच घेतलेल्या सक्तीच्या उपायानीं पुनः ठिकाणावर आले आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. जोंपर्यंत भूमध्य समुद्रांत युद्धाची गडबड सुरू नाहीं, तोंपर्यंत तरी भाव चढण्याचें कारण नाहीं. आस्ट्रियाचीं जहाजें त्या समुद्रांत फिरत आहेत; पण फ्रान्स त्या जहाजांना कांहीं गडबड करूं देत नाहीं. त्या समुद्रात कांहीं गडबड झालीच तर इंग्लंडला व्यापारासाठीं अटलांटिक महासागरातून रस्ता आहेच. हा जरा लांबणीचा आहे, पण मुळींच अडकून व्यापार बंद होण्यापेक्षां थोडा उशीरानें का होईना, पण मालाची नेआण करता येईल.

राजनिष्ठ व भूतदया या बाबतींत हिंदुस्थान कधीं मागें राहावयाचें नाहीं असा या देशाचा पूर्वापार लौकिक आहे. त्या लौकिकात बोअर युद्धाचे वेळीं आफ्रिकेंतले मि० गांधी, मुंबईचें परलोकवासी शेट दामोदरदास सुखडवाला यांनीं भर घातली. चिनी युद्धाचे वेळीं एक हॉस्पिटल जहाज तयार करून ग्वाल्हेरचे श्री० शिंदेसरकार स्वतः गेले होते. तसे या युद्धाचे वेळीं जाण्यास अनेक रजपूत राजे महाराजे, मद्रासचे देशी वकील, आणि विलायतेंतले हिंदी विद्यार्थी तयार झाले आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. भूतदयेच्या दृष्टीनें ही हिंदुस्थानातले मुसलमानांनीं डा० सोहरावर्दी यांच्या पुढारीपणा खालीं जखमी झालेल्या ब्रिटिश शिपायांना मलमपट्टी करण्यासाठीं आपण येण्यास तयार आहों असें कळविलें आहे व ही त्याची विनंति सरकारनें मान्य केल्यास हिंदु, ज्यू, ख्रिस्ती वगैरे इतर जातींचे ही लोक अशीच भूतदया दाखविण्यास उत्साहानें पुढें येतील अशी खात्री आहे. पंचम जॉर्ज बादशहांनीं व त्यांचे प्रतिनिधि लॉर्ड हार्डिंज यानीं वेळोवेळीं प्रकट केलेल्या सहानुभूतीचा व मायाळूपणाचा हा परिणाम आहे असें कोण म्हणणार नाहीं ?

ना० गोखले यांना लॉर्ड क्रू साहेबांनीं 'सर' हा किताब स्वीकारण्याविषयीं विचारलें होतें, पण ना० मि० गोखले यांनीं तो घेण्याचें नाकारलें या बातमीच्या सत्यत्वाविषयीं आम्हास संदेह होता, पण गेल्या आठवड्याच्या मद्रासच्या कॉमनवील पत्रात मिसेस आनी बिझांट बाईनीं तो दूर केला. त्या म्हणतात कीं ही बातमी खुद्द ना० गोखले यानींच आपणांस विलायतेंत खाजगी भेटींत मोठ्या विश्वासानें सांगितली होती. मिसेस बिझांट बाईच्या या आश्वासनानंतर तिच्या विश्वासनीयतेबद्दल आतां कोणास शंका राहणार नाहीं. पण ना० मि० गोखले याच्या 'ज्ञानप्रकाशा'ला सुद्धां कळूं नये आणि त्या पत्रानें एक्सप्रेस पत्राचा या बाबतींत हवाला द्यावा ही गोष्ट ज्ञानप्रकाशाचें परप्रकाशित्व मात्र स्पष्टपणें दाखविते.

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः—** या आठवड्यांत पावसापेक्षा उघाडीनेंच जास्त मजा केली. तरी पण मध्यंतरी एक दिवस बराच पाऊस पडला. हल्लीं हवा स्वच्छ असून ऊनही बरें पडतें. त्या योगानें पिकांची वाढ समाधानकारक होत आहे. रोगराई म्हणण्यासारखी नाहीं.

व्हाइसरॉयच्या कौंसिलमध्यें ना० पंडित यांच्या खालीं झालेल्या जागेसाठीं पाच उमेदवार उभे आहेत. त्याचा निवड प्रांतिक कायदे कौंसिलचे बिन सरकारी सभासद आगामी दुसरी तीन तारखेस नागपूर येथें करतील. या निवडणुकींत बहुतेक राव बहादुर मुधोळकर हेच बहुमतानें यशस्वी होतील आणि तसा सुयोग आल्यास वऱ्हाडच्या म्युनिसिपालिट्या पुन्हा एक सभासद निवडून देतील व त्या जागेसाठीं अर्थातच आमच्या नगरचे शिरोभूषण म्हणजे रा० रा० रामचंद्र विष्णु महाजनी हे उमेदवार म्हणून पुढें येतील असा आम्हास भरवसा आहे.

प्रांतिक कायदे कौंसिलातील सरकार तर्फेचे दहा जनाचीं नांवें प्रसिद्ध झालेलीं आहेत. त्यात आपल्या प्रांताचे कमिशनर रा० रा० स्टॅंडन साहेब यांचें नांव आहे. हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो.

ना० रा० क्रम्प हे प्रांतिक कायदे कौंसिलचे व्हाईस प्रेसिडेंट नेमले आहेत.

रा. रा. पी. जे. जोशी यास मोरशी येथें बदलून त्याचे जागीं रा. रा. मंडपे यांस यवतमाळ येथें नेमिलें.

**पुरवणी:—** आजच्या अंकासोबत रा. रा. एमरुद्रमणी सेट्टी कापडाचे व्यापारी कोयमतूर यांच्या मालाच्या किमतीची यादी वाटली जात आहे. तिकडे वाचकांनीं लक्ष द्यावें.


## नोटीस

बनाम पाटील पटवारी बागाईत कजबे पातुर शेख बाबू ता० बाळापुर जी० आकोला यांस खाली सही करणार तुळसाई मर्द पुंजाजी माळी रा० पातूर शेख बाबू ता० बाळापुर जी० आकोला ईस कडून नोटीसीने कळविण्यात येते कीं कजबे पातूर शेख बाबू ता०बाळापुर जी०आकोला येथिल शेत सर्वे नं० ७४ आणि ११८ या दोन्ही सालीम शेतांची कबजे दार मी असोन माझ्याच मालकीचे आहे माझ्या शिवाय दुसरा कोणि मुळींच हिस्सेदार अगर वारस वगैरे नाहीत हल्ली माझ्या ऐकण्यात असे आले आहे कीं पांडु रंग नारायण भालेराव व शंकर सिंह सरदार सिंह जमादार ऊभयतां रा० पातूर शेख बाबू ता० बाळापुर जी० आकोला यांस लक्ष्मण व नवलाजी वा॥ कुसाजी माळी ईंगळें या ऊभयतानी सदर्हू वरील माझ्या दोन्ही शेतांतील कांहीं जमिन खरेदी देऊन खरेदी खत करून दीले आहे सबब या नोटीसीनें जाहीर केले आहे कीं वरील खरेदी देणार याचा सदर्हू माझ्या दोन्ही शेता वर कोणतेच प्रकारचा मुळीच हक्क संबंध नांहीत करीतां जाहीर केले आहे कीं वरील ईसमांनी करून घेतलेले खरेदी खता बदलची नोंद हक्क नोंदणीचे फेर फार रजिस्टरांत करू नये सबब या नोटीसीनें तुम्हास मुद्दाम जाहीर केले आहे कळावे ता०१२।८।१९१४ ई०

सही

तुळसाई मर्द पुंजाजी माळी नी० बांगडी दतूर शेरखां दर्गाखां पि० प्ली० आकोला

नो० नं० ३१

## सेंटचा राजा

वापरून तर पहा ! !

# ओटो सुगंधीचा भांडार दिलचमन

( रजिस्टर्ड )

आजपर्यंत बाजारांमध्यें निघालेल्या सर्व सेंट, अत्तर, यापेक्षां हे **ओटो दिलचमन** जास्त टीकाऊ मधुर आणि अधीक खुशबोदार आहे अशी आह्मी पुरी खात्री देतों. जर तुह्मी **ओटो दील–चमन** वापरला नसेल तर, एक वेळ वापरून खातरी करून घ्या. व ह्यांत स्पीरीट बिलकूल नाहीं, **चमेली** आणि **बटमोगरांच्या** ताज्या फुलांच्या अर्कापासून तयार केलेला आहे. फक्त २, ३ थेंब रुमालावर किंवा वस्त्रावर टाकल्यानें एकदम अनेक सुंगधाचा भांडार प्रस्तृत होऊन तुमच्या आसपासच्या सर्व लोकांच्या मनास आनंद होईल.

किंमत -॥- ड्रामची टयुब ८ आणे } किंमत -॥- औंसाची बाटली २ रुपये.
" १ " " १२ आणे } व्ही. पी. पो. खर्च वेगळा,

**ओटो दीलचमनची सुगंधी कार्डे दर डझनास १२ आणे,**
**सेंटच्या नमुन्यासाठीं दोन आण्याची टिकीटें पाठवा.**

**सेंट, ओटो किंवा सुगंधी कार्डें** खरेदी करतेवेळीं **ओटो दीलचमन** हें नांव बरोबर वाचून पहावें. जर तुमच्या जवळच्या दुकानदाराकडे मिळत नसेल तर, खालील पत्त्यावर लिहून माल मागवावा.

एकटे एजंटस्

## एच्. आर. मोदी आणि कं.

तारेचा पत्ता " सेकेरीन " मुंबई. } विलायती औषधें व परफ्युमरीचे व्यापारी नं. २० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर मुंबई.



शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, हगवण, संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरियनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचे प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ०१२


बी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो. नं. २८



## घड्याळ फुकट मिळेल



( आमके आम और गुठलियोंके दाम )

गजकर्णाचे [ दाद ] रामबाण मलम किं. ४ आणे दराची १२ शीशी ३ तीन रुपयांची घेणारास टाइमपीस घड्याळ फुकट मिळेल. २४ शिशी एकदम घेणारास खिशांतील [ जेब ] घड्याळ फुकट मिळेल. औषध विकून घड्याळ फुकट वापरा.

आमचे कारखान्यांत, सर्व प्रकारचीं पुस्तकें, औषधें, घड्याळा वाचेस, सुगंधी सामान, तेलें, अत्तरें वगैरे योग्य किंमतीनें मिळतात. आमचा मोठा क्याटलाग फुकट मागवा. तसेंच आपण आपल्या व आसपासचे गांवांतील लिहीणदार माणसांचीं ५० पन्नास नांवें पूर्ण पत्त्यासह लिहून कळविल्यास मनोरंजक पुस्तक पाठवू.

१ टेबलावर ठेवण्याचें टाईमपीस घड्याळ १॥ रु.
२ रास्कोप सीस्टिम [ खिशांतील घड्याळ २ रु.

पत्ता जयचंद्र कंपनी ( वर्धा सी. पी.)

नो. नं. २९



वार्षिक वर्गणी टपाल व्ही. पी. सह १०३
वर्षारंभ जुलै.

## बाल सन्मित्र पुस्तक माला.

या मालेंत सन्मित्रा प्रमाणें सदुपदेश करून चांगलें वळण लावणारीं, सोप्या पण चटकदार भाषेंत लिहिलेलीं १००।१०० पृष्ठांचीं मनोरंजक व अत्यंत उपयुक्त पुस्तकें वर्षांत चार प्रसिद्ध होतात. डॉ. सर भालचंद्र; रा. ब. चि. वि. वैद्य एम्. ए. एल. एल् बी. रा. ब वि. मो. महाजनि एम्. ए. रा. सा. गो. बा. कानिटकर बी. ए. एल्. एल्. बी; रा. सा. वि. कॉ. ओक; ह. ना. आपटे वा. गो. आ.बी.ए इ सुप्रसिद्ध विद्वान् गृहस्थांचे उत्कृष्ट अभिप्राय मालेंतील विक्रीचीं पुस्तकें १ अभ्यास ( अत्यंत उपयुक्त निबंध ) २ दिवाळीची देणगी ३ नीतिभूषण ४ सद्बोध रत्नहार, ( तिहींतही गोष्टी, कविता, निबंध, नाटकें, चरित्रें, पत्रें इ० उत्कृष्ट विविध विषय ) प्रत्येक पुस्तकास व्ही. पी. नें ०८ एकदम चारी घेतल्यास १०७ नवीन वर्गणीदारांस फक्त १०३ पडतील.

एजंट परचुरे पुराणिक मंडळी मुंबई नं० ४ } व्यवस्थापक बालसन्मित्र कार्यालय मुंबई नं० २ } अगर मालवण } जि० रत्नागिरी.

नो. नं. २६


## NOTICE

Notice under order V Rule XX Civil Pro: Code.

In the Court of M. Rahim Baksha M. A.

suit No. 496 J of 1914
Judge, Small Cause Court, Delhi.

1 Perbhu Dial s/o Lachhman Das
2 Raggu Mal s/o Dwarkadas pro: of Lachhman Das Dwarkadas of Delhi, Plaintiff

Against

Fermi Dungarsi Das Kishanlal of Khamgaon, Distt Buldana, Berar Province, Defendant

Claim Rs 165-7-

Whereas it has been proved that the defendant named evades service notice is hereby issued that if the said defendant does not appear in this Court on the 27th day of August 1914, the Case will be heard exparte agains. him

Given under my hand and the seal of the Court this 10 th day of August 1914.

Sd/ M. Rahim Baksh
Judge,
( Seal ) Small Cause Court,
Delhi.

No. No. 27


साताऱ्याचे प्रसिद्ध कोल्हटकर राजवैद्यकृत

## कस्तुरीच्या गोळ्या

यापासून अपस्मार वायू–ज्यांस बालग्रह फीट्स' [ हिस्टेरिया ] फेंपरे मिरगी, वतारणें, आंकडी वुरे ह्मणतात तो आजार, लहान मुलें व मोठीं माणसें यांचा नवा जुना आजार खात्रीनें बरा होतो. तसेच बहुतेक सर्व ज्वर अर्धांग वगैरे वायू बरे होतात. १ रुपया पासून वर कितीही किंमतीच्या गोळ्यांच्या बाटल्या माहितीचे कागदासह विकत मिळतात. रोखीनें अगर व्ही. पी. नें मागवा. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें. याशिवाय बहुतेक प्रकारच्या मात्रा, गोळ्या, भस्में, आंसवे, घातहारक तेलें विकत मिळतात.

सखाराम अप्पाजी कोल्हटकर वैद्य,
ठाकुरद्वार रोड हरकुवरबाई नवी चाळ, मुंबई नं० २

नो० नं० ३०

**नौबूल नवरत्न** — न कायेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथ्याची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे.

**नवरत्न टेबलेट** — उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे.

**नवरत्न तमाखु** — पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा.

**मद्रासी नस** — अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे

**गजकर्णाचें मलम** — गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे.

**केश काढण्याचें तेल** — केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे.

**चन्द्रकान्त बाम** — मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे.

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट- चमन कंपनी.

पत्ता— ताजनपेठ बाजार- आकोला.

नो. नं. २०



# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8.47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80,05,818 |
| 1898 | 31,36,422 | 1.41,32 356 |
| 1903 | 41,07,009 | 2,10,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made upon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
N. No. 21 C. P. Berar & Khandesh, NPU.



अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरेदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ।॥ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. २२



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांड्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० २३



सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

## आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गौतमराव केशव

नो० नं० २४ ५६३ ठाकूरद्वार मुंबई.


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

*Regd. NO N. 150*

# वऱ्हाडसमाचार.

**Berar Samachar**

वर्ष ४८ ] आकोला— सोमवार तारीख २४ माहे आगष्ट सन १९१४ इ० [ अंक ३३

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Ridland.
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २९$\frac{1}{3}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } J. G. Ridland.
आकोला २१-९-१० } एजंट

न० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**

नो. नं. ३

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. (Natl) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 4

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेग्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची पाकोटें १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी नें रु० १०६




**सर्वत्र एजन्टस् पाहिजेत**
**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**

नो. नं. ५

### नोटीस

नोटीस बेशमी आमदखां वा॥ तवखलखां रा० कुसुमकोट पोष्ट चिखलदरा तालुके इलिचपुर यांसः—

खालीं सही करणार अशी नोटीस देतो कीं तुमची मुलगी नामे सकीनाबी मर्द दुलेखां हीमझी लग्नाची बायको आहे ती माझे घरीं नांदत असतां तुम्हीं तिचे भेटी करितां येथें आले होते व तिला तुमचे गावीं घेऊन गेले. तिला नेतांना तिच्या अंगावर माझ्या मालकीचे चांदी सोन्याचे दाग दागीने सरासरी २२९।२९० रुपयांचे होते त्यासह तिला तुम्ही नेत असतां तुम्ही मला चार चौघांच्या समक्ष १०-१२ दिवसांनीं तिच्या अंगावर असलेल्या चांदी सोन्याच्या दागदागिन्यासह आणून घालीन असें कबूल केलें होतें. आज सरासरी त्या गोष्टीस ८।९ महिने झाले तरी तुम्ही तिला आणून घातले नाहीं. मध्यंतरी आम्ही तुम्हास २।३ पत्रें पाठविलीं व पोष्टमार्फत एक नोटीसही दिली होती. परंतु तुम्ही अद्याप पर्यंत तिला आणून घातली नाहीं करितां हा नोटीस देण्याचा प्रसंग तुम्ही आणिला आहे तरी ही नोटीस पावले दिवसापासून पंधरा दिवसांचे आंत तिचे आंगावर माझ्या घरचे असलेल्या चांदी सोन्याचे दागदागीन्यासह तिला माझे घरीं आणून घालावें. तसें न केल्यास तुमचे वर कोर्टांत योग्य काम चालवून व्यवस्था केली जाईल. तरी तुम्ही असा प्रसंग आणून घेऊं नये व आपसांत विपट पाडून घेऊं नये. जर तिच्या खावटीच्या खर्चाबद्दल तुम्ही काहीं तक्रार घेतल्यास त्याची जबाबदारी मजवर नराहतां मज कडून तिचे खावटी बद्दल कांहीं एक मिळणार नाहीं. व उलट तुमचे कडून कोर्ट खर्च आणि ह्या नोटीसीचा खर्च भरून घेतला जाईल. कळावें ता० १४।८।१९१४ द० नारायण हिरामण बारी जामोदकर रा० आकोला ताजनापेठ.

सही
दुलेखा वा॥ गुलाम हुसेनखा
सौदागर रा० आकोला
ताजनापेठ.

नो० नं० ६

### नोटीस

सर्वत्र शेट सावकार लोकांस कळविण्यांत येतें कीं माझा मुलगा नामे सकूरखां वा॥ दुलेखां उमर वर्षे १५।१६ रा० आकोला ताजनापेठ हा हल्लीं अज्ञान आहे व पुढे तो जरी सज्ञान झाला तरी तो कदाचित् माझ्या जिनगीची अफरातफर करेल असें मला वाटल्यावरून मी सर्वत्र लोकांस कळवितो कीं तो अज्ञान असो कीं सज्ञान असो त्याजपासून माझी जिनगी कोणी गहाण अगर खरेदी घेऊं नये व त्यास माझे संमती शिवाय कोणी कर्ज वगैरे देऊं नये. जर कोणी त्याला कर्ज देऊन माझी जिनगी खरेदी अगर गहाण करून घेईल तर त्याची जबाबदार माझे जिनगीवर न राहतां घेणारावर राहील करितां तो अज्ञान असतानाच सर्वत्रास सुचवीत आहे.

कळावें ता० १४ ८.१४

दस्तुर नारायण हिरामण बारी
जामोदकर रा० अकोला
सही
दुलेखां वा॥ गुलामहुसेनखां सौदागर
रा० आकोला ताजनापेठ

नो. नं. ७

### नोटीस

रा. रा. हरी फकीरजी आणि भिकाजी लक्ष्मण सिंपी उभयता राहणार आलेगांव यांना खालीं सही करणार यांजकडून जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आम्ही पोष्टांतून तुम्हास दोन नोटीसा केल्या तरी अद्याप आमचे रुपये दिले नाहींत. तरीही नोटीस पावल्यापासून तीन ३ दिवसांचे आंत आमचे रुपये चुकते व्याजासह द्यावेत तसें न केल्यास संमत १९७० चे कार्तिक शुद्ध १ पासून रुपये चुकते मिळे पर्यंत तुमचे पासून व्याज दोन रुपये शेंकडा घेऊं व रितीप्रमाणें कोर्टांत फिर्याद करून कोर्टाचे खर्चासह व नोटीसीचे खर्चासह व वरील शर्तीचे व्याजासह सर्व रुपये तुम्हास द्यावे लागतील. या सर्व शर्ती तुम्हास मंजूर आहेत असें समजून पये वसूल करण्यांत येतील मग पुढें तुमची कोणत्याही प्रकारची सबब ऐकली जाणार नाहीं. कळावें तारीख १८-८-१९१४ इ.

सही.
कृष्णासा नेमासा सावजी दुकान
आकोला तर्फे वहीवाटदार मानी-
कसाव गंगासाव द. खु.

नो. नं. ८

### जाहिर नोटीस.

मल्याव॥उद्या महार रा० मेळजानोरी ता॥ बाळापूर पोष्ट शेगांव यांस खालीं सही करणार यांजकडून याजाहिर नोटिसीनें कळविण्यांत येतेकीं तुम्ही तारीख१७।९।१९११इसवी रोजीं पुर्णांक०-१००चा दरमाहा दर शेंकडादोन रुपये व्याजाचा समत १९६८ ची मार्गशीर्ष शु॥९ चे करार तारीख ३१।११।१९११ चा लिहून दिला. त्याचा करार पुरा होऊन अंदाजा दोन वर्षांवर दिवसझाले परंतु तुम्ही त्या पुरज्याची अदाई केली नाहीं आतां त्याची मुदत जाण्याची वेळ आली या साठीं तुम्ही पुरज्याची रकम व्याजा सुद्धा आठ दिवसांत चुकती करावी आणि पुरजा काढून घ्यावा या प्रमाणें न केल्यास तुमचेवर दिवाणींत दावा करून रकम व्याजासुद्धां वसूल केली जाईल ही नोटीस दिली सही. सही

१ सिवप्रसाद दुर्गाप्रसाद द० खु०

नो. नं. ९

वऱ्हाडसमाचार

मित्ती भाद्रपद शुद्ध ४ शके १८३६

## एक सुंदर रूपक.

विविधज्ञानविस्ताराच्या जुलै महिन्याच्या अंकाबरोबर प्रसिद्ध झालेल्या साहित्यपत्रिकेंत कलकत्याच्या साहित्य संमेलनाची रा. रा. वा. गो. आपटे यांनीं लिहिलेली हकीकत प्रसिद्ध झाली आहे. तींत परिषदेचे अध्यक्ष, बाबू द्विजेंद्रनाथ ठाकूर, डॉ. रवींद्रनाथ यांचे ज्येष्ठ बंधु, यांच्या भाषणांतील एक रूपक दिलें आहे. तें फार सुंदर असल्यामुळें आमच्या वाचकांच्या लाभासाठीं आम्हीं पुढें देतों आहे:—

पूर्वी आपल्या देशांत एक राजर्षि होऊन गेला. पराविद्या हें त्या राजाच्या राणीचें नांव होतें. त्याला एकच पुत्र विज्ञान ( भौतिक शास्त्रज्ञान ) हा होता. राजानें वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करण्याचा व पुत्राच्या स्वाधीन राज्य करण्याचा संकल्प केला होता. पण पुत्राचें वय अल्प-सात आठ वर्षांचें-तेव्हां राज्यकारभार वृद्ध मंत्री स्मृति--पुराण याच्यावर सोंपवून आणि दुर्भिक्षाचे वेळीं प्रजेला अक्षय राजभांडारांतून अमृतोपम खाद्य--पेय स्वल्प मूल्यानें देण्याविषयीं सांगून व पुत्राला हळू हळू सर्व विद्यांचें शिक्षण देण्याविषयींचें आज्ञापत्र स्वहस्तें लिहून राजानें मंत्र्याच्या स्वाधीन राज्य करून राजा तपोवनांत जाऊन राहिला. राजा निघून गेल्यावर मंत्र्यानें भांडारांतल्या सर्व खाद्य द्रव्यांचें मुल्य मोठ्या कसोशीनें ठरवून, अमक्या अमक्या किंमतीस हें द्रव्य मिळेल, लागेल त्यानें घेऊन जावें अशी दवंडी देवविली. पण कोणी घेण्यास येईना. मंत्र्यानें ठरविलेली किंमत प्रजेला फार भारी वाटली. आपण उपाशी मरूं, पण भांडारांतलें खाद्य घेणार नाहीं, असा सर्वांचा निश्चय ठरला. तो ऐकून मंत्री घाबरला त्याला रक्षणनीति व लोकरंजना अशा दोन स्त्रिया होत्या. त्यांच्या कानीं हा प्रकार गेलाच होता. त्यांनीं आपापल्या मताप्रमाणें पतीला मसलत दिली. रक्षणनीति कौसल्येसारखी व लोकरंजना ही कैकयीसारखी होती. मंत्र्यानें धाकट्या पत्नीची मसलत ऐकून भांडारांतलें थोडें शुद्ध तत्वज्ञानरूपी खाद्य काढून घेऊन त्यांत पुष्कळ क्रियाकर्मरूपी असार आणि खराब खाद्याची भेसळ केली व तें मिश्रण प्रजेच्या ह्मणण्याप्रमाणें स्वल्प किंमतीला दिलें. आपलें ह्मणणें मंत्र्याला पटलें ह्मणून प्रजेला आनंद होऊन त्या आनंदाच्या भरांत तिनें तें सपाटून खाल्लें. तें अर्थात् तिला बाधलें. इकडे राजपुत्र विज्ञान हा अल्पवयी होता, तरी मंत्र्याचें हें कृत्य त्याला न आवडून त्यानें मंत्र्याचा निषेध केला, पण मंत्र्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. पुढें सात आठ वर्षांनीं त्या अन्नाचे दुष्परिणाम दिसूं लागले; तेव्हां राजपुत्राला अतिशय दुःख होऊन प्रजेची ती दुर्दशा त्याच्यानें पाहवेना ह्मणून तो त्या देशांतून चालता झाला; आणि पाश्चात्य नांवाच्या एका देशांत त्यानें आपली नवी गादी स्थापिली व तेथें त्यानें आपल्या नव्या प्रजेला सुखी केलें. जुन्या प्रजेच्या नशिबीं दुर्दशा भोगण्याचें होतें. ती भोगीत ती प्रजा तशीच राहिली. राजपुत्रानें आपल्या प्रजेचा, तिच्या विपन्नावस्थेंत त्याग केला ही गोष्ट वाईट झाली. त्यानें आपल्या पित्याकडे जाऊन त्याला सगळा वृत्तांत कळवावयाला पाहिजे होता, व दुष्ट मंत्र्याला ताळ्यावर आणून आणि आपल्या पितृदत्त राजपदावर आरूढ होऊन पित्याची इच्छा पूर्ण करावयाची होती ह्मणजे सगळें चांगलें झालें असतें. " या रूपकांत आमच्या देशाची तत्वज्ञानविषयक सद्यःस्थिति फार मार्मिकपणानें प्रतिबिंबित केली आहे, असें जें रा. आपटे ह्यांनीं ह्मटलें आहे तें आमच्या सूज्ञ वाचकांस पटल्यावांचून राहणार नाहीं.

सुबोध पत्रिका.

---

## गसतीचा रिपोर्ट

ले० क० लेन यांनीं मध्य प्रांतांतील तुरुंगांसंबंधानें केलेल्या १९१३ सालच्या रिपोर्टांत मनमोकळेपणा, आणि विविध माहिती हे दोन गुण विशेषतः आहेत. जेल खात्यांतल्या अधिकाऱ्यांच्या हातून घडलेल्या चुकांवर पांघरूण घालण्याचा किंवा जें आपणांस कळत नाहीं तें कळत आहे असें दाखविण्याचा यत्न केलेला नाहीं. उदाहरणार्थ हल्लीं फटके मारण्याच्या शिक्षेविरुद्ध सर्व सुधारलेल्या देशांतून नंगी ओरड सुरू आहे तरी ही अतिनिष्ठुरतेची शिक्षा अजूनही हिंदुस्थानांत-मध्यप्रांतांत तरी बंद झालेली नाहीं, निषिद्धवस्तु जेलमध्यें आणल्या जातात कीं नाहींत याचा तपास व्हावा तसा होत नाहीं, कैद्यांवर देखरेख ठेवणारे वॉर्डर लोक क्षुद्र अपराधांसाठीं कैद्यांना कडक शिक्षा करतात वगैरे गोष्टी ले० क० लेन यांनीं स्पष्टपणें कबूल केल्या आहेत. त्याच प्रमाणें कैद्यांच्या शारीरिक स्वास्थ्यासंबंधाच्या काय त्या गोष्टी जेल अधिकाऱ्यांच्या रिपोर्टांत असतात, पण कैद्यांच्या मानसिक स्थितीविषयींचें त्यांचें ठायीं घोर अज्ञान असतें ही गोष्टही त्यांनीं सरळपणानें कबूल केली आहे. तुरुंगाच्या इमारतींच्या बळकटीकडे सरकारचें जितकें लक्ष असतें त्यापेक्षां कैद्यांना उपयुक्त कामाला लावून तुरुंगांतल्या दूषित नैतिक वातावरणांतून काढून शुद्ध हवेंत आणण्याचे अधिक प्रयत्न व्हावयास पाहिजेत ही गोष्टही त्यांनीं सरकारला सुचविली आहे. या रिपोर्टांत कित्येक गूढ प्रश्नही आहेत, उदाहरणार्थ, शिक्षणप्रसाराबरोबर गुन्ह्यांची संख्या कमी व्हावी अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. पण ले० क० लेन ह्मणतात कीं गेल्यासालीं लिहितां वाचतां येणाऱ्या अपराध्यांची संख्या ४६ नें वाढली! या वाढीचें कारण इनस्पेक्टर जनरल साहेबांनीं दिलेलें नाहीं. त्यांनीं तें गूढ तसेंच राहूं दिलें आहे. आमच्यामतें यांत गूढता खरोखर कांहींच नाहीं. कारण नुसतें लिहितां वाचतां आलें कीं त्याबरोबर शिक्षणाचे योग्य संस्कार मनावर झालेच पाहिजेत ही समजूत चुकीची आहे. शिक्षण लिहितां वाचतां येण्याहून निराळेंच आहे. ज्याला शास्त्रिय माहिती विषयींची जिज्ञासा असेल त्यालाही या रिपोर्टांत विचारासाठीं भरपूर सामग्री आहे. उदाहरणार्थ भाज्या खाण्यापासून शरीरावर काय परिणाम घडतात, भाज्या खावयाच्या त्या वाळलेल्या खाव्या कीं हिरव्या खाव्या उकडून खाणें आरोग्य दृष्ट्या हिताचें आहे कीं कच्च्या खाणें अधिक हिताचें आहे वगैरे गोष्टींची व्यवहारिक व अनुभविक माहिती पाहिजे असेल तर ती या रिपोर्टांत सापडेल. भाज्या उकडून खाव्या असें ह्मणणारे अर्थात् उकडण्यानें रोगकारक जीवजंतूंचा नाश होतो असें ह्मणतात. ले० क० लेन यांना हें जीवजंतूंचें मानविलेलें स्तोम पसंत नाहीं. ते ह्मणतात कीं उकडलेल्या भाज्या खाण्याची सवय करून मनुष्यानें आपल्या शरीराची जंतूंच्या कृतीला प्रतिबंध करण्याची शक्ती मात्र कमी करून हानी करून घेतली आहे. जीवजंतूंमारख्या शत्रुपासून रक्षण करण्यास उकळलेलें पाणी व शिजविलेलें अन्न यांची तटबंदी उभारण्यापेक्षां त्या जीवजंतूंचा नाश करणारें अँटी टॉक्सिन द्रव्य आपल्या शरीरांतच उतन्न करण्याची शक्ती वाढविणें हें जास्त इष्ट आहे, आणि यासाठीं कैद्यांना काकड्या, मुळे, कांदे, दाण्यांच्याशेंगा वगैरे कच्च्या खाता येणाऱ्या भाज्या जास्त द्याव्या अशी त्यांची शिफारस आहे. कैद्यांना धर्म व नीति यांचा उपदेश करून सन्मार्गाला लावण्याच्या विरुद्ध ते नाहींत पण हें काम कोणातरी वजनदार आणि नीतिमान् अशा गृहस्थानें स्वतः मन लावून घेतलें तर तें परिणामकारक होतें. पण भाडोत्री माणूस ठेवून केल्यास जेलच्या इतर नोकरचाकराप्रमाणें हाही एक सरकारी नोकर आपल्या कानाशीं कटकट करण्यासाठीं ठेविला आहे. अशी कैद्यांची समजूत होऊन इष्ट परिणाम घडत नाहीं असा इन्स्पेक्टर जनरल साहेबांचा अनुभव आहे. त्याचप्रमाणें या कामीं आमचे लोक आरंभीं आरंभीं उत्साह दाखवितात, पण पुढें त्यांचे प्रयत्न शिथिल होतात असेंही त्यांचें ह्मणणें आहे. ही आरंभशूरता आमच्या हाडींमासीं खिळलेली दिसते व तीच आमच्याप्रत्येक राष्ट्रीय उन्नतीच्या प्रयत्नांत विघ्न करते हा सर्वांचे अनुभव आहे. हाच अनुभव या ठिकाणींही दिसावा ही विचित्र नसली तरी शोचनीय गोष्ट आहे. यांत शंका नाहीं.

---

## मि० दादाभाईनौरोजी यांचा संदेश

हिंदुस्थानचे वृद्ध पितामह मि० दादाभाई नौरोजी हे वृद्धपणामुळे दशकार्यापासून निवृत्त होऊन आपल्या आयुष्याचा संध्याकाळ आपल्या गांवीं वेरसोवा येथें कंठीत आहेत. तरी मधूनमधून बिकट प्रसंगीं ते आपल्या अनुभवाचा आणि सुविचारांचा फायदा संदेशाच्यारुपानें आपल्या देशबांधवांना देत असतात. सध्याच्या युद्धकाळाच्या प्रसंगीं हिंदुस्थानानें कसें वागावें याबद्दल त्यांचा संदेश गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांत ते ह्मणतात कीं मी आपला सारा जन्म हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर टीका करण्यांत व अधिकारीवर्गाचे दोष दाखविण्यांत घालविला आहे, तरी मी हें निशंःकपणें सांगूं शकतों कीं हिंदुस्थान दुसऱ्या एखाद्या परक्या सत्तेखालीं न जातां ब्रिटिश सत्तेखालीं गेला आहे ही परमेश्वराची योजना हिंदुस्थानच्या हिताची असल्यामुळें ब्रिटिशसत्तेला आपल्या राजनिष्ठेनें दृढता आणणें व सध्याच्या सारख्या युद्धप्रसंगीं हातून होईल तेवढी त्या सत्तेला मदत करणें हें हिंदुस्थानच्या मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे. हिंदुस्थानचे लोक या पितामहाच्या उपदेशाला योग्य मान देतच आहेत व पुढेंही देत राहतील यांत आह्मांला बिलकुल शंका नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांचा वडिलांच्या आज्ञेवर ह्मणजे धर्मग्रंथाच्या आज्ञेप्रमाणें किंवा आकाशवाणीप्रमाणें पूर्ण श्रद्धा आहे, आणि ही श्रद्धा कायम आहे तोंपर्यंत मि० दादाभाई सारख्या महात्म्याच्या संदेशाचें उलंघन त्याचेंहातून होण्याची भीती नाहीं.

---

## लॉर्ड मोर्ले यांचा राजीनामा

राजकारणाच्या रंगभूमीवरून लॉर्ड मोर्ले व मि० बर्न्स या दोघा ब्रिटिश मुत्सद्यांनीं या महिन्याच्या आरंभीं पाय काढून घेतल्याची खबर आली आहे. लॉर्ड मोर्ले यांचा संबंध ब्रिटिश राजकारणाशीं आज सुमारें ४० वर्षें आहे. या ४० वर्षांत त्यांनीं आपलें नांव इंग्लंडच्या इतिहासांत-इंग्लंडच्याच नव्हे तर आयर्लंड व हिंदुस्थान यांच्याही इतिहासांत अमर करून ठेविलें आहे. बर्क, ब्राइट किंवा ग्ल्याडस्टन यांच्या अंगीं दिसून येणारी तडफ किंवा अलौकिक वक्तृत्व यांचे ठायीं नव्हतें, तरी राजकारण व नीतिमत्ता यांची सांगड घालतां येते ही गोष्ट त्यांनीं आपल्या वर्तनांत उत्तम प्रकारें दाखविली यांत शंका नाहीं. ह्मणूनच इंग्रज लोक त्यांना 'प्रामाणिक जॉन' असें लाडकें नांव देतात. लॉर्ड मॉर्ले हे मिलचे पट्टशिष्य व ग्ल्याडस्टन साहेबाचे उजवा हात होते. आयर्लंडची बाजू उचलून धरण्याचें ब्रीद त्यांनीं अखेर पर्यंत सोडलें नाहीं. हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी होण्याचे पूर्वीचे त्यांचे स्पष्ट उद्गार व नंतरची त्यांची कृति यांच्यामध्यें कांहीं दिवस छत्तिसाचा आंकडा दिसूं लागल्यापासून हिंदुस्थानचे लोकांचीं मनें त्यांच्या विषयीं मध्यंतरी कलुषित झालीं होतीं, तरी हिंदुस्थानच्या राज्य पद्धतींत सुधारणा करून कायदे कौंसिलाचें क्षेत्र वाढविण्याचें आणि इंडियाकौंसिलांत दोन हिंदी सभासदांचा प्रवेश करविण्याचें श्रेय अखेर त्यांनींच घेतलें याबद्दल हिंदुस्थान त्यांचा ऋणि आहे. त्यांचें लॉर्डस् सभेंतलें अखेरचें भाषण हिंदुस्थानाबद्दलचें-लॉर्ड क्रू साहेबांनीं तयार केलेल्या इंडिया कौंसिलबिलाला पुष्टि देण्याबद्दलचें झालें. ब्रिटिश मुत्सद्दी ह्मणून ते प्रसिद्ध आहेतच, पण यापेक्षांही बर्क, ग्ल्याडस्टन, यांचे चरित्रलेखक व उत्तम तत्ववेत्ते, सूक्ष्मदर्शी हृदयग्राही आणि मार्मिक लेखक ह्मणून त्यांची कीर्ति अमर राहील. ग्ल्याडस्टन साहेबांचें त्यांनीं लिहिलेलें चरित्र हें मराठी

चरित्र लेखकांनीं कित्ता ह्मणून आपल्या पुढें ठेवण्यासारखें आहे. असा थोर पुरुष आपल्या वयाचीं पाऊणशें वर्षे उलटून जाईपर्यंत पार्लमेंटसारख्या महत्त्वाच्या राजसभेंत वादविवादासाठीं कंबर बांधून उभा राहतो, आणि कॅबिनेट मिनिस्टरसारखीं जोखमीचीं कामें मोठ्या दक्षतेनें करून पुढें वानप्रस्थाश्रम घेईपर्यंत जगतो हेंच ब्रिटिश मुत्सद्यांत एक विशेष आहे. आतां या पुढें आपल्या आयुष्याचीं अखेरचीं वर्षे लॉर्ड मोर्ले आवडत्या साहित्य सेवेंत घाल तात कीं काय तें पाहणें आहे.

## ब्रिटिश सरकार व व्यापाराचा विमा.

सध्या युद्धाच्या गडबडीमुळें व्यापाराच्या मालाचे दर कोणीकडच्या कोणीकडेच भडकले आहेत, व त्यामुळें व्यापाराला हानि पोंचण्याचा फार संभव आहे हें पाहून ब्रिटिशसरकारचे फडणीस मि. लाईड जॉर्ज यांनीं लोकांना नुकतेंच आश्वासन दिलें आहे कीं व्यापारी जहाजांचे संबंधांत जें नुकसान होईल त्यापैकीं शेंकडा ८० इतकें नुकसान स्वतः सरकार भरुन देईल, इतकेंच नाहीं तर व्यापारी मालाचा विमा स्वतः सरकार उतरुन देण्यास तयार आहे. यावरून कसलाही प्रसंग आला तरी ब्रिटिशव्यापाराचें रक्षण करण्यास ब्रिटिश राष्ट्र सिद्ध आहे हें उघड आहे. याचें कारण सांगावयास पाहिजे आहे असें नाहीं. व्यापार हें इंग्रजांचें जीवन—प्रत्यक्ष प्राण आहे. ब्रिटिश वैभवाचा पाया व्यापार हाच आहे. ऐन युद्धाचे वेळीं ब्रिटिश व्यापाराला धोका बसून सरकारचें उत्पन्न कमी झालें तर इंग्लंडवर अनर्थ गुदरेल. ह्मणून सर्वनाशे समुत्पन्ने ऽर्धं त्यजति पंडितः या न्यायानें थोडासा चट्टा बसला तरी इंग्लंड आपलें व्यापाराचें शाश्वत उत्पन्न हातचें कधीं जाऊ देणार नाहीं. हेंच तत्त्व हिंदुस्थानांतल्या ब्रिटिशराजनीतीला लावून हिंदुस्थानांतल्या व्यापाराचें संरक्षण करण्याची हमी सरकारनें घ्यावी असें इंग्रजी पत्रें सुचवीत आहेत.

## अस्ट्रिया व फ्रान्स

युरोपांत सर्वत्र युद्धाचा वणवा पेटला असतां आणि आस्ट्रिया आणि जर्मनी यांचें सर्व्हिया व फ्रान्स आणि जर्मनी यांचे मध्यें हाडवैर असतां आस्ट्रिया व फ्रान्स यांच्यामधलें शत्रुत्व अद्याप कसें जाहीर रीतीनें प्रकट होत नाहीं याचें आश्चर्य वाटत होतें. शत्रुत्व होतेंच, पण त्याला सरकारी जाहीरनाम्याचें स्वरूप मिळालें नव्हतें तें अखेर गेल्या मंगळवारीं मिळालें. या जाहीरनाम्यानें सध्याच्या युद्धाचें विशेष कांहीं स्वरूप पालटेल असें नाहीं. कारण अस्ट्रिया व फ्रान्स यांच्यामधलें वैमनस्य ठरलेंच होतें. तथापि दिवसेंदिवस युद्धाचें पाऊल कसें पुढें पडत आहे हें मात्र यावरून दिसतें. इटलीही आतां तटस्थवृत्ति कायम ठेवील असा भरंवसा नाहीं. इटलीनें ह कोणताही एक पक्ष घेतला [ व घेतल्यास तो पक्ष कोणता असेल हें सांगावयाची अवश्यकता आहे असें नाहीं. ] तर भूमध्य समुद्रांत शांतता राहण्याचें कामीं त्याचें मोठी मदत होईल. कारण सध्यां त्या समुद्रांत आस्ट्रियाचीं जहाजें वावरत आहेत व त्यांना प्रतिबंध करण्यास जरी फ्रेंच आरमार पुरे आहे, तरी इटलीचें साह्य या कामीं फ्रान्सला मिळाल्यास दुधांत साखर पडल्यासारखें होईल असें सर्वांना वाटत आहे.

गेल्या आठवड्यांत अमेरिकेहून केरोसीन तेलाचे डबे भरून घेऊन आलेल्या जहाजावरील दोघे जर्मन क्यापटन बिनतारेचे संदेश पाठवीत असतां मुंबईच्या पोलिसांनीं पकडले. या गोष्टीचें महत्व प्रथम दर्शनीं चटकन लक्षांत येण्यासारखें नाहीं. पण यावरून अरबी समुद्रांत जर्मन जहाज कोठें तरी संचार करीत असलें पाहिजे या भीतीला पुष्टि मिळते. एक जर्मन जहाज मुंबईवर रोख धरून पिवळ्या समुद्रांत फिरत आहे अशी बातमी थोड्या दिवसां पूर्वी आली होती, पण त्या जहाजावर एक रशियन जहाज चालून जाऊन दोन्ही जहाजें बुडालीं अशीही पाठोपाठ बातमी आली. आतां या जर्मन कॅपटनांच्या संशयी वर्तनावरून अरबी समुद्राच्या निर्भयते विषयीं शंका उत्पन्न होते. मुंबईस ब्रिटिश आरमाराचा कडेकोट बंदोबस्त आहे व जपानी आरमार ही अर्ध्यारात्रीं ब्रिटिश सरकारच्या मदतीला जाण्यासाठीं तयार होऊन बसलें आहे वगैरे बातम्यांवरून हिंदुस्थानच्या सुरक्षित ते विषयीं शंका वाटत नाहीं. तथापि सध्यांचेकाळीं प्रत्येक जण बंदुकीच्या दारूच्या गोणीवर बसला आहे व कोणीकडून, केव्हां, कशा अल्पित रीतीनें ठिणगी येईल व भडका उडेल याचा कांहींच नेम सांगतां येत नाहीं.

## गरीब बिचारीं मुलें !

मद्रासच्या 'कॉमनवील' पत्रांत मि० मार्जोरी टटल नांवाच्या एका लेखकानें अमेरिकेंतल्या कारखान्यांत व शाळेंत असणाऱ्या दोन्ही मुलांचीं शब्दचित्रें फार सुंदर आणि थोडक्यांत काढलीं आहेत सदर लेखक ह्मणतो कीं अमेरिकेंत कारखान्यांतून ९ पासून १४ वर्षांपर्यंतच्या वयाचीं सुद्धां मुलें सगळा दिवसभर काम करीत असतात, तशींच शेतांतून कापूस वेंचण्याचें काम तीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत करतात. तरी त्यांचीं चित्रें पाहावीं तर त्यांच्या चेहऱ्यावर आरोग्य, उल्लास आणि आनंद यांचें प्रतिबिंब दिसतें. तीं हंसत असतात, त्यांचे केस वाऱ्याबरोबर उडत असतात, आणि तोंडानें गाणीं ह्मणत तीं आनंदानें दिवस शेतांत काढतात. पण तेंच शाळेंतल्या मुलांकडे पहा! त्यांना उदाहरणें सोडवितांना डोकें खाजवावें लागतें, घरून अभ्यास करून आलें नाहीं ह्मणजे मास्तराची छडी हाताला भेटूं पाहते, कपाळावर आठ्या आणि मुद्रेवर उदासीनता याशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. त्यांना शाळेंतलें काम ह्मणजे शिक्षण नव्हे तर शिक्षा वाटते. असें असून कारखान्यांत मुलांकडून फार काम घेतात ह्मणुन कित्येक लोक भूतदयेनें प्रेरित होऊन सरकारच्या कायद्याचा आश्रय करतात, आणि त्या शाळेंतल्या गरीब बिचाऱ्या विद्यार्थ्यांचा कैवार घेणारे मात्र कोणी फारसे दिसत नाहींत. मुलांची अधिक केविलवाणी स्थिति कारखान्यापेक्षां शाळांतूनच दृष्टीस पडते. ज्या अमेरिकेंत शिक्षणाच्या नव्या सोप्या, व सुधारलेल्या पद्धती रोज निघून शाळांत झपाट्यानें सुधारणा चालली आहे त्या शाळांसंबंधानें ही ओरड, मग मि० टटल साहेबासारखे लेखक हिंदुस्थानांतल्या शाळा पाहतील तर त्यांना काय वाटेल याची कल्पनाच केली पाहिजे. आमच्या इकडेही टाइम्स ऑफ इंडिया कर्त्याला कारखान्यांतल्या मुलांविषयींचा भूतदयेचा उमाळा येऊन त्यांनीं फॅक्टरी आक्ट अस्तित्वांत आणिला, पण शाळेंतल्या गरीब बिचाऱ्या मुलांची कींव करून त्यांची स्थिति सुधारणारा महात्मा अद्याप कोणी निघत नाहीं.

## देशी संस्थानिकांचा खाजगी खर्च

राजा हा प्रजेचा मालक कीं सेवक या प्रश्नाची चर्चा सध्यांच्या विसाव्या शतकांत करणें अस्थानीं आहे. राजा हा प्रजेचा मालक ही कल्पना हल्लींच्या काळांत कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रांत लोकांनां असह्य वाटणारी आहे. प्राचीन काळींही ही कल्पना आमच्या देशांत नव्हती. ही कल्पना मध्यंतरीच्या कृष्ण युगांतली आहे. आमचे संस्थानिक आतां दिवसेंदिवस इंग्लंड, अमेरिका वगैरे सुधारलेल्या राष्ट्रांचा आदर्श आपलेपुढें ठेवूं लागले आहेत; आणि प्रजेचें कल्याण हाच आमचा संतोष, त्यांचा उत्कर्ष हेंच आमचें समाधान, आणि त्यांची सेवा हेंच आमचें ध्येय हा गुरुमंत्र ते वेळींअवेळीं आपल्या भाषणांतून घडाघड पाठ ह्मणत असतात. पण उक्ति व आचरण यांच्यांत मात्र मेळ बसलेला त्यांचेठायीं दिसून येत नाहीं. या गोष्टीचें स्मरण आज होण्यास इंदूरसंस्थानचा वार्षिक रिपोर्ट कारण झाला आहे. हा रिपोर्ट श्री० महाराज सवाई तुकोजीराव यांनीं राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं घेतलेल्या वर्षाचा असल्यामुळें ते राजकुमार कॉलेजांत जीं तत्वें शिकले व युरोपखंडाच्या प्रवासानें जो अनुभव मिळाला त्याचें चीज कितीसें होत आहे हें पाहण्यासाठीं आह्मी मोठ्या उत्कंठेनें हातीं घेतला व जमाखर्चाचा ताळेबंद पाहूं लागलों तों प्रथमग्रासेमक्षिकापात झाला. इंदूर संस्थानच्या एकंदर वसुलाची रकम १९१२ सालीं ८७ लक्ष झाली. पैकीं नुसता राजवाड्यांतला ह्मणजे महाराजांचा खाजगी खर्च १८ लक्ष ८८ हजार रुपये झालेला पाहून कोणाचीही छाती दडपून जाईल. या खर्चाचा तपशील दिलेला नसल्यामुळें त्यांतला वाजवी व गैरवाजवी खर्च निवडून दाखवितां येत नाहीं. तथापि एकंदर उत्पन्नाचा जवळ जवळ एक चतुर्थांश नुसत्या राज घराण्याप्रीत्यर्थ खर्च व्हावा ही गोष्ट उपेक्षणीय नाहीं असें कोणाही विचारी मनष्यास वाटल्यावाचून राहणार नाहीं. एकंदर उत्पन्न ८७ लक्ष रुपये हे १०॥ लक्ष प्रजेपासून मिळाले. त्यांतले जवळ जवळ एक चतुर्थांश केवळ राजघराण्याकडे खर्च होणें याचा सरळ अर्थ असा कीं जवळजवळ दोन लक्ष प्रजा केवळ महाराज व त्यांच्या कुटुंबांतलीं माणसें आणि आश्रित यांची चंगळ करण्याकरितां वर्षभर राबली! इतर लोकांपेक्षां राजघराण्याचा खर्च विशेष असणें स्वाभाविक आहे. पण त्याला तरी कांहीं मर्यादा आहे. या खाजगी खर्चांत राजकुलीन पुरुषांसाठीं बांधलेल्या इमारतीचा खर्च येत नाहीं, कारण या इमारती पब्लिक वर्क्स खात्याकडून बांधल्यागेल्यामुळें त्या खात्यांत हा खर्च पडतो; आणि रिपोर्टाच्या सालीं अशा इमारती इंदुरांत बांधल्यागेल्याचा उल्लेख रिपोर्टांत नाहीं. अर्थात् हा खर्च ह्मणजे राजकुटुंबांचा नित्यखर्च, पोषाख, जडजवाहीर, व आश्रितांस इनामें वगैरे देण्यांतच झालेला असला पाहिजे इंदूरसारख्या मागसलेल्या संस्थानांत शिक्षणप्रसार, आरोग्य, लायब्रऱ्या, चांगल्यासडका, व्यापारवृद्धि, उद्योगवृद्धि यांसारखीं शेकडों महत्वाचीं कामें असतां तिकडे खर्च नहोतां १८ लक्ष रुपये नुसत्या खाजगी खर्चाचे पायीं चूर व्हावे ही गोष्ट श्री० महाराजांच्या प्रजावात्सल्यास, सुशिक्षणास व सुधारलेल्या कल्पनांस भूषणावह खास नाहीं. ब्रिटिश साम्राज्याचें वैभव इंदूरच्या लक्षपटीनें मोठें असतां तेथील सार्वभौमाच्या खासगी खर्चाचें प्रमाण तेथील उत्पन्नाच्या मानानें दर पौंड उत्पन्नास तीन पेन्स ह्मणजे १९रुपयांत ३ आणे आहे. ह्याहून थोडेसें सढळ प्रमाण धरलें तरी इंदूरच्या महाराजांचा खर्च वर्षास १॥ किंवा दोन लक्षांवर जाऊं नये. पण दोन लक्ष कोणीकडे व १८ लक्ष कोणीकडे! बडोदासंस्थानच्या रिपोर्टासंबंधानें लिहितांना मागें मुंबईच्या टाइम्सपत्रानें हीच टीका केली होती. इंदूरच्या खर्चानें बडोद्यावरही ताण केली आहे. मात्र बडोद्यांत लोकोपयोगी संस्था आहेत-तशी एकही संस्था इंदुरांत नाहीं. श्री० महाराज होळकर सरकार आमच्या या टीकेचें मर्म व तींतील सद्हेतु ओळखतील व पुढचे वर्षापासून अशा टीकेला जागा न देतील तर त्यांच्या विषयींची आदरबुद्धि आणि प्रेम हें दिवसानु दिवस वृद्धिंगत होऊन त्यांच्या प्रजेला बरेच वर्षांत न लाभलेले अपूर्व सुख अनुभवण्यास मिळेल ही आमची आशा पुढचे वर्षीं तरी पूर्ण होवो.

## दुभत्या गाई ह्मशी

आजकाल दुधाची फारचफार टंचाई झाली आहे. ही गोष्ट जगप्रसिद्ध झाली आहे. दुधाची कमतरता होण्याचीं कारणें संक्षिप्तरुपानें दिली आहेत तीं:—

१ सन १९०० सालच्या दुष्काळांत पुष्कळ गाई ह्मशी मेल्या. ती संख्या अद्याप पुरी झाली नसावी.

२ दररोज कसाबखान्यांत कांहीं गाई मारल्या जातात.

३ कांहीं रोगराईनें मरतात.

४ अपघातानें कांहीं मरतात. [ जंगली जनावरें, विताना वगैरे मरतात. ]

या कारणानें गाईंची व ह्मशींची संख्या कमी होत गेली आहे. त्यामुळें दूध मिळेनासे झाले आहे. लष्करी लोकांना दूध मिळेनासे झाले आहे. हल्लीं ही ओरड चोहींकडे आहे. त्या करितां मुंबई इलाख्यांत कांहीं "कोआपरेटिव्ह संस्था" काढण्याविषयीं डा० मन साहेबाच्या साह्यानें कामास सुरवात व्हावी अशी सूचना झाली आहे. या पूर्वीच ठिकठिकाणीं गोरक्षण संस्था निघाल्या आहेत. कांहीं गाईचें संरक्षण होत आहे पण हिंदुस्थानच्या मानानें फार थोडें काम आहे. हिंदुस्थान देश व त्या मधील लहान लहान प्रांत हे शेतकीच आहेत. त्या शेतीच्या कामास जनावरांची फार जरुरी आहे ती अशी कीं:—

१ शेतींत नांगरणें, वखरणें, डवरणें वगैरे.
२ शेतींतील पिकांस लागणारें खत
३ शेतींतील काम करणारे बैल पैदास होण्यास गाईंची अवश्यकता.

जर संख्या कमी झाली तर वरील जरुरीच्या कामास कमतरता व खत कमी सहजच येणार व आली आहे त्याच प्रमाणें दुधाची कमतरता सहजच आली आहे.

ब्रिटिश इंडिया मधील संख्या खालीं दिली आहे तीः—
( हे आंकडे आग्रिकल्चर स्टॅटिस्टीक वरून घेतले आहेत )

| वर्ष | बैल | गाई | म्हशी | रेडया | बकरी |
|---|---|---|---|---|---|
| १९०७-८ | ३०,३६३,९१९ | २२,२७२,३९१ | ९,६६४,७५२ | १८,०३३,०३५ | २५,२२०,९६६ |
| १९०८-९ | ३४,८५८,०८९ | २९,४९९,४६२ | १,४४७,२९८ | १९,८५५,१५३ | २९,३८५,७३० |
| १९०९-१० | ३६,८१५,०१९ | २७,८३३,५२९ | १२,०५७,०१९ | २२,८९६,६२२ | २८,१५५,०६३ |
| १९१०-११ | ३७,०८५,५७७ | २८,०४७,४२३ | १२,१२१,०९८ | २२,९२१,६६० | २८,५१८,०३१ |
| १९११-१२ | ३७,०८५,१०४ | २८,०६७,२५९ | १२,०९१,४५ | २२,८४८,०४३ | २८,५५४,८३२ |

यावरून दिसून येईल कीं इतक्या संख्येनें दुधाची पूर्णता होत नाहीं. ज्याप्रमाणें माणसांची संख्या वाढत चालली आहे तिचें प्रमाण दर शेंकडा ७ नी वाढ झाली आहे. त्याप्रमाणानें जनावरांचें म्हणजे गाई ढोरांच्या वाढीचें प्रमाण जास्त पाहिजे आणि मरणाचें व मारण्याचें प्रमाण फार कमी असलें पाहिजे म्हणजे दुधाची आबादानी चांगली होईल.

## प्रांतिक कायदे कौंसिल.

गेल्या सोमवारीं सर बेंजामिन रॉबर्टसन यांच्या अध्यक्षतेखालीं प्रांतिक कायदे कौंसिलची पहिली बैठक झाली. सर साहेबांचें प्रास्ताविक भाषण मोठें उत्साहजनक व आनंदकारक होतें. अशा स्वागतपर भाषणांत स्तुतीचा पाठ असणें स्वाभाविक आहे. सर साहेबांनीं लोकपक्षाचें अभिनंदन करावें व सर बोस व रा. ब. मुधोळकर यांनीं सरकारचे गुणनुवाद गावे हें ही स्वाभाविकच होय. पण या सामान्य आनंदाच्या प्रसंगीं देखील सरकार व प्रजापक्ष यांचा परस्पराविषयीं आदरभाव, सर्वांची सहकारितानें कार्य करण्याची महत्वाकांक्षा व लोक कल्याणाची तीव्र कळकळ या गोष्टी अगदीं उत्तानपणें हृदयांतून आपोआप बहिस्फुट होत आहे असें निदर्शनास आलें अशा आनंदाच्या व सुविचाराच्या पायावर उभारलेलें कौंसिल सदोदित लोककल्याण अभिवृद्ध करील हें निराळें सांगणें नको. आतां दुसरी बैठक चालू महिन्याच्या २७ तारखेस होणार आहे. ना० रा० ब० मुधोळकर हे ना० व्हाईसरॉयच्या कायदे कौंसिलचे सभासद निवडले गेले नाहींत त्यामुळें त्यांचा मोठ्या कार्यक्षेत्रांतील बहुमोल अनुभव प्रांतिक कारभारांत विशेष फायदा देणारा होईल.

## युरोपांतील महायुद्ध

फ्रांस व इंग्लंड यांच्या २५० मैलपर बेलजमच्या बाजूनें पसरलेल्या सैन्यापुढें जर्मनीचें सैन्य बेलजमची कोंडी करीत येईल याबद्दल वानवाच आहे. ज्या काहीं थोड्या थोड्या लढाईच्या बातम्या येतात त्यांत फ्रेंचाचाच विजय सर्वत्र ऐकूं येतो. ज्या बेलजम बाजूनें जर्मनी कोंडला गेला आहे त्याच प्रमाणें पूर्वेच्या बाजूनें ऑस्ट्रियाच्या कडील सैन्याला रशियन सैन्य माघार घेण्याला ठिकठिकाणीं भाग पाडीत आहे. रशियानें 'गंबिनेन' ठाणें सर केलें अशी काल्ची बातमी आहे. दिवसें दिवस युद्ध जोरावर येत चाललें असून घळ पंचवीसाव्यानेच सोमपेक्ष करणाऱ्या खडाजंगीच्या लढाया होतील असा रंग दिसतो! समुद्राच्या बाजूनें जर्मनीला ग्रहात ठेवल्यासारखें झालें आहे तसेंच जर्मन आरमारांही उत्तरमहासागरापासून डेन्मार्कच्या उत्तरभागापर्यंत कोंडून ठेविल्यासारखीच झाली आहेत. हल्लींच्या कळाकळ्या महत्वाच्या अर्जेरनाम्याचा रंग पुढें तयार होणाऱ्या जगाच्या नकाशांतून बदलावा लागेल कीं काय अशी शंका उत्पन्न करतात.

## वऱ्हाडवृत्त

हवामानः— गेल्या सोमवारीं सकाळीं सरासरी दोन तास जोराचा पाऊस पडला. बाराही जोराचा असल्यामुळें त्यावेळीं वादळाचाच देखावा दिसून येत होता. मंगळवारींही पहाटेस थोडा पाऊस पडला. त्यानंतर आठवडाभर उघाड असून हवा स्वच्छ होती. गेल्या सोमवारीं येथील नदीस बराच मोठा पूर येऊन रजपुतपुऱ्यांत पाणी शिरलें आणि काहीं गरीबगुरीब लोकांच्या झोंपड्या वाहून बरेंच नुकसान झालें. ते दिवशीं पुलावरील लोकांचा वाहरही थोडा वेळ बंद करण्यांत आला होता. मे० डेप्युटी कमिशनर साहेब, मे० डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट साहेब, डेप्युटी सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस यांच्या स्वाऱ्या पुलावर बातोविशीं हजर होत्या. आणखी एक हातभर पाणी चढलें असतें तर पुलावरून पाणी जाऊन गांवांतही पाणी शिरलें असतें आणि फारच नुकसान झालें असतें. असो. तसा कांहीं प्रकार झाला नाहीं ही ईश्वराची खैर झाली! आतांपर्यंत झालेला पाऊस तूर्त पुरेसा असून उघाड पडेल तरच बरें. नाहींतर पिकें सडण्याची भीति आहे. निंदणाचें व कोळपणीचें काम जारीनें सुरू आहे. पिकांची स्थिती चांगली आहे. आसपासचे कांहीं खेडेगांवांत तुरळक कॉलरा सुरू असल्याचें कळतें.

रा. रा. शहामहमद इषाक, तहशीलदार, वणी, यांस पहिल्या म्याजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले.

रा. रा. मिरझा गुलामेनबी बेग तहशीलदार, यांस खामगांव येथें नेमण्यांत आलें, व त्यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतल्यावर रा. रा. नारायणराव गणे यांस एक महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली.

रा. रा. बाळाराम त्रिंबक, तहशीलदार मेळघाट, यांस मोर्शी येथें बदलण्यांत येऊन रा. रा. यशवंत रावमान यांस मेळघाट येथें बदलण्यांत आलें.

**सूर्यग्रहणः**—गेल्या शुक्रवारीं सूर्यग्रहण होतें. तें हिंदुस्थानांत दिसणार नाहीं असें पुष्कळांचें म्हणणें होतें परंतु सायंकाळीं सरासरी सहावाजून वीस पंचवीस मिनिटांनीं स्पर्श कालास आरंभ झाला. व अखेरीस सूर्याचा ग्रस्तास्तच झाला. ग्रहण लागलेलें चांगलें स्पष्ट अस्त होईपर्यंत दिसत होतें. अभ्रामुळें तरी थोडा अडथळा झालाच. ग्रस्त भाग सरासरीनें एक चतुर्थांशइतका असून तो वायव्य दिशेस खालचे बाजूस होता.

## नोटीस

विद्यमान सीनियर सबजज साहेब कोर्ट आकोला यांचे कोर्टांत सक्सेशन सर्टिफिकेट नंबर ८ सन १९१४ चौकशीची तारीख १२।९।१४

अर्ज सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याकरितां सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं भास्कर सदाशिव कस्तुरे २ नारायण ३ प्रभाकर ४ दत्तात्रय बापाचें नांव सदाशिव नंबर २।३।४ अ. तर्फे पालक भाऊ भास्कर सदाशिव कस्तुरे रा. आकोला तालुके व जिल्हे आकोला यांनीं सर्टिफिकेट मिळण्याकरितां आमचे कोर्टांत ता. १४।७।१४ रोजीं अर्ज दिला आहे व त्याची चौकशीची तारीख १२।९।१४ नेमली आहे. तरी ज्यांची कांहीं अर्जाविरुद्ध तक्रार असेल त्यांनीं आमचे कोर्टांत तारीख १२।९।१९१४ ईसवी रोजीं सकाळचे १० वाजता हजर रहावें. तसें न केल्यास अर्जदार यांस सक्सेशन सर्टिफिकेट दिलें जाईल व मग कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता. ११।८।१४ इ.

R. N. Trivedi.
सीनियर सबजज आकोला
नो. नं. १०

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें
कि० मुकदमा नंबर ६२ सन १९१४ ई.
विद्यमान डि. जज साहेब यांचे कोर्ट
मुकाम आकोला
नांव रामू
बापाचें नांव रंभाजी
जात कुणबी राहणार असलगांव
तहशील जळगांव जिल्हे बुलडाणा
ह्या अल्पवयी तोताराम केशव
उमर वर्ष ८
राहणार असलगांव ता. जळगांव तहशीलीचे (२)
जि० बुलडाणा ......साठीं पालन कर्ता (१)

नेमण्या विषयींच्या अर्जा संबंधीं (३)
सर्वत्र लोकांस यांस
सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) स्वतः व त्याची मालमत्ता साठीं पालन कर्ता [४] नेमण्या विषयीं अर्ज केल्या वरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २ माहे ९ सन १९१४ ई० रोजीं नेमिली आहे, त्यावरून अशी नोटीस देण्यात येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जा संबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांना जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी त्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यात येत आहे कीं, सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज तारीख १२ माहे ८ सन १९१४ ई० रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का
G. W. Bapat
A. D. J.
for
डि. जज आकोला
नो० नं० ११

## नोटीस

विद्यमान सीनीअर सबजज साहेब बहादुर कोर्ट आकोला यांचे कोर्टांत

सक्सेशन सरटीफीकीट नंबर १२ सन १९१४ चौकशीची ता. २१-९ १९१४

अर्ज सक्सेशन सर्टीफीकीट मिळण्या करितां सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं नरहर नारायण देवधर ब्राह्मण रा. अकोला जिल्हा अकोला यांनीं सकसेशन सर्टीफीकीट मिळण्या करितां आमचे कोर्टांत ता० २।७।१९१४ रोजीं अर्ज दिला आहे व याची चौकशीची तारीख २१-९ १९१४ ई॥ ची नेमली आहे तरी ज्याची कांहीं अर्जा विरुद्ध तक्रार असेल त्यांनीं आमचे कोर्टांत तारीख २१-९-१९१४ ईसवी रोजीं सकाळचे १० वाजतां हजर राहावे तसें न केल्यास अर्जदार यास सकसेशन सरटीफीकीट दिलें जाईल व मग कोणतेही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळवें ता० १८।८।१९१४ ई॥

R. N. Trivedi.
सीनीअर सब जज
आकोला
नो नं १२

हें पत्र अकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिव-आश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला— सोमवार तारीख ३१ माहे आगष्ट सन १९१४ इ० [ अंक ३४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचना:— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक | J. G. Ridland.
आकोला ९।९।०९ | एजंट

नो. नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकच्या छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २१ $\frac{3}{8}$ तोळे असतें.

मुंबई बँक | J. G. Ridland.
आकोला २१-९-१० | एजंट

न. नं० २

बंगाली कथानकाचे आधारें लिहीलेलं

## मधुर-मीलन.

लेखक—श्रीयुत, कृष्णानुज—कालेकर.
वाचकांचें मन आनंदानें प्रफुल्लित करणारी अत्यंत चित्तवेधक नवी कादंबरी. कथानक रम्य व उदात्त, भाषा सोपी पण चटकदार. प्रकरणे २४. किं. व्ही. पी. सह आठ आणे. प्रो० हरिहर प्रेस, पुना–सिटी

नो. नं. ३

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ४

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.


Grants L. M. S. (Natl) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 5

## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्स:— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेम्प्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—वैद्रे आणि कंपनी पुणेंसिटी

नो. नं ६

## नोटीस

हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटचा ठराव नं० २८३१ ४२ ता० ८ डिसेंबर सन १८९९ यांतील खालील उतारा सर्व लोकांचे माहिती करितां प्रसिद्ध करण्यांत येत आहे,

### ठराव

| | |
|---|---|
| नागपूर<br>ता० १९ आगष्ट<br>सन १९१४ | ये. ब्लेनर हासट<br>चीफ सेक्रेटरी, निबस्त चीफ,<br>कमिशनर, मध्यप्रांत. |

सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांनीं हिंदुस्थान सरकारचे नजरेस असें आणिलें आहे कीं इंग्लंडांत गेलेले हिंदुस्थानांतील विद्यार्थी किंवा इतर रहिवाशी हे, जेथें पासपोर्ट रहदारी परवाना जवळ असणें इष्ट किंवा जरूर असते अशा परदेशांत प्रवास करितां यावा ह्मणून पासपोर्ट मिळण्यासाठीं अर्ज करितात, व अर्जदार हा ब्रिटिश प्रजा आहे ह्मणून त्यास पासपोर्ट मिळण्याचा हक्क आहे अशाबद्दल पुरावा नसल्यामुळें वारंवार अडचण पडते असें अनेक वेळा घडतें. तसेंच स्वदेशीं परत जाऊं इच्छिणारे निराधार हिंदी लोक व पुरेसा पैसा नसल्यामुळें अभ्यासक्रम पुरा करण्यास असमर्थ असे हिंदी विद्यार्थी यांजकडून साहेब महसूफास मदतीसाठीं वारंवार अर्ज करण्यांत येतात.

२ अशा बाबतींत सेक्रेटरी ऑफ स्टेट यांना समाधानकारक व्यवस्था करितां यावी ह्मणून गव्हर्नर जनरल इन कौंसिल यानीं असें ठरविलें आहे कीं इंग्लंडांत जाणारे विद्यार्थी व इतर हिंदी लोक यांचे मनावर खालील गोष्ट चांगली बिंबविणें अवश्य आहे ती ही – त्यांनीं हिंदुस्थान सोडण्यापूर्वीं, ते ब्रिटिश हिंदुस्थानचे रहिवाशी असतील तर आपले जिल्ह्याचे मुख्य अधिकाऱ्याचे सहीचा प्रेसिडेन्सी टाऊनमध्यें पोलीस कमिशनरचे सहीचा व देशी संस्थानचे रहिवाशी असतील तर पोलिटिकल ऑफिसरचे सहीचा या ठरावास जोडलेल्या नमुन्याप्रमाणें ओळख पटविणारा दाखला ( सर्टिफिकेट ऑफ आयडेंटिटी ) घेऊन ठेवावा हें इष्ट आहे. विद्यार्थ्यांचे बाबतींत हा दाखल्यावर त्या विद्यार्थ्यांचे शेवटचे शाळेच्या अगर मुख्य अधिकाऱ्याची सही घेऊन आणखी जरूर असेल त्याप्रमाणें जिल्हा अधिकाऱ्याची प्रेसिडेन्सी टाऊनमध्यें पोलिस कमिशनरची किंवा पोलिटिकल ऑफिसराची सही घ्यावी.

ओळख पटविणाऱ्या दाखल्या ( सर्टिफिकेट ऑफ आयडेंटिटी ) चा नमुना.

१ अर्जदाराचें नांव ——————
२ बापाचें नांव व जात ——————
३ राहण्याचें ठिकाण ——————
४ अर्जदाराचें वय ——————
५ अर्जदाराचा देश* ——————
६ बापाची [ किंवा पालकाची ) सामाजिक व सांपत्तिक स्थिति ——————
७ हिंदुस्थान कधीं सोडणार याची अंदाजानें तारीख ——————
८ अर्जदाराचा इंग्लंड [ युरोप ) ला जाण्याचा उद्देश ——————

सही ——————
डेप्युटी कमिशनर अथवा पोलिटिकल एजंट अथवा शाळेचा किंवा कॉलेजचा मुख्य अधिकारी +

अर्जदाराची सही ——————
माझे समक्ष सही केली.
डेप्युटी कमिशनर किंवा पोलिटिकल एजंट

* ह्मणजे तो ब्रिटिश मुलुखांत जन्मल्यामुळें किंवा राहिल्यामुळें ब्रिटिश प्रजा आहे किंवा देशी संस्थानची प्रजा आहे.

+ शाळांच्या किंवा कॉलेजाच्या मुख्य अधिकाऱ्याच्या सहीचे सर्टिफिकिटांवर आणखी जिल्हा किंवा पोलिटिकल अधिकाऱ्याची सही घ्यावी

नो० नं० ७

वऱ्हाडसमाचार

मित्ती भाद्रपद शुद्ध ११ शके १८३६

## हिंदूंची नीतिमत्ता

मद्रास येथें मिसेस आनी बिझांट बाईच्या संपादकत्वाखालीं निघूं लागलेल्या कॉमनवील पत्रांत हिंदूंच्या नीतिमत्तेबद्दल वादात्मक पत्रव्यवहार सुरू आहे. हा वाद सुरू होण्याला कारण असें झालें कीं बिन्बीज ॲन्युअल नांवाचें जें एक उत्कृष्ट सचित्र पुस्तक दरसाल मि० बिन्बी हे काढीत असतात त्याच्या चालू सालच्या अंकांत त्यांनीं हिंदुस्थानांतल्या आपल्या प्रवासाच्या अनुभवावरून असें विधान केलें कीं हिंदूंची व नीतिमत्तेची फारशी ओळख दिसून येत नाहीं. मि० बिन्बी हे थिओसोफिस्ट अर्थात् मिसेस बिझांट बाईच्या चेल्यांपैकीं एक आहेत. त्यांच्या पत्रांत अशा प्रकारचें विधान आलेलें पाहून पुष्कळांना आश्चर्य वाटलें, व एकानें तें आश्चर्य कॉमनवील पत्रांत प्रकट केलें. त्यावर ता० १४ आगष्टच्या अंकांत अड्यार येथील मि० जोहान व्हॉन मॅनेन नांवाच्या एका युरोपियनानें मि० बिन्बी यांची बाजू उचलून धरलेलें एक पत्र लिहिलें आहे. आम्हांला वस्तुतः **या वादांत पडण्याचें कारण नाहीं कारण कीं हिं**दुंची नीतिमत्ता आतां खरोखर इतकी जगप्रसिद्ध आहे कीं ती वादाच्या क्षेत्रापलीकडे आहे आणि ख्रिस्ती मिशनरी किंवा इतर युरोपियन यांनीं तिला वादांत ओढण्याचे कितीही प्रयत्न केले तरी ते प्रयत्न खोडसळपणाचे नसले तरी अज्ञान मूलकच ठरावयाचे अशी आमची पक्की खात्री आहे. तथापि मि० जोहान व्हान मॅनेन यांच्या पत्रांत एक गोष्ट नवीन आहे आणि तिचे योग्य उत्तर न मिळाल्यास पुष्कळांचा गैरसमज होण्याचा संभव आहे. तेव्हां तेवढ्या गोष्टीचा उल्लेख आम्हांस कर्तव्य आहे. ती गोष्ट ही कीं —मदुरा वगैरे हिंदुसारख्या मंदिरावर अत्यंत बीभत्स व अश्लील अशा प्रकारचीं चित्रें कोरलेलीं अद्याप आहेत व हिंदुंच्या नीतिभ्रष्टतेचें हें एक प्रमाण आहे. मदुरा, बनारस वगैरे कित्येक ठिकाणीं अशीं बीभत्स चित्रें आहेत ही गोष्ट खोटी नाहीं, पण तीं कोणीं व कोणत्या हेतूनें कोरलीं याचा इतिहास जर लेखकास ठाऊक असता तर त्यानें असें मूर्खपणाचें विधान खास केलें नसतें. एखाद्या शिल्पज्ञाच्या स्टुडिओंत आपालोसारख्याच्या नग्न मूर्ति पाहून त्या शिल्पज्ञाला नीतिभ्रष्ट म्हणणारा जितका मूर्ख ठरेल, तितकाच हिंदुंच्या मंदिरांतल्या या मूर्ति पाहून वरील अनुमान काढणाराची स्थिती होईल. याला कारण हिंदुस्थानच्या इतिहासाविषयींचें त्याचें अज्ञान हें आहे. या मूर्ति मंदिरांत कशा आल्या त्या विषयींची खरी हकीकत अशी आहे कीं आमच्यांतल्या शिल्पज्ञानाचा प्रारंभ संन्यासी संप्रदायापासून झालेला आहे. त्यांनीं शिल्पशास्त्राचें ज्ञान संपादन करून घेतलें व त्यांच्या सूचनेप्रमाणें कारागिरांनीं मंदिरें वगैरे बांधिलीं. येथें भारतीय संन्यासी व पाश्चात्य संन्यासी यांच्यामधला भेद व भारतीय संन्याशांचें विशेषत्व सांगितलें पाहिजे. भारतीय संन्याशांचें ध्येय स्वर्गसुखाची प्राप्ति हें कधींच नव्हतें. जीवन्मुक्तीचा लाभ हें त्यांचें ध्येय होतें पाश्चात्य संन्याशांचें ध्येय स्वर्गसुखाचा लाभ हें होतें. अर्थात् भारतीय संन्याशांनीं आपल्या पुढें जें ध्येय ठेविलें होतें त्याचें साधन म्हणजे इंद्रियसंयमन हें होतें. हें इंद्रियसंयमन करण्याचा एक उपाय म्हणजे विषयभोगाचें स्वरूप जितकें हिडिस करून दाखवितां येईल तितकें करून दाखवून लोकांना त्यापासून परावृत्त करणें हा होता. या उद्देशानेंच त्यांनीं आपल्या देखरेखीखालीं बांधिल्या जाणाऱ्या मंदिरांतून विषयभोगाचें हिडिस स्वरूप दाखविणारीं चित्रें कोरून ठेविलीं. कित्येक पाश्चात्य पंडितांनींही ही गोष्ट कबूल केली आहे. सुप्रसिद्ध फ्रेंच महापंडित ग्यान यांनीं या चरित्रांची अशीच उपपत्ती बसविली आहे. भारतीय संन्याशांनीं सद्धेतुपूर्वक व लोकाना विषयासक्तीपासून पराङ्मुख करण्याकरितां केलेल्या या उपायाचा असा विपर्यास पुढें मागें होईल अशी त्यावेळीं त्यांना कल्पनाही झाली नाहीं. विषयभोगाची लालसा कमी करण्याच्या हेतूनें त्यांनीं केलेला हा उपाय विपरीत परिणामी झाला, व सहर मंदिरांतून पुढें देवदासींचें नृत्य-वगैरे होऊं लागलें, आणि या दोन गोष्टींवरून हिंदूंच्या नीतिभ्रष्टतेविषयीं शंका घेण्याला पाश्चात्यांना आयतें कारण मिळालें. हिंदुमंदिरांतरल्या बीभत्स चित्रांची खरी उपपत्ती अशा रीतीनें झाली आहे. पण आमच्या देशाच्या खऱ्या इतिहासाविषयींच्या ज्ञानाचा अभाव सर्वत्र असल्यामुळें ही उपपत्ति लोकांच्या स्मृतींतून नष्ट होऊन आम्हा हिंदुलोक नीतिभ्रष्ट आहों असा निष्कारण आमचा दुर्लौकिक झाला आहे. हिंदुलोकांचा नुसता राजकीयच नव्हे, तर सामाजिक, शिल्पविषयक, धर्मविषयक, सर्वच प्रकारचा खरा इतिहास जोंपर्यंत प्रसिद्ध होणार नाहीं, तोंपर्यंत आम्हां लोकांविषयींचे असेच भलभलते गैरसमज पसरत जाणार हें आमचें दुर्दैव म्हटलें पाहिजे. अलीकडे आमच्यांतल्या कांहीं थोड्या विद्वानांचें लक्ष ऐतिहासिक शोधाकडे लागलें आहे. तरी तें केवळ राजकीय विषया पुरतेंच मर्यादित आहे. हिंदुंचाधर्म, तत्त्वज्ञान, कला, व्यापार, सामाजिक चाली वगैरे प्रत्येक बाबतींत खरी उपपत्ति लागे तों पर्यंत मि० बिन्बी, किंवा मि० जोहान व्हान मॅनेन यांच्यासारखे सद्धेतुप्रेरित लेखक व कित्येक मिशनरी अज्ञाना मुळें जे भलभलते आरोप आम्हांवर करतील ते सोसून घेण्यापलीकडे आम्हांस गत्यंतर नाहीं. पण खऱ्या जिज्ञासूला हिंदुमंदिरांतल्या अश्लील मूर्तींची उत्पत्ति कळली असता ते तरी भ्रमांत पडणार नाहीं याच केवळ हेतूनें ती आम्ही वर दिली आहे.

## व्हालंटियरच्या परवानगीचा प्रश्न

देशी लोकांच्या राजनिष्ठेविषयींचो इतकी प्रमाणें सध्या बाहेर येत आहेत कीं तिच्या सत्यत्वाविषयींची शंका घेणारा मूर्ख ठरला पाहिजे. संस्थानिक आपले खजिने, सैन्यें, किंबहुना सर्वस्व ब्रिटिश सरकारास अर्पण करण्यास तयार झाले आहेत. वकील, ब्यारिस्टर वगैरे लोक व्हालंटियर होऊन लढाईवर जाण्यास सिद्ध आहेत. डाक्तर वगैरे मंडळी जखमी झालेल्यांची शुश्रुषा करण्यासाठीं जाण्यास एका पायावर तयार आहेत. या सर्वांच्या प्रार्थना ऐकून व्हाइसराय साहेब त्यांचे आभार मानीत आहेत व प्रसंग पडेल तेव्हा तुमचा उपयोग करून घेऊं अशीं आश्वासनें देत आहेत. पण व्हालंटियर होऊं इच्छिणारांना मात्र असें आश्वासन अद्याप मिळत नाहीं हें आश्चर्य नव्हे काय? देशी लोकांची राजनिष्ठा खरी अंतःकरणपूर्वक आहे असें कबूल करावयाचें, आणि ती राजनिष्ठा कृतीनें दाखविण्याची संधी मात्र त्याना द्यावयाची नाहीं हें आमच्या सरकारचें वर्तन खरोखर आम्हा राजनिष्ठ प्रजेच्या मनाला अत्यंत दुःख देणारें आहे. देशी लोकांना सैन्यात व्हालंटियर होण्यास परवानगी देण्याचा प्रश्न १८८६ सालापासून सरकारपुढें आहे.

## जर्मनीच्या नाशाविषयींचें भविष्य

१९१४ सालीं जर्मनसत्तेचा नाश होणार असें भविष्य तेराव्या शतकांत हरमन नावाच्या एका जर्मन साधूनें करून ठेविलें होतें व तें खरें होऊ पहात आहे असें एका इंग्रजी पत्रात प्रसिद्ध झालें आहे. या साधूनें आणखी कांहीं भविष्यें केलीं होतीं व तीं सगळीं खरीं झालीं असें म्हणतात. जेना येथें जर्मनीचा पराभव होईल व १९१४ सालीं जर्मन फेडरेशन होईल हीं भविष्यें खरीं झालीं. त्याचप्रमाणें पहिले विल्यम बादशहा १८४८ सालीं प्रशियाचे गादीवर बसतील. १८७१ सालीं जर्मन साम्राज्य स्थापिलें जाईल. १८८८ सालीं बादशहाचा मृत्यु होईल व १९१४ सालीं जर्मन सत्ता नष्ट होईल अशीं भाविष्यें दुसऱ्याही एका साधूनें पहिले विल्यम बादशहा यांजपाशीं केलीं होतीं. पैकीं शेवटचीं खेरीज करून बाकीचीं सगळीं तंतोतंत जुळलीं आहेत, तेव्हां हें शेवटचेंही बहुधा चुकणार नाहीं असें अनुमान करणें चुकीचें होणार नाहीं. आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं हें भाविष्य जर्मनीच्या बादशहाच्या राज्य विस्ताराच्या तृष्णेवरून किंवा त्यांच्या उद्दाम वर्तनावरून हल्लींच्या काळच्या एखाद्या कुडबुड्या जोशानें केलेलें नसून वैराग्यवृत्ति धारण करून मठांत राहिलेल्या व अत्यंत निस्पृह अशा एका साधूनें सहाशें वर्षें आगाऊ करून ठेविलेलें आहे, आणि त्यांत दुसरे विल्यम बादशहा हे हो एनझोलर्न घराण्यांतले शेवटचेच बादशहा होतील असें स्पष्टपणें लाटिन भाषेंत लिहिलेल्या पद्यात्मक ग्रंथात त्या साधूनें लिहून ठेविलें आहे! यांतलें कितीं अनुभवास येतें तें पहावें.

## दुभत्या गाई म्हशी

मागील अंकावरून पुढें चालूं

आतां या सर्व जनावरांना चाऱ्याची चांगली सोय झाली पाहिजे पूर्वीं पडीत जंगल पुष्कळ होते तितकें आतां राहिलें नाहीं तें कमी झालें आहे हें खालील आंकड्यावरून कळेलः—

| | १९०२-३ | १९०६-७ | १९११-१२ |
|---|---|---|---|
| १ फॉरेस्ट | ६७१६२६९८ | ८१,७४८,१९८ | ८०,८५१,३६९ |
| २ वाहितीस योग्य जमीन | १०८,०६२,४३७ | १०६,६९५,५८० | ११४,७००,२७० |
| ३ चराईचें रान | ३७,२५२,५५२ | ३२,९३५,४२१ | ५४,९८२,३२४ |
| ४ वाहित जमीन | २०५,२२९,६५० | २१४,०२२,६९६ | २१५,२८२,६८१ |
| ५ वहितीस देता येत नाहीं अशी जमीन | १३५,७८७,५७६ | १२७,११४,२४९ | १४०,६०५,१७९ |
| ६ पिका खालील जमीन | २०६,२४९,३१० | २१४,०२५,९६६ | २१५,९८१,६८३ |

यावरून सहज लक्षांत येईल. जंगल खात्यांत जास्तवाढ झाली आहे. त्यामध्यें पूर्वीप्रमाणें सर्व जंगलांत कांहीं फी घेऊन जनावरें चरण्याची मंजुरी असे. परंतु अलीकडे जंगलाचे विभाग बांधले आहेत. दरवर्षीं कांहीं भाग चराईसाठीं खुले करतात. हल्लीं वनचराईच्या दरांत दोन भेद केले आहेत. एक शेतकरी लोकांची शेतींत चरणारी मोफत जनावरें व व्यापारी दरानें कर देऊन चरणारीं जनावरें. हे दर माफक असावेत. अशी विनंती सरकारांत करावी.

नागपुर प्रांतांतील जमीन.

| वर्ष | फॉरेस्ट १ | वाहितीस न देण्यासारखी २ | वाहितीस योग्य ३ | चराई रान ४ |
|---|---|---|---|---|
| १९०७-८ | १९,९४१,२८३ | ४,२०३,८९५ | १३,७३३,०६० | ३,४६८,७८५ |
| १९०८-९ | १९,९२७,१४१ | ४,३११,९२१ | १३,६२८,५०४ | ३,०६०,८७४ |
| १९०९-१० | १९,०८७,१६१ | ४,०८५,८७६ | १३,७२०,१८४ | २,१८४,५०२ |
| १९१०-११ | १९,१२९,२८६ | ४,०९२,२९७ | १३,७१०,३२४ | २,२८४,६२५ |
| १९११-१२ | १९,०९५,१५२ | ४,०९१,३०१ | १३,५६०,८२१ | २,२२८,९५० |

पिकाखालील जमीन

| | |
|---|---|
| १९०७-८ | ५३,२३२,६९५ |
| १९०८-९ | ५३,२३२,४९४ |
| १९०९-१० | ५२,८६०,५४८ |

| | |
|---|---|
| १९१०-११ | ९२,९९८,३७२ |
| १९११-१२ | ९२,९४९,६१० |

याच प्रमाणें नागपूर प्रांतांतील गाई म्हशी वगैरे.

| वर्ष | बैल | गाई | म्हशी | रेडया | बकऱ्या |
|---|---|---|---|---|---|
| १९०७-८ | ३,१००,००८ | २,६६७,७५४ | ६०९,९८४ | ३१७,९५७ | १,६३१,६१२ |
| १९०८-९ | २,९६६,४८० | २,४६९,४८८ | ५७५,१५२ | ३१५,४८७ | १,०३५,८९४ |
| १९०९-१० | ३,०३३,९६६ | २,५०५,३०३ | ५८५,०८८ | २५०,८३४ | १,३११,७५२ |
| १९१०-११ | ३,१०१,५०१ | २,५७८,०३६ | ६११,९२३ | ३३५,४३५ | १,०७०,१३३ |
| १९११-१२ | ३,१७१,३०२ | २,५७२,४१२ | ६२९,८२० | ३३९,०१७ | १,०१२,१८९ |

या आंकड्यावरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

मानवी प्राण्यास खरोखर दूध तूप पुष्कळ खाण्यास मिळालें तर शरीरप्रकृती चांगली मजबूत राहते. वाटेल तशी कठीण, कष्टाचीं कामें करण्यास ताकद मुख्य पाहिजे. ती मानवी प्राण्यास प्राप्त होण्यास मुख्य साधनां पैकीं हें एक आहे. याकरितां उभत्या गाई म्हशी पुष्कळ वाढल्या पाहिजेत. ती वाढण्याची तजवीज येणें प्रमाणें:—

१ गोरक्षण संस्था वाढल्या पाहिजेत.

२ कांहीं लोकांपाशीं जमीनी आहेत त्यांनीं कांहीं जमीन चराईसाठीं ठेवून गाई म्हशी बाळगाव्यात

३ गोरक्षण संस्थांनीं खासगी पाळणाऱ्या संभावित लोकांना संरक्षणासाठीं गाई म्हशी द्याव्यात.

४ गाई म्हशींची जोपासना चांगली ठेवावी औषध पाण्याची तजवीज करावी.

५ सरकारांना वनचराईचे दर माफक ठेवण्याबद्दल विनंती करावी.

६ सरकारांना कसायांस गाई मारल्या न जाव्यात म्हणून विनंती अर्ज सर्वांनीं करावेत.

७ पतपेढ्यांच्या तत्वावर संस्था स्थापन करून गाई म्हशींची चांगली निपज वाढ होण्याची तजवीज व्हावी.

अशाबद्दल मुंबई इलाख्यांत खटपट चालू झाली आहे अशाबद्दल उल्लेख "कॉटरली डेयरींग" पुस्तकांत केला आहे असें ऐकिलें आहे.

शेतकी खात्याकडून कांहीं भागांत गाई बैलांची निपज चांगली होण्याची खटपट होणार आहे असें ऐकिवांत आहे.

हल्लीं तुपांत अनेक प्रकारची भेसळ होते. त्यामुळें खाणाऱ्यांच्या शरीरावर परिणाम होऊन राहिले आहेत. तरुण मंडळीवर क्षयाचे वगैरे अनेक दुर्धर रोगांचे परिणाम होऊं लागले आहेत. अशा विषयीं हिंदुस्थान सरकाराकडून कालेजांतील तरुणाबद्दल चौकशी होऊन गेली आहे. सर्व लोकांनीं या बाबतींत लक्ष्य घातलें पाहिजे. ते घालतील अशी पूर्ण उमेद आहे.

## विद्यार्थी आणि नाटकें

कलकत्ता युनिव्हर्सिटीनें आपल्यां ताब्यांतल्यां कॉलेजांच्या व हायस्कुलांच्या अध्यापकांना सर्क्युलर काढून तुमच्या शिक्षणसंस्थेंत विद्यार्थी दरसाल किती नाटकें करतात, तीं नाटकें कशा प्रकारचीं असतात, नाटकांतील पात्रांचे अभिनय कसे होतात, व अभिनय करणारे विद्यार्थी कोणकोणत्या वर्गांतले असतात वगैरे माहिती विचारली आहे असें ऐकतों. ही माहिती विचारण्याचें कारण विद्यार्थी नाटकांचे प्रयोग करण्यांत आपला आयुष्याचा बराच काळ व्यर्थ खर्च करतात, व अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात, असा बराच बोभाटा झाला आहे हें आहे. बंगालच्या विद्यार्थीसंबंधानें हा बोभाटा कितपत साधार किंवा निराधार आहे हें आम्हांस माहीत नाहीं पण पुणें मुंबईकडे कालेजांतल्या व हायस्कुलांतल्या मुलांना स्वतः नाटक प्रयोग करण्याचें व नाटकें पाहण्याचा नाद बऱ्याच मोठ्या प्रमाणांत जडलेला आहे हें आम्ही खात्रीनें सांगूं शकतों. संमेलन व बक्षीस समारंभ या प्रसंगीं नाटकाचे प्रयोग करून दाखविण्यासाठीं अगोदर दोन दोन महिने तयारी चाललेली असते व या तयारीच्या काळांत विद्यार्थ्यांचें लक्ष अभ्यासाकडे लागत नाहीं हें माहित असून कित्येक प्रोफेसर व शिक्षक त्या गोष्टीला उत्तेजन देत असतात. बरें, ज्या नाटकाचें प्रयोग विद्यार्थ्यांकडून करविण्यांत येतात तीं सर्व नाटकें आक्षेपार्ह नाहींत येवढें पाहण्याचीकडे शिक्षणसंस्थेचे अधिकारी फारशी चिकित्सा करीत असलेले दिसत नाहींत. प्रेम विषयक, सदाभिरुचिविन्मुख किंबहुना कुरुचिप्रवर्तक अशीं नाटकें व प्रहसनें विद्यार्थ्यांकडून बसविण्यांत आलेलीं आहेत ही गोष्ट उदाहरणें देऊन दाखवितां येईल. बंगालमध्येंही असाच प्रकार असावा असें कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या सर्क्युलरावरून दिसतें. येथें विद्यार्थ्यांनीं नाटकें करावीं कीं करूं नयेत, आणि करणें झाल्यास कोणत्या प्रकारचीं करावीं, असे प्रश्न साहाजिकच उपस्थित होतात. विद्यार्थ्यांनीं नाटकप्रयोग करण्यांत, त्यांचा काळ, उत्साह, व आरोग्य यांचा नाश होतो, शिवाय पोषाख, सीनसीनेरी वगैरे गोष्टींच्या पायीं द्रव्यनाशही होतो. पण या शिवाय अधिक शोचनीय गोष्ट ही कीं त्या वयांत त्यांनीं उत्तम विचार, व उत्तम पुरुष यांचा समागम करून घ्यावयाचा, त्या वयांत अभिनय शिकण्यासाठीं त्यांना धंदेवाईक व्यसनी, आणि समाजांत निकृष्ट प्रतीचे स्थानीं असणाऱ्या नाटकवाल्यामंडळीची खुशामत करून त्यांची संगति धरावी लागते. इंदुप्रकाशासारखीं आमच्यांतलीं सन्मान्य म्हणून आजपर्यंत गणलीं गेलेलीं पत्रें सुद्धा नाटकमंडळीची खुशामत करतांना व त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांत कालमचे कालम खर्ची घालतांना आढळतात, पण तसें करण्यांत त्या पत्राच्या मालकाची व्यापारी फायद्याची दृष्टि असते. ते जाहिरातींच्या पैशाच्या लोभांत पडून आपली सन्मान्यता घालविण्यास तयार होतात कीं दुसरा काहीं हेतु त्यांना साधावयाचा असतो याची मीमांसा आम्ही करीत नाहीं, पण विद्यार्थ्यांना तरी निदान नाटक मंडळीच्या खुशामती किंवा संगति यापासून नैतिक अधःपाताखेरीज अन्य कांहीं प्राप्ति होत असेल असें आम्हांस वाटत नाहीं. अशा अधःपाताला नेऊन सोडणाऱ्या नादापासून आपल्या मुलांनीं अलिप्त राहावें या विषयीं खबरदारी घेणें हें वस्तुतः विद्यार्थ्यांच्या पालकांचें कर्तव्य आहे. पण ते तर मुलांच्या शिक्षणा संबंधानें व वर्तनासंबंधानें पूर्णपणें निष्काळजीपणा दाखवीत असतात. मुलाला महिन्याचे आरंभीं पंचवीस तीस रुपये किंवा जो कांहीं खर्च लागेल त्याची मनीआर्डर पाठविली कीं आपण आपलें कर्तव्य केलें अशी त्यांची समजूत ! या समजुतीच्या पायींच आमची तरुण पिढी बहकत चालली आहे, आणि नाटकाच्या नादांत पूर्णपणें फसून आपल्या बहुमोल आयुष्याचा व नैतिक आचरणाचा होम करीत आहे. हें त्यांच्या लक्षांत अद्याप येत नाहीं हें आश्चर्य आहे. कलकत्ता युनिव्हर्सिटीनें जें हें सर्क्युलर काढलें आहे तें कोणाच्या ही सूचनेवरून असो, पण विद्यार्थ्यांच्या अनियंत्रित व स्वच्छंदी वर्तनाला आळा घालण्यासारखे कांहीं नियम घडवून आणण्यास जर तें कारण होईल तर विद्यार्थ्यांचे पालकांवर त्या युनिव्हर्सिटीचे मोठेंच उपकार होतील. शिक्षणखात्याचे अधिकारी व इतर युनिव्हर्सिट्या यांनीं या बाबतींत कलकत्ता युनिव्हर्सिटीचा अवश्य कित्ता घ्यावा.

## हिंदुस्थानच्या पैशानें इंग्लंडास ज्ञानलाभ

सर ओरेल स्टाइन यांनीं मध्य एशियांत दीर्घ काळपर्यंत भ्रमण करून अनेक प्रकारची माहिती, चित्रें, मूर्ति वगैरेंचा संग्रह केलेला आहे, व त्यावरून असें सप्रमाण सिद्ध केलें आहे कीं प्राचीन काळीं भारतीय सुधारणेचें क्षेत्र फार विस्तृत होतें. स्टाइन साहेबाच्या प्रवासाचा सगळा खर्च हिंदुस्थानच्या तिजोरींतून देण्यांत आलेला आहे असें कळतें. परंतु त्यांनीं महत्प्रयासानें मिळविलेला अमूल्य वस्तुसंग्रह विलायतेंतल्या ब्रिटिश म्युझियमला भूषित करीत आहे! या संग्रहाच्या व्यवस्थेचें काम डॉ॰ डेनिसन रॉस यांजकडेस देण्यांत आलें आहे. या रॉस साहेबांचाही पगार हिंदुस्थानच्या तिजोरींतूनच देण्यांत येतो अशी आमची सूचना आहे. कारण कीं त्यापासून विद्यादानाचें पूर्ण फळ हिंदुस्थानच्या पदरीं पडणार नाहीं. हिंदुस्थानच्या इतिहासाचें साहित्य अशा रीतीनें विलायतेंत जितकें जमलेलें आहे त्याच्या चतुर्थांश तरी खुद्द हिंदुस्थानांत असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. अजंठ्याचीं लेणीं येथून काढून विलायतेंत नेतां येत नाहींत, तेव्हां त्या लेण्यांचे मोठाले चित्रपट काढून तिकडे नेले आहेत. कालांतरानें इकडचीं मूळ लेणीं नष्ट झालीं तरी विलायतच्या लोकांना या चित्रपटापासून ज्ञानप्राप्ती अनायासें करून घेतां येईल. असो, आमच्या संग्रहीं असलेल्या मूळ वस्तूंचा आम्हांस लाभ करून घेतां आला नाहीं, तरी निदान इंग्लंडच्या लोकांना तरी ज्ञानप्राप्ती करून दिल्याचें पुण्य भारतवर्षीयांचे पदरीं खास पडेल यांतच त्यांनीं समाधान मानून घ्यावें.

## भूतदयाविशिष्ट स्वयंसेवक

सांप्रतच्या युद्धांत हिंदुस्थानच्या लोकांनीं जागोजाग सभा भरवून राजनिष्ठा व ब्रिटिश सरकारला साह्य करण्याविषयींची तत्परता दाखविली तिच्या सत्यत्वाविषयीं अँग्लो-इंडियन पत्रांनींसुद्धां शंका घेतली नाहीं हें आमचें महद्भाग्य म्हटलें पाहिजे. हिंदुस्थानच्या लोकांना व्हालंटियर होण्याची मोकळीक सरकारनें ठेविली असती तर या युद्धाच्या प्रसंगीं तीस कोटी प्रजेंतून कमींतकमी पंचवीस लक्ष व्हालंटियरचें सैन्य तरी सरकारास आयतें मिळालें असतें असा विचार अशावेळीं कोणाच्याही मनांत येणें साहाजिक आहे, आणि म्हणून अजून तरी सरकारनें कृपाळु होऊन हिंदुस्थानच्या राजनिष्ठ प्रजेला तो हक्क द्यावा असें सुचविण्यांत आलें होतें. पण मि॰ गांधी यांच्या पत्रास लॉर्ड क्रू यांनीं जो जबाब दिला आहे त्यावरून ब्रिटिश साम्राज्याच्या बाबतीनें हातीं शस्त्र धरून त्या राज्याचें संरक्षण करण्याचें श्रेय भारतीयांच्या पदरीं पडण्याइतकें त्यांचें भाग्य उदयाला आलें नाहीं असें म्हणणें भाग आहे. लॉर्ड क्रू म्हणतात कीं व्हालंटियर होऊन सैन्यांत नोकरी देण्यापेक्षां लढाईंत जखमी झालेल्या शिपायांची शुश्रूषा करण्याचें अधिक श्रेयस्कर कार्य करण्यास भारतीयांनीं पुढें सरसावें. ब्रिटिश साम्राज्याविषयीं पूर्णपणें राजनिष्ठ असलेले भारतीय सांप्रतच्या युद्धांत आपलें तन मन धन ब्रिटिश बादशहाचे चरणीं अर्पण करण्यास तयार झाले आहेत. तेव्हां ते लॉर्ड क्रू यांच्या सूचनेस पूर्ण मान देतील यांत शंका नाहीं. मि॰ गांधीसारख्या देशभक्तांनीं बोअर युद्धाच्यावेळीं भूतदयेनें प्रेरित होऊन जखमी झालेल्या शिपायांची शुश्रूषा करण्याचें कार्य उत्कृष्टप्रकारें बजावलें होतेंच, तसें याही प्रसंगीं ते व त्यांचे इतर बांधव सरकारनें नेमून दिलेलें काम हूं का चूं न करतां मुकाट्यानें करतील यांत शंका नाहीं. बंगालमध्यें असे स्वयंसेवक नोंदण्यास सुरुवातही झाली आहे व अनेक ब्यारिस्टर, डाक्तर, व प्रोफेसर हें काम पतकरण्यास सिद्ध होत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. सध्याची वेळ अशीच आहे कीं यावेळीं मी अमुकच काम करीन व तें अमक्या शर्तींवर करीन असें कोणी ही सुज्ञ मनुष्य म्हणणार नाहीं, त्यांतून हिंदुस्थानचे लोक तर असा हट्ट कधींच घेऊन बसणार नाहींत, पण त्यांची ही अढळ राजनिष्ठा व कर्तव्यतत्परता पाहून त्यांना व्हालंटियर होण्याची परवानगी देण्यास ब्रिटिश सरकारनें विलंब लावूं नये अशी आमची त्यांना सविनय प्रार्थना आहे. हा विलंब हिंदुस्थानच्या लोकांचा

उत्साहभंग व निराशा करण्यास कारण होईल अशी भीती वाटते. आमच्या देशबांधवांनीही हें ध्यानांत ठेवावें कीं लॉर्ड क्रुसाहेबांनीं त्यांना नेमून दिलेलें काम शिपाईगिरीपेक्षां अधिक थोरपणाचें आहे. शत्रुकडचीं कां होईना पण माणसें मारण्या किंवा घायाळ करण्यापेक्षां जखमी झालेल्यांची शुश्रूषा करणें हें काम ईश्वरास ही अधिक प्रिय होण्यासारखें आहे व तें जर आमच्या देशबांधवांनीं उत्तम प्रकारें केलें, तर त्यांचे मनोरथ ब्रिटिश सरकारा कडून पूर्ण करविण्याचे कामीं परमेश्वर त्यांना साह्य केल्यावांचून कधीं राहणार नाहीं.

## तामिल भाषेची सद्यःस्थिति.

मद्रासच्या पाछप्पा कॉलेजांत मि० टी. वेलकसवरया यांनीं आपल्या भाषणांत तामिळ भाषेच्या सद्यःस्थितीचें जें वर्णन केलें त्यांत जर अतिशयोक्ति नसेल तर त्या भाषेचा हेवा कोणत्या देशी भाषेला वाटणार नाहीं? ते ह्मणाले—तामिळ भाषेची भवितव्यता माझ्या मतें फार उज्ज्वल आहे. तिला सध्या युनिव्हर्सिटीच्या मदतीची बिलकुल अपेक्षा नाहीं. इतकेंच नाहीं, तर तामिळ भाषेची पिछेहाट करण्याचें जरी युनिव्हर्सिटीनें मनांत आणिलें, तरी त्या भाषेच्या उत्कर्षाच्या मार्गांत तिच्यानें यत्किंचित् ही विघ्न करवणार नाहीं. युनिव्हर्सिटीनें त्या भाषेकडे आजपर्यंत पूर्ण दुर्लक्ष केलें तरी तिच्या उत्कर्षांत कमतरता आलेली नाहीं. आणखी पंनास वर्षांनीं तर या उत्कर्षाचें पाऊल पुष्कळच पुढें पडलेलें दिसेल.

## आकृति लहान, पण छाती जबर !

असेच उद्गार बेलजमच्या लोकांविषयीं आज साऱ्या जगांतल्या लोकांच्या तोंडून निघत आहेत. जर्मनीच्या मनातून आपली फौज फ्रान्समध्यें नेण्याचें आलें, तेव्हा वाटेंत असलेल्या बेलज्यममधून जाण्यास परवानगी विचारण्याचें सुद्धा कारण नाहीं, आपल्यापुढें नाहीं ह्मणण्याची बेलज्यमची काय छाती होणार आहे असें जर्मनच्या केसरास वाटलें असावें. पण अनुभव कसा उलट आला आहे तें आतां जर्मनीलाच विचारावें. लिजचे किल्ले आपण चार घटकेंत घेऊं तेथें आज लक्षावधि जर्मन सैन्य आज तीम आठवडे जंगजंग पछाडीत आहे, पण काहीं इलाज चालत नाहीं हें पाहून जर्मनीचें तोंड उतरलें असलें पाहिजे. बेलज्यमची राजधानी ब्रुसेल्स ही बंदोबस्ताची जागा नाहींसें पाहून बेलज्यम लोक तें शहर सोडून गेल्यावर जर्मन लोकांनीं तें हस्तगत केल्याचें आश्चर्य नाहीं. आतां जर्मन लोकांचा रोख लीजपेक्षांही बळकट अशा नामुर नांवाच्या किल्ल्यावर आहे. लीजनें तीन चार आठवडे जर्मन सैन्याला खेळविलें, तेव्हां नामुर दोन महिने तरी निदान दाद देणार नाहीं असा संभव दिसतो. तोंपर्यंत फ्रेंच लोकांना आपली सैन्याची तयारी व किल्ल्यांची मजबुती करण्याला आयताच वेळ मिळाला. या युद्धांत बेलज्यमनें दाखविलेलें शौर्य इतिहासांत चिरकाल त्याची कीर्ति ठेवण्यासारखें झालें यांत शंका नाहीं.

## ब्रिटिश राष्ट्राचा एक मोठा गुण.

युद्धप्रसंग ह्मणजे भयंकर तर खराच, पण राष्ट्राच्या अंगचे अननुभूत गुण प्रकट करण्यास तो कसा कारणीभूत होतो याचें उत्कृष्ट उदाहरण गेल्या आठवड्यात ब्रिटिश फौज फ्रान्समध्यें उतरली त्यावेळीं दिसून आलें. लक्षावधि सैन्य इंग्लिश खाडींतून पार न्यावयास केवढी तयारी अगोदर करावी लागली असेल, आणि किती लोकांच्या कानीं ती बातमी गेली असेल; नुसतीं शिपायांनीं जहाजें भरून पाठविण्याचें काम दहा दिवस अहोरात्र चाललें होतें, पण सैन्य रवाना होत आहे ही बातमी दहा दिवसपर्यंत कानाकोपऱ्याला कळली नाहीं! जर एखाद्या निमकहराम इंग्रजानें द्रव्याच्या लोभानें ही बातमी जर्मनीला कळविली असती आणि जर्मनीनें विमानांतून बांब टाकले असते तर हजारो इंग्रजांचा एका क्षणांत फडशा उडाला असता. पण इंग्लंडांत हजारों वर्तमानपत्रें असता व खुद्द जर्मनीचे गुप्त हेर असतां येवढी मोठी गोष्ट लपून राहावी ही गोष्ट इंग्रजांच्या अपूर्व देशभक्ती विषयींच्या, एकीविषयींच्या आणि सुव्यवस्थितपणाच्या लौकिकांत निःसंशय भर टाकणारी झाली आहे. एखादी गोष्ट षट्कर्णी होणें ह्मणजे ती फुटणें अशी आमच्यात ह्मण आहे. ह्मणीवरून लोकांचे स्वभावाची परीक्षा होते ह्मणतात. हें खरें असेल तर आमच्यात दोन माणसांच्या पलीकडे कोणतीही गोष्ट गुप्त राहूं शकणें अशक्य आहे असें ह्मटलें पाहिजे. पण इंग्लंडांत इतके मतभेद आणि वर्तमानपत्रांच्या बातमीदारांचा इतका सुकाळ असतां लक्षावधि माणसांकडून ही या गुप्त गोष्टीचा स्फोट झाला नाहीं, यावरूनच इंग्रजांच्या अंगच्या एका उच्च गुणाचा परिचय कोणासही करून घेतां येण्यासारखा आहे. पेशवाईंत बारभाईचें कारस्थान खेरीज करून अशीं महत्वाचीं राजकारणें इतके दिवस गुप्त राहिल्याचें दुसरें उदाहरण नाहीं. धन्य त्या इंग्रज लोकांच्या देशभक्तीची!

## इंपीरियल रिलीफ फंड.

प्रस्तुतच्या युद्धांत हजारों प्राणांची हानि व्हावयाची, त्यापेक्षांही ज्यास्त कदाचित् जखमी व्हावयाचे, व त्यांच्या मुलाबाळांचे व आश्रितांचे अवर्णनीय हाल व्हावयाचे या गोष्टी करण्यास मोठेंसें भविष्यज्ञान लागतें असें नाहीं. पण पुढें येणाऱ्या संकटाचें निवारण करण्याची तरतूद अगोदरपासून लावून ठेवणें यालाच शहाणपण ह्मणतात. आपले लोकप्रिय व्हाइसराय ना० लॉर्ड हार्डिंज साहेब हे पुढें येणारें हें संकट हलकें करण्यासाठीं इंपीरियल रिलीफ फंड नांवाचा एक द्रव्यनिधि जमा करीत आहेत ही संतोषाची गोष्ट आहे. त्यासाठीं त्यांनीं लोकांच्या सदय मनोवृत्तीवर विशेष भिस्त ठेवून असें ह्मटलें आहे कीं या फंडात जमा होणाऱ्या द्रव्याचा विनियोग विशेषतः हिंदुस्थानांतून या लढाईवर जाऊन हानि पावलेल्या शिपायांच्या कुटुंबांच्या दुःखनिवारणाकडे करण्यांत येईल. ह्मणजे या फंडाच्या उद्देशांत भूतदया आणि बंधुप्रेम या दोन्ही उच्च मनोवृत्तींचें मिश्रण आहे. आणि तें हिंदुस्थानच्या कोमल व सदय अंतःकरणास जोरानें जागृत केल्यावांचून राहणार नाहीं, अशी आमची मनोदेवता सांगते. सध्याच्या प्रसंगीं लोकांचें कर्तव्य काय आहे याविषयीं हृदयंगम व्याख्यान देण्याचें जसें कारण नाहीं, तसें भावी स्थितीचें भपकेदार रंगांत चित्र काढून लोकांच्या मनांत भीती उत्पन्न करून ठेवण्याचेंही पण कारण दिसत नाहीं. कारण सध्याच्या युद्धापासून हिंदुस्थानला भीती असो अगर नसो, हें भूतदयेचें कार्य आहे येवढी गोष्ट हिंदुस्थानच्या कोमल मनोवृत्ति जागृत करण्यास पुरे आहे. मागचा अनुभवही तसाच आहे. पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही हानि होवो, विश्वबंधुत्वाचें नातें हिंदुस्थानच्या लोकाना द्रव्यसाह्य करण्यास प्रेरणा करतेंच. तेव्हां प्रस्तुत प्रसंगींही हें साह्य भरपूर मिळेल अशी आशा केल्यास ती निष्फळ होणार नाहीं अशी आमची खात्री आहे.

## युद्धाचा रंग

सध्याच्या युद्धाचा बाहुप्रसार दिवसें दिवस वाढतच चालला आहे. मूळ आरंभ आस्ट्रिया आणि सर्व्हिया यांच्या भांडणापासून झाला. पुढें फ्रान्स, जर्मनी व रशिया हीं राष्ट्रें त्यांत मिळालीं. नंतर बेलज्यम मधून जर्मन सैन्य जाण्याचा प्रयत्न करूं लागलें तेव्हां बेलज्यमला पडावें लागलें; त्यानंतर इंग्लंड या सत्रांत शिरलें. आतां जपानला ही त्यात पडावें लागलें आहे आणि एक दोन दिवसांतच इटली ही इंग्लंडच्या पक्षाला येऊन मिळाल्याची खबर येईल असा बहुतेक संभव आहे. जर्मनीनें आरंभापासून या युद्धात खोडसाळपणा आरंभिला आहे, तोच अखेर त्याच्या नाशाला कारण होणार असा रंग दिसत आहे. त्याला एका बाजूनें रशिया, व दुसऱ्या बाजूनें— बेलज्यम, इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांशीं लढावें लागणार आहे. जर्मनीची युद्धाची तयारी केवढीही जंगी असली तरी एकाचवेळीं पांच चार महान राष्ट्रांशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं खास नाहीं. अशावेळीं पूर्वेकडे जपानशीं तरी त्यानें शत्रुत्व करावयास नको होतें पण जपानच्या मागण्या जर्मनीनें कबूल केल्या असत्या, तर जर्मन बादशहाच्या स्वभावाला तें अनुचित दिसलें असतें व बर्लिन शहरांत बादशहानें लोकांत क्षोभ उत्पन्न केला असता. तें टाळण्यासाठीं जर्मन बादशहानें जपानच्या पत्राविषयीं अनादर दाखविला याचा परिणाम असा झाला कीं गेल्या सोमवारीं जपानी बादशहानें जाहिरनामा काढून जर्मनीशी आपलें वैर प्रकट केलें. अशा रीतीनें या युरोप खंडांतल्या वणव्याची ठिणगी पूर्वेकडे येऊन पोचली आहे. जपान व जर्मनी यांच्यांतलें हें युद्ध आतां लवकरच रंगाला येईल. जपाननें रशियाला हार खाण्यास लाविली, पण जर्मनीसारख्या प्रबळ राष्ट्रापुढें त्याची मात्रा चालावयाची नाहीं असें हसो जपानी युद्धाचे वेळीं काहीं युरोपियन ह्मणत होते. त्याचें हें ह्मणणें खरें होतें कीं सूर्योदयाचें राष्ट्र जपानीसत्तेचा पूर्वेकडे तरी निदान पूर्ण अस्त करून टाकण्याइतकें आपलें सामर्थ्य जगाच्या निदर्शनास आणून देतें तें पाहावें.

## कापूर

अलाहाबादच्या पायोनियर पत्रावरून कळतें कीं सीलोन बेटांत कापराच्या झाडांची लागवड जोरानें सुरू आहे. कारण दिवसें दिवस कापराला भाव चांगला येत आहे. त्या बेटाची जमीन कापराच्या लागवडीला अनुकूळ आहे. या झाडाच्या लागवडीला १५०० पासून ८०००फूट उंचीची जमीन लागते. तशी जमीन सीलोनमध्यें आहे. असा अंदाज आहे कीं लवकरच दरसाल ८० लक्ष पौंड कापूर सीलोनमध्यें पैदा होईल. सध्यां जपान व अमेरिका येथून साऱ्या जगाला कापराचा पुरवठा होत आहे. या पुरवठ्यांत सीलोन भागीदार झाल्यास हिंदुस्थानच्या मूर्तिपूजकाना आरतीच्या वेळीं परदेशी माल वापरवा लागणार नाहीं. कारण, सिलोन हा हिंदुस्थानचाच एक भाग समजला जाण्याइतकें प्राचीन काळापासून त्याचाशीं हिंदुस्थानाचें दळणवळण आहे. सीलोनी कापूर अमेरिकन कापराहून स्वस्त ही पडेल. कारण त्या बेटांत जमीन स्वस्त व मजुरीचे दर ही हलके आहेत.

## खुनी खटला

इंदोर ता० मंगळवार पेठ येथें ता० ३-४-१४ रोजीं विठू नांवाच्या कुणब्यानें सत्यनारायण केला तेव्हां रात्रीं जेवणाच्या वेळीं ३०।४० मंडळी प्रसादाला होती. त्यात मारुती खंडू कुणबी हाही एक होता. जेवण चालूं असतांना या मारुतीला ३।४ भजीं वाढण्यांत आलीं. तीं खातांच त्यास कसेंतेंच झालें. त्यानें ओकून काढण्याचा प्रयत्न केला पण त्याची जीभ आंत आंत ओढत चालली आणि मध्यरात्रींच्या समयाला तो मरण पावला. मारुती भजीं खाण्यापूर्वीं चांगला सदृढ निरोगी व धट्टाकट्टा होता. सकाळीं त्याचें प्रेत पुरण्यांत आलें. तथापि त्याची बहीण मुक्ती व बायको विठी यांचें मन त्याच्या मरणाविषयीं साशंक होतें. त्यांनीं पोलिसांत फिर्याद नेली आणि ११।४।१४ रोजीं त्याचें प्रेत उकरण्यांत आलें, व त्याच्या पोटांतला आलाय आग्रा येथील सरकारी रसायनशास्त्रज्ञाकडे पाठविण्यांत आला. तिकडून अभिप्राय आला कीं काळ्या धतुऱ्याच्या बियांचें विष आढळून आलें. पोलिसांच्या चौकशींत असा प्रकार कळून आला कीं शिवराम गोविंद कुणब्यानें बाबूराव चांगोजी भगत याच्या हातून धोतऱ्याचें बीं घेतलें आणि आपली नातेवाईक सावित्री मर्द गंगाराम इच्या कडून तें विष भजामध्यें घालविलें व तीं भजीं शिवरामनें मारुतीला सत्यनारायणाच्या जेवणावळींत वाढलीं. सावित्री व बाबूराव यांस पुरावा नसल्यामुळें निर्दोषी ठरविण्यांत आलें. आणि शिवरामचा कबूली जबाब लक्ष्यांत घेऊन व मारुतीच्या मरणाचा पुरावा व शिवराम संबंधानें पंक्तींत भजीं वाढण्याचा पुरावा लक्ष्यांत घेऊन त्यास

खुनी ठरविलें. पण शिवराम हा गांजेकस आहे. गांजामुळें त्याची बुद्धि नष्ट होऊन तो वेडसर झालेला आहे. त्याच्या हातून हा खुन कोणीतरी करविला आहे पण पडद्याआड असलेले इसम कांहीं बाहेर येऊं शकत नाहीं ह्मणून शिवरामला काळे-पाण्याची जन्मठेप देण्यांत आली. खुनाचें कारण कांहीं असें दाखवितात कीं मयत मारुती हा शिवरामच्या बायकोशी लागूं होता ह्मणून त्याला दुनिये बाहेर करण्याचा हा प्रयत्न झाला असावा. दुसरें कारण असें आलें आहे कीं शिवरामचा भाऊ बळीराम हा जातीच्या नियमाबाहेर वागतो ह्मणून त्याला बाष्कित करण्याच्या खटपटींत मारुती हा होता. पण त्याचा हा बेत तडीस जाण्यापूर्वीच बळीरामनें आग्रहानें मारुतीला नेवण्यास नेलें व तेथें मरणापर्यंतचा सर्व प्रकार घडला असला पाहिजे असा स्टेशन जज्जांचा अभिप्राय आहे.

## ताज्या बातम्या.

जर्मनीनें चोहीकडून आपला कोंडमारा व नाचक्की होत आहे हें पाहून जिवावर उदार होऊन लढण्याचा निश्चय केला आहेसें दिसतें. लीजचे किल्ले घेण्यास ज्या जर्मनीला तीन आठवड्यांवर दिवस लागले त्याच जर्मनीनें लीज पेक्षांही अधिक बळकट असा नामुर किल्ला हां हां ह्मणतां सर केला हा त्या आवेशाचाच परिणाम होय. 'जगावयाचें कीं मरावयाचें' हा प्रश्न आतां पुढें उभा राहिल्यावर जर्मनीसारख्या युद्धप्रिय लोकांच्या अंगांत वीरश्रीचा संचार झाला आहे व जर्मन लोकांचें सगळें सैन्य एकवटून फ्रान्समध्यें हल्लीं जंगी लढाई सुरू झाली आहे. फ्रेंच व ब्रिटिश फौजेला आतां चवताळलेल्या जर्मन लोकांशीं टक्कर देणें बरेंच जड जाईल यांत शंका नाहीं इकडे रशिया मागोमाग येत आहे त्याची दर्वा न करतां जर्मनीचें सारें लक्ष आतां फ्रान्समधल्या लढाईकडे लागलें आहे, आणि लवकरच साऱ्या जगाच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन बसेल असें युद्धाचें वर्तमान वाचण्यास मिळेल ह्मणुन लोक मोठ्या उत्कंठेनें प्रतीक्षा करीत आहेत. पुर्वेकडे जपाननें जर्मनीशीं शत्रुत्व जाहिर केल्याबरोबर सिंगचौ वर तोफांचा भडिमारा सुरू केला आहे. तथापि निष्कारण रक्तपात न करण्याचा जपानचा उद्देश असल्यामुळें हें पूर्वेकडचें युद्ध बराच वेळ रेंगाळत राहील असा सुमार दिसतो.

## जर्मनीचा व्यापार

प्रस्तुतच्या युद्धांत जर्मन सत्तेचा नायनाट होवो अगर न होवो, पण इंग्लंड व ब्रिटिश साम्राज्य यांमध्यें तरी त्यापासून जर्मन व्यापाराला जबरदस्त धक्का बसेल असा संभव आहे. हिंदुस्थानापुरता विचार केला तर व्यापारासंबंधाची जर्मनीची जागा जपान घेईल असा सुमार दिसतो. हिंदुस्थानांत जर्मनीचा व्यापार वर्षाचा ६८ लक्ष पौंड किंमतीचा ह्मणजे सुमारें १० कोटींचा आहे. जर्मनीतून इकडे येणारा माल ह्मणजे वस्त्रें, इमारतीचें सामान, गाड्या रासायनिक द्रव्यें, औषधें, रंग, सायकली मातीची भांडीं व चित्रें, लाकडी सामान काचेचें सामान, यंत्रें, हस्तिदंती सामान दारु, मोटारगाड्या, तेलें, वारनिशें, कागद, रेलवेला लागणारें सामान, मीठ, स्टेशनरी सामान, साखर, रेशीम, लोकर, मुलांचे खेळ, छत्र्याचे निरनिराळे भाग, वगैरे संसारांत उपयोगीं पडणाऱ्या बहुतेक जिनसा आहेत. या आतां जर्मनींतून न येतां आपण तयार करून पाठवाव्या असा विचार इंग्लंड व्यापारी करीत आहेत. जपान ही अशी संधी हातची घालविणार नाहीं. या संधीचा फायदा आमच्या स्वदेशी व्यापाऱ्यांनीं व कारखानदारांनीं कां करून घेऊं नये तें कळत नाहीं. जपानांतून लोखंड व पोलाद येईनासें झाल्याबरोबर कालीमाती येथील टाटाच्या कारखान्याला इतकें काम मिळालें आहे कीं तो कारखाना रात्रंदिवस चालवावा लागत आहे तरी मागणी इतका पुरवठा करवत नाहीं. इतर कारखान्यांनींही ही सोन्याची संधी दवडूं नये. तसें झाल्यास सर्व जगाची शांतता व सुख यांचा उच्छेद करणाऱ्या या युद्धासारख्या वाईट गोष्टींतूनही हिंदुस्थाननें चांगली गोष्ट निवडून काढून घेतल्याचें श्रेय त्याच्या पदरीं पडेल. समुद्राच्या भरतीची ही लाट आहे. या लाटेसरसें हिंदुस्थानच्या व्यापारानें पुढें पाऊल टाकण्यास तयार झाल्यास आपलें अपरिमित कल्याण करून घेतल्यासारखें होईल. पण तसें न झाल्यास मात्र ओहोटीच्या लाटेबरोबर तो किती अधोगतीला जाईल याचा नेमका सांगवत नाहीं.

# वऱ्हाडवृत्त

**हवामानः—** पीकें सूर्यप्रकाशानें मोठीं तेजस्वी, रसरसीत व जोमदार अशीं झालीं असून पर्जन्याला आनंदानें पुनः बोलावीत आहेत. किरकोळ दुखणीं मध्यंतरीं बळावली असून कांहीं कांहीं खेड्यापाड्यांतून पटकीचा आजार उद्भवला होता पण ही रोगराई आतां चांगली शमत चालली आहे.

रा. रा. ए. ई. मॅथियास, आय. सी. एस असिस्टंट कमिशनर यास रजेवरून परत बोलावण्यांत येऊन रजिस्ट्रार, को-ऑपरेटीव्ह सोसायटीज, मध्यप्रांत व वऱ्हाड यांचे हाताखालीं स्पेशल ड्युटीवर नेमण्यांत आलें.

रा. रा ई. डॅक्स, आय. सी. एस. डेप्युटी कमिशनर यांस रजेवरून बोलावून उमरावती येथें नेमण्यांत आलें. आणि त्यांचे जागीं असलेले रा. रा. ई. बॅचलर आय. सी. एस. यांस वर्धा येथें नेमण्यांत आलें.

रा. रा जी. ए. खान आय. सी. एस. ऑफिसिएटिंग डेप्युटी कमिशनर नेमाड यांस सबडिव्हिजनचे असिस्टंट कमिशनर नेमण्यात आलें आणि खानबहादुर हाफीज महम्मद बिलायतुल्ला, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस आकोला येथें नेमण्यांत आलें.

रा० रा० ए० इ० नेल्सन. आय० सी० एस, आफिशिएटिंग डेप्युटी कमिशनर सागर यांस इलिचपूर सबडिव्हिजनचे असिस्टंट कमिशनर नेमण्यांत आलें

रा० रा० इ० एम किरल्यांडर. एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस इलिचपुराहून नेमाडला बदलण्यांत आलें.

अकोला सेंट्रल ब्यांकेची वार्षिक सभा काल सकाळीं येथील टौनहालांत रा० रा० देवर डिपुटी कमिशनर यांच्या अध्यक्षते खालीं भरली होती. सरकारी पेढ्याची प्रगती असून भविष्यकाळाच्या सर्वच गोष्टी या सहकारि तत्वावर चालावयाच्या आहेत. आणि त्यांना प्रारंभ या पेढीच्या द्वारानें इतका फलश्रीनें युक्त आहे हें पाहून विशेष आनंद वाटतो. सेंट्रल ब्यांकेची पुढील उभारणी टोलेजंग होणार असून पश्चिम वऱ्हाडची नामांकीत संस्था होईल असा पूर्ण भरंवसा आतां वाटूं लागला आहे. या संस्थेकडून वॉरफंडाला रु० १०० देण्यांत आलें आहेत.

श्री राजेश्वर संस्थानच्या धर्मशाळेंतील सार्वजनिक गणपत्युत्सवांत गुरुवार ता. २७ रोजीं सायंकाळीं श्री० दादासाहेब खापर्डे यांचें 'नाति दूरे नाति निकटे इंद्रियनाशान् मनोनवस्थानात्' या श्लोकार्धावर व्याख्यान झालें त्याची हकीकत एका श्रोत्याकडून आमचेकडे प्रसिद्धीसाठीं आलेली आहे. ती स्थलाभावीं या अंकीं देतां येत नाहीं.

आकोले येथील मारवाडी मंडळीनें ६९० रुपये जवळ जवळ वर्गणी जमा करून सध्यां चालूं असलेल्या युरोप खंडांतील भारतीय युद्धात आपले परमपूज्य बादशहा पंचमजार्ज यांस यशप्राप्ति व्हावी त्या निमित्त अक्कलकोट येथील प्रसिद्ध प्राचीन जगदंबेच्या मंदिरांत अनुष्ठान सुरू केलें आहे; त्यानिमित्त प्रारंभ ता. २४-८-१४ रोजीं झाला त्यावेळेस येथील लोकप्रिय मे. डेपुटीकमीशनर देवरसाहेब यांनीं मारवाडी मंडळीच्या विनंतीस मान देवून अधिकारीवर्गासह येवून प्रसंग साजरा केला त्याबद्दल मारवाडीमंडळी त्यांची फार आभारी आहे.

रा. रा. यशवंत महादेव चिटणवीस बी. ए. एल. एल. बी. सबजज्ज, खामगांव हे गेल्या सोमवारीं स्वर्गस्थ झाले हें ऐकतांच त्यांच्या सद्गुणांची आठवण एकदम होऊन आप्तमित्रमंडळी फार हळहळ करितील. दोनचार दिवसांच्या तापानें त्यांचा देह इतका जर्जर होऊन त्यांचें विसर्जन होईल असें कोणाऌही वाटलें नव्हतें. हे स्वभावानें गोड, मोठे इनसाफी सरकारी कामांत दक्ष आणि लोकप्रिय असे असत. वयाच्या ३९ वर्षांच्या सुमाराला असा कालाचा घाला पडला म्हणजे बायकामुलांवर कसा खडतर प्रसंग बेततो हें सांगण्याला शद्ब किती तरी पामर!

## जाहिरनामा.

मी खालीं सही करणार जात मारवाडी रा० मौजे हिवर खुर्द प्र० खेर्डे ता० मेहकर जि० बुलडाणें यांजकडून तमाम लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं, सकु मर्द कृष्णाजी जात ब्राह्मण रा० मौजे डोंगरगांव ता० चिखली इनें माझे मर्जी प्रों मजपाशीं चांगले रीतीनें आपले हयाती प्रों बापको प्रों रहावें ह्मणून मी माझी मौजे हिवर खुर्द ता० मेहकर येथील शेत सर्वे नंबर ६७ यांतील एक त्रितिआंश हिशाची पु० कडील जमीन तिजला ता० २१।३।१४ इ० रोजीं बक्षीस देऊन दस्तऐवज रजिष्टर करून दिला आहे. सदर्हू सकु ही माझे मर्जी प्रमाणें चांगले रीतीनें मजपाशी राहत नाहीं तिचे माझे आपसांत बेबनाव झाले आहे व सदर्हू जमीन माझेंच ताब्यांत आहे तिची जमीनीवर मालकी राहिली नाहीं. या कारितां तिचे पासून सदर्हू जमीन कोणी गहाण खरेदी घेऊ नये घेतल्यास तो व्यवहार बातल समजला जाईल कळावें ता० १७।७।१४ इ०

सही

सुरजमल जमनादास मारवाडी द. खु.

नो०. नं० ८

## नोटीस

नोटीस बेशमी संपत वा॥ तुकाराम पाटील राहणार मौजे निमकर्द तालुका बाळापूर जिल्हा आकोला यासी नोटीस देणार पुंजाजी वा॥ कृष्णाजी परीट राहणार मौजे खंडाळ तालुके बाळापुर जिल्हाला आकोला नोटीस देतो ऐसाजे कीं मी तुह्मास मौजे लोव्हार तालुके बाळापुर या दारुचे दुकानावर नोकर तारीख १।४।१४ इसवी पासून ठेविले पुढें तुमचे माझे बनलें नाहीं व तुह्मीं माझ्यासी दगलबाजी केली यावरुन मी तुह्मास काढून टाकले तुह्मी माझे दुकानावर चार ४ महिन्या पावेतो नवकरीकेली त्यावेळेस चार महान्याची सीलक रुपये १४१७८१२ हिशोब करुन पाहातां निघाली ती सिलक काढतें कोठें आहे व तुह्मी माझे जवळून प्रत्येक महिन्यास रुपये दारु आणण्या कारतां नेत गेले तें रुपये एकंदर ६८८ असें सर्व एकंदर रुपयांचा मजला हिशोब दिला नाहीं व याजबद्दल मि तुह्मांस पूर्वीं नोटसि दिली होती आतां नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसाचें आंत तुह्मी माझा सर्व निकाल करुन द्यावे नाहीं तर मग मी तुमचे वर दगल बाजी केल्या बद्दल तुमचेवर फिर्याद करील व नोटीसीचा जो खर्च लागला याचे सर्व पैसे भरून घेईल या वरुन ही नोटीस दिली सही तारीख २६।८।१४ इसवी

सही

पुंजाजी वा॥ कृष्णाजी परीट राहणार
खंडाळ ता० बाळापुर जील्हा
आकोला द० वस्ती लोहार

नो० नं० ९

## "इंपीरियल इंडियन रिलीफ फंड"

या फंडाची शाखा मध्यप्रांतांत स्थापन झाली असून त्या फंडाला आजपर्यंत मिळालेल्या व देऊं केलेल्या रकमांची व त्या देणारांची यादी आमचेकडे प्रसिद्धीसाठीं आली आहे. ती येणें प्रमाणें:—

| | | |
|---|---|---|
| १. नामदार सर बेंजामिन राबर्टसन् के. सी. एस. आय. के. सी. एम. जी. सी. आय. ई. | चीफ कामिशनर सी. पी. | रु. ७५० |
| २. नामदार सर गंगाधरराव चिटणवीस * के. सी. आय. इ. | नागपूर | रु. २००० |
| ३. नामदार एम्. बी. दादाभाई सी. आय. ई. | " | " ६५० |
| ४. नामदार सर बी. के. बोस. नाइट. सी. आय. ई. | " | " ६०० |
| ५. सर बेझनजी दादाभाई. नाइट * | " | " ७५० |
| ६. धी राइट रे. डी. ई चॅटरटन् डी. डी | नागपूरचे बिशप | " ३०० |
| ७. रा. रा. सी. ई. लो * सी. आय इ. डायरेक्टर आफ आय सी. एस अग्रिकल्चर अँड इंडस्ट्रीज | " | " २५० |
| ८. नामदार सर आर्थर स्वेनरहॅसेट * बार्ट आय. सी. एस. चीफ सेक्रेटरी | " | " २५० |
| ९. रा. रा. जी. पी. डिक् * बर. ॲर. लॉ. | नागपूर | " १५० |
| १० डॉ. एच्. एस्. गौर | " | " ५०० |
| ११ रा. ब. व्ही. आर. पंडित | " | " १५० |
| १२ रा. रा. जे. मित्र | " | " ३५० |
| १४ नामदार नबाब एम्. सलामुल्लाखान सी. आय. ई. देऊळघाट बु० | | " १०० |
| १४ रा. रा. बुरामजी | नागपूर | " ५०० |
| १५ नामदार रावबहादुर विष्णु दत्त शुकल, सिहोरा, | जबलपूर | " २५० |
| १६ नामदार शिवप्रसाद | दिक्षितपुरा जबलपूर | " १५० |
| १७ नामदार पी. एस. मथुराप्रसाद | छिंदवाडा | " १५० |
| १८ खानबहादुर एच. एम. मलक | नागपूर | " २५० |
| १९ नामदार एम. आर. दिक्षित बार ॲटर्लॉ, | नागपूर | " १०० |
| २० रा. रा. एच्- एस्. मेस् आय. सी. एस्. कमिशनर | " | " २५० |
| २१ रा. रा. सी. ए. क्लार्क आय. सी. एस. डे. कामिशनर | " | " १५० |
| २२ रा. रा- एच्. ए. क्रंप् आय. सी. एस. फायनॅशियल कामि. | " | " ५०० |
| २३ रा. रा. एफ् डब्ल्यु डिकन् बार ॲट- लॉ. | " | " २०० |
| २४ सर कस्तूरचंद डागा, के. सी. आय. इ. | बँकर, कामठी | " ३००० |
| २५ रा. रा. मीर अस्लाम खान कॉंट्राक्टर, | नागपूर | " ४०० |
| २६ सी. आय. एस्. डब्ल्यु अँड एम् कंपनी लि० | " | " ५००० |
| | एकूण | रु. १७७०० |

या फंडापैकीं कांहीं भाग "ओव्हर सीज् एम्पायर फंडा"कडे देण्यांत आल्यास ज्यांच्या नांवांपुढें * अशी खूण आहे त्यांनीं आणखीहि रकमा देण्याचे अभिवचन दिलें आहे.

## नोटीस

नो० बे० जानराव हरीचंद्र देशमुख बजाई व धुरपती मर्द खंडुजी धनगर व तमाम लोक रा० क० शेलगांव प्र० व ता० मेहकर जि० बुलडाणें यांस:-

खालीं सही करणार यांजकडुन नोटीस देण्यांत येते कीं माझा भाऊ खंडुजी वा॥ गोरखजी हा १ एक वर्ष झालें मयत झाला आहे तो व मी विभक्त होतो त्याची गरीबी असल्यानें त्यास मी मांझी स्वसंपादीत जमीन मौजे त्रिर्थी प्र० घाटबोरी येथील नं० २४-२९ त्याचे हीन हायात राहून खाण्यास वहीतीस दिलें होतें. खातें माझें नावें असोन तहसील मी देत आहे हल्लीं वरील नं० रे० ऑ० राईटचे नोंदीचे वेळीं माझे नांवें जमीन न लावीता चावडीनें वरील माझ्या भावजई यांचे नावें लावील्याचें समजतें व जनुन येथील नं० ५ याची सालीम जमीन माझें नावें व माझें ताब्यांत असोन त्यांतही एकद्वितीयांश हिशाची जमीन वरील दोघींचे नावें लागल्याचे समजतें व त्याबद्दल माझी तकरार आहे व मी अर्ज केला आहे वरील भावजई यांनीं जमीनीची अफरातफरा करण्याचें चालविलें आहे. जमीनी माझ्या मालकीच्या व मी संपादन केलेल्या असोन सर्व मालकी माझी आहे. खंडुजी यांस कोणाचें कर्ज देणें नाहीं करितां वरील जमीनी कोणी कोणत्याही रीतीने देऊं नयेत व कोणी घेऊं नयेत बजाई व धुरपती याना माझ्या जमीनी अफरातफर करण्याचा अगर तीची अन्य विल्हेवाट करण्याचा अधिकार नाहा कोणी दिल्यास अगर घेतल्यास मी अगर माझ्या जमीनी जबाबदार होणार नाहीं. करीता आगाऊ सर्वांस नोटीसीनें कळविलें आहे कळावें ता० १९-८-१४

सही
नां० रावोजी वा॥ गोरखजी
याचीं रा० क० शेलगांव
देशमुख.

नो० नं० १०

अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ॥ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—आरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. ११

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांध्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अॅनलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० १२

सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

### आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना संधिवात, त्वच संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० १२

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.